म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक वि. धों. कर्वे

सन

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव शूरवीर रामराव घोरपडे

५८.

ऐतिहासिक

नाटक.

नाटक

# विद्वान लोकांचे अभिप्राय.

" शूरवीर रामराव घोरपडे " हें नाटक ग्रंथकर्त्यांनीं आह्मांस दाखविलें. कित्येक भाग आम्हीं वाचून पाहिले. ग्रंथकर्त्याचा हा नाटक लिहिण्याचा पहिलाच प्रसंग आहे, असें असून नाटक बऱ्याच अंशानें चांगलें उतरलें आहे. भाषा जोरदार असून वीररस परिपूरीत आहे, असा आमचा अभिप्राय आहे. एकंदरींत ग्रंथ वाचनीय आहे.

| | |
|---|---|
| बडोदें<br>सन्न १८९९ इ. | बाळकृष्ण परशराम करंदिकर बी. ए.<br>एल्. एल्. बी. मिलिटरी सेक्रेटरी. |

---

" शूरवीर रामराव घोरपडे " हें नाटक ग्रंथकर्त्यांनीं आह्मांस वाचून दाखविलें. संविधानक, भाषा वगैरे संबंधानें एकंदरींत हें पुस्तक वाचनीय आहे. यांत मराठे लोकांच्या शौर्याचें दिग्दर्शन चांगलें होत आहे.

| | |
|---|---|
| बडोदें<br>सन्न १८९९ इ. | काशिनाथ बाबाजी<br>बी. ए. |

---

" शूरवीर रामराव घोरपडे " या ऐतिहासिक नाटकाची हस्तलिखित प्रत कर्त्यांनीं आम्हांस पहाण्यास दिली. ती वाचून पहातां तींत कित्येक ठिकाणीं वेणीसंहार, मृच्छकटिक इत्यादि नाटकांतील अनुकरणें दृष्टीस पडलीं. तीं काढून टाकण्याविषयीं आणखीही कित्येक जरूरीचे फेरफार करण्याविषयीं आम्हीं

# शूरवीर रामराव घोरपडे

## ऐतिहासिक

# नाटक.

---

हें पुस्तक

विष्णु धोंडदेव कर्वे, शाळा नं० ४ चे आ०
मास्तर वडोदें यांनीं रचिलें,

तें

वेळगांव येथें

‘ श्रीरामतत्त्व-प्रकाश ’ छापखान्यांत छापिलें.

---

प्रकाशक

कोंडाजी बहेरजी नाईक लासुरे.

इ० सन १८९६—संवत् [illegible]

किंमत आठ आणे.

श्रीः ।

# अर्पणपत्रिका.

श्रीमंत राजमान्य राजश्री कोंडाजी बही-
रजी लासुरे ऊर्फ भाऊसाहेब यांस त्यां-
ची विद्याभिरुचि, सदाचार, ज्ञानप्र-
सारेच्छा, नाट्यकलामार्मिकता
इत्यादि सद्गुणांस लुब्ध हो-
ऊन ग्रंथकर्त्यानें हा
ऐतिहासिक नाटकग्रंथ
मोठ्या प्रेमभावानें
हक्कासह अ-
र्पण के-
ला
असे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

लोकांची अभिरुचि एकाच विषयावर स्थिर होत नाहीं. तिला निरनिराळे विषय लागतात. व असें होणेंही स्वाभाविक आहे. संगीत नाट्याचार्य अण्णा किर्लोसकर ह्यांनीं आपल्या नूतन नाटकांच्या प्रयोगांनीं सर्व समाजाच्या अभिरुचीला निराळें वळण लाविलें. पौराणिक नाटकांची तऱ्हा पूर्वीची अप्रिय झाली, सर्वतो मुखीं संगीत नाटकांतील पद्यें बसलीं. गवयांच्या गाण्यांतसुद्धां त्यांचा रिघाव झाला. संगीत नाटकें एका मागून एक तयार होऊं लागलीं. अखेर त्यांची मजल संगीत हजामतीपर्यंत जाऊन पोंहचली. इतका जेव्हां संगीत नाटकाचा सुकाळ झाला तेव्हां लोकांचीं मनें विटून गेलीं ह्यांत आश्चर्य काय? वीररस प्रधान नाटकें हळू हळू लोकांनां प्रिय होऊं लागलीं. संगीत पाणचट झालीं. इतक्या संधीस एखादें ऐतिहासिक वीररस प्रधान नाटक तयार करून रसिक गृहस्थांस अर्पणकरून फार दिवसांची हौस पुरवून घ्यावी ह्या हेतूनें मीं हें पुस्तक तयार केलें! ह्यांतील कथाभाग ऐतिहासिक आहे; परंतु, कांहीं कांहीं ठिकाणीं फेर करावा लागला आहे! हें नाटक लिहीत असतां रावसाहेब शंकर मोरो रानडे ह्यांनीं ज्या सुचना केल्या त्या बद्दल मी त्यांचा फार अभारी आहें! नाटक लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे, तेव्हां चुका होण्याचा संभव आहे! जर हा प्रयत्न लोकादरास पात्र झाला तर पुन्हां प्रयत्न करण्यास उमेद येईल.

ग्रंथकर्ता.

# नाटकांतील पात्रें.

मोरोपंत } ....दोन गृहस्थ.
वामनराव }

यशवंतराव........घोरपडे बाबासाहेबांचा पुतण्या.

मानाजीराव.......यशवंतरावाचा मित्र.

रामराव..............बाबासाहेबांचा दत्तक पुत्र.

टिपू....................हैदराचा मुलगा.

गफूरखान.........टिपूचा सरदार.

माधवराव..........पेशवे.

त्रिंबकराव मामा } पेशव्यांचे सरदार.
गोपाळराव पटवर्धन }

हंसाबाई............रामरावाची बायको.

मंजुळा...............हंसाबाईची मैत्रीण.

चंद्राबाई............हंसाबाईची नणंद.

रमाबाई............माधवराव पेशव्यांची बायको.

दुर्गाबाई............कर्नाटकांतील सरमुभ्यांची बायको.

फतिमा.............टिपूची लवंडी.

शिपाई, जासूद, हलकारे, मोरकरी, इत्यादि.

# ऐतिहासिक नाटक.

## शूरवीर रामराव घोरपडे.

### अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

मोरोपंत व वामनराव.

**मोरोपंत॰**—नमस्कार वामनरावजी!

**वामनराव॰**—नमस्कार! आज फार दिवसांनीं गांठ पडली.

**मो॰**—दोन तीन महिने झाले असतील!

**वा॰**—वाड्यांतील काय खबर आहे? जरा गडबड आहे ह्मणून विचारितो!

**मो॰**—असें तर खरें! रामरावाचें लग्न झालें!

**वा॰**—काय! रामरावाचें लग्न!

**मो॰**—ह्मणजे तुह्माला कांहींच समजलें नाहीं वाटतें!

**वा॰**—छे: मी जर येथें नव्हतोंच तर मला कसें समजणार!

**मो॰**—ऐकातर मी सर्व कांहीं सांगतों. बाबासाहेबांना अपत्य नसल्या मुळें; यशवंतरावाला दत्तक घेऊन, संस्थानाचा अधिकार त्यांना देण्याचा महाराजांचा बेत होता, परंतु यशवंतराव पहिल्या प्रतीचा दु-

व्यसनी, नेहमीं अमलांत चूर, बाहेर ख्याली हीं तसाच तेव्हां असल्या मनुष्याला दत्तक घेणें त्यांना बरें वाटलें नाहीं; रामराव हा एक पोरका पोर, बाबासाहेबांनीं लहानपणापासून पाळिला होता; यशवंतराव हा भावाचा मुलगा व हा पाळलेला; परंतु दोघांत भेदाभेद मुळींच त्यांनीं ठेविला नव्हता. दोघांवरही सारखें प्रेम; परंतु रामराव आपल्या गुणांनीं जास्त प्रिय होत चालला; व यशवंतराव दिवसानुदिवस मर्जीतून उतरूं लागला. अखेर महाराजांनीं रामरावाला दत्तक घेऊन यशवंतरावाकरितां जी वधु योजिली होती तिचा विवाह रामरावाबरोबर करून दिला.

वा०—ती मुलगी किती वर्षांची आहे!

मो०—तिचें वय सुमारें सतरा वर्षांचें आहे! स्वरूपानें तर जशी काय पुतळी!

वा०—ती कोणाची मुलगी?

मो०—हंबीरराव मोहिते नाहींत कां तुह्माला माहीत! त्यांनींही अशीच एकाची मुलगी पाळिली होती. यशवंतरावाला देण्याचा त्यांचा बेत होता; परंतु बाबासाहेबांनीं रामरावाला दत्तक घेतल्या मुळें, तो बेत फिरला.

वा०—पण ह्या कामांत मुलीचा सल्ला कसा पडला?

मो०—यशवंतरावाबरोबर लग्न करण्याला ती कबूल नव्हतीच! परंतु बापाच्या पुढें तिचें काय चालणार! पहिल्यापासून रामरावावर तिचें मन होतेंच; यश-

वंतराव गादीचा मालक होणार ह्मणून तिच्या बापाला रामरावाला ती देणें पसंत पडेना! पण आतां सर्वच गोष्टी जमून आल्या.

वा०—काय चमत्कार आहे? पैशाच्या योगानें मनुष्याचें कसें स्थित्यंतर होतें पहा! जो पूर्वी चांगला वाटत होता तोच वाईट झाला. जो वाईट होता तो चांगला झाला!

मो०—जगाचा असाच नियम आहे. पैशाच्या योगानें सर्व कांहीं होतें, पैसा असला ह्मणजे विद्या नको, शौर्य नको, शहाणपणा नको, सौंदर्य नको, कांहीं नको! सर्व लोकांत मान पाहिजे असेल तर पैसा मिळवा! सुंदर स्त्री पाहिजे असेल तर श्रीमंत व्हा! लोकांनीं स्तुति करावी असें वाटत असेल तर द्रव्य संग्रह करा! मग मारेकऱ्याचा धंदा करा! चोऱ्या करा! खोटे दस्ताऐवज करा! विश्वास घात करा! काय पाहिजे तें करा परंतु पैसा मिळवा! ह्मणजे सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या ह्मणून समजा!

वा०—धिःकार असो असल्या कृतींना व त्या पैशालाही! प्रामाणिक पणानें वागून अर्धपोटीं राहाण्याची जरी पाळी आली तरी बेहत्तर! परंतु लबाडीनें मिळविलेली ती तूप रोटी नको!

मो०—हें जग सर्व प्रकारच्या मनोवृत्तींनीं भरलेलें आहे! कांहीं सुष्ट व कांहीं दुष्ट, कांहीं संभावित व कांहीं लुच्चे, मिळून चांगलें व वाईट ह्यांच्या मिश्रणापासून

झालेलें जग पाहिजे तर चांगलें ह्मणा! किंवा वाईट ह्मणा!

बा०—बरें तें असो! पण तो कोण इकडे येत आहे?

मो०—( पाहून ) समजलों रामरावाचें दत्त विधान झालें! व लग्नही झालें हें यशवंतरावला बिलकूल न रुचल्या मूळें तो अतिशय संतप्त होऊन इकडे येत आहे तर त्याच्या नजरेस न पडतां निघून जावें हें उत्तम!

बा०—मलाही काम आहे! चला तर! नमस्कार!

मो०—नमस्कार. ( दोघे जातात इतक्यांत यशवंतराव येतो. )

यशवंतराव०—बाबासाहेब असें करणें तुह्मांला योग्य दिसलें ना! कांहीं चिंता नाहीं पाहून घेईन! परमेश्वरानें ह्या जगामध्यें मनुष्याला मोह घालण्या करितां दोन वस्तु उत्पन्न केल्या आहेत. कनक आणि कांता! ह्यांच्या दर्शनानें मोह पडणार नाहीं अशी व्यक्ति सांपडणें कठीण! आतां ह्यांत श्रेष्ट कोण हा एक प्रश्न आहे! परंतु मी तर उघड ह्मणतों कीं, स्त्री रत्नाची बरोबरी त्या निर्जीव कनकाला कशी करितां येईल! नवयौवन सुंदरीच्या दर्शनानें कोणालाबरें सुख वाटणार नाहीं! मुग्धावस्थेंतील स्त्रियांचें अभिनय कोणाचेंबरें मन आकर्षून घेणार नाहींत? हंसगामिनींच्या भ्रूसंकेताचा कोण बरें अनादर करण्यास समर्थ आहे? कोणाला बरें सुंदर स्त्रियांचें मधुर भाषण रिझविणार नाहीं? ज्याला ह्या जगांत सुंदर स्त्री मिळाली

तोच धन्य! रसिक स्त्रियेचा समागम हेंच स्वर्ग सुख! पक्वबिंबाधरेच्या अधर पानांत अमृता पेक्षांही जास्त गोडी आहे! परंतु काय करूं रे! स्मरण झालें ह्मणजे सर्वांगाचा दाह होतो! क्रोध अनावर होतो! काय करूं आणि काय नाहीं असें होऊन जातें! जगामध्यें दोन वस्तु श्रेष्ठ! त्या दोहोंचाही मी मालक बनणार होतों! परंतु नशीब आडवें पडलें! राज्य गेलें, स्त्री ही गेली! बाबासाहेब तुह्मांला कायहो ह्मणावें! जर तुह्मांला असेंच करावयाचें होतें; तर मलातरी आशा काय ह्मणून लाविली! मला जगांत तोंड दाखविण्याला सुद्धां जागा राहिली नाहीं! मजपेक्षां तो भिकार-डा तुह्माला जास्त झाला अं! काय करूं! ह्या ह्यातार्‍याच्या नरडीचा घोंट घ्यावा असें वाटतें! त्या हरामखोराचे तुकडे तुकडे उडवावे असा त्वेष येतो ! परंतु कांहीं इलाज चालत नाहीं ! आज ते सत्ताधीश आहेत! मला तर कोणी सहाय नाहीं! परंतु पाहून घेईन! ह्या अपमानाचा सूड घेतल्या खेरीज राहणार नाहीं? ज्यांचें ज्यांचें ह्या कामांत अंग आहे त्यांना त्यांना ह्या कर्माचें प्रायश्चित्त भोगायाला लावीन तरच मी यशवंतराव! ह्या कामांत माझ्या मित्राची मदत जरूर घेतली पाहिजे परंतु तो आतां कोठें बरं भेटेल! ( इतक्यांत मानाजीराव येतो असें पाहून ) यावें मानाजीराव! मी आतांच स्मरण केलें होतें! तुला बरोबर शंभर वर्षे आयुष्य आहे!

मानाजी०—महाराज! शंभर वर्षें जगून तरी दुसऱ्याच्याच दाराशीं तुकडे मोडावयाचे ना? ह्मटलें आपण एकदां गादीचे मालक झाल्यावर कांहीं तरी चांगले दिवस येतील! पण आमचे नशीबीं कोठें आहे!

यशवंतराव०—मित्रा! ह्याच विचारांत मी होतों! काय करूं आणि काय नाहीं असें मला होऊन गेलें आहे! ह्या अपमानानळानें माझ्या आंगाचा दाह होत आहे. डोकें फिरून वेडा होण्याच्या बेतावर आलों आहे! सांग सांग! कांहीं युक्ति सांग. तूं सांगशील तें करण्यास मी तयार आहें! पाहिजे तसलें साहस करण्यास, कसलेंही अघोर कर्म आचरण्यास, पाहिजे त्याचा खून करण्यास हा यशवंतराव तयार आहे! राज्यतृष्णेमुळें ही पृथ्वी रक्तमय करून टाकीन! गांवचे गांव जाळून पोळून साफ करीन! बालहत्या, स्त्रीहत्या, मातृहत्या, पितृहत्या करण्याचा प्रसंग आला तरी मागें पुढें पाहणार नाहीं! हिंदुधर्माचा त्याग करीन! गाई व ब्राह्मण ह्यांचा उच्छेद करीन! देवालयें जमीन दोस्त करीन! अविंधांचा दास बनेन! असल्या नीच गोष्टीही राज्या करितां आनंदानें पत्करीन! मित्रा काय सांगूं! त्या ह्याताऱ्यानें, त्या जख्खड खोकडानें, आपलीं सर्व वचनें गुंडाळून ठेवून त्या कुत्र्याला, त्या भीक माग्या चटोराला, त्या हांजी हांजी करणाऱ्या मुर्दाडाला, शौर्याचा लटका आव घालणाऱ्या त्या शेंदाड शिपायाला आपला दत्तक केलें. नुसतें दत्तक

केलें इतकेंच नाहीं तर माझ्या प्रियेचें ही मालक बनविलें! मित्रा! अरे म्यां हा अपमान कसा सहन करावा! ज्या सुंदरीवर माझें मन बसलें होतें; जिला मी उपास्य देवते प्रमाणें मानीत होतों; जिच्या अधरपाना करितां हें माझें मन आतुर झालें होतें; अशा त्या ह्रदयंगमेच्या, प्राप्तीच्या अक्षयी निराशेला मला पात्र करण्याचा कीरे त्या बेरडानें घाट जुळविला. मित्रा! अरे ह्या चोरांचा सूड घेण्याची तुला कांहीं युक्ति सुचत नाहीं काय? अरे विचार कसला करतोस! ह्या अभागी मित्राची तुला दया येत नाहीं काय? तूं मोठा हुशार असें मी समजत होतों! तुझ्या शहाणपणावर माझा मोठा भरंवसा होता! बोल बोल! त्या दुष्टांचा समाचार घेतल्या खेरीज मला समाधान वाटणार नाहीं!

मा०—महाराज! जरा शांत व्हा! असला आत ताईपणा करून कांहीं कार्यं होत नसतात. युक्ति प्रयुक्तीनें मी आपला कार्यभाग उरकून देईन!

य०—मला असली दिरंगाई मुळींच आवडत नाहीं!

मा०—आपलें ह्मणणें काय? गादी मिळावी एवढेंच ना?

य०—ते ह्या जगांतून नाहींसे झाले पाहिजेत! व मग मी ह्या प्रांताचा राजा व्हावें.

मा०—मग अशी कांहीं युक्ति निघणार नाहीं कीं काय?

य०—मला काय ती कळूं दे!

मा०—त्या ह्मातार्‍याला व त्याच्या दत्तक पोराला ह्या

जगांतून नाहींसें करण्याला आपली तर शक्ति नाहीं! कदाचित् मारेकरी घालून हें कार्य उरकावें तर पुढें गादी मिळणार नाहीं! ह्मणून दुसऱ्या कोणाची तरी मदत मिळविली पाहिजे!

य०—आपणाला मदत करणारा असा राजा कोण आहे! श्रीमंत तर आपणाला मदत करणार नाहींत! निजाम तर मराठ्यांच्या भानगडींत मुळींच पडणार नाहीं! राहतां पैकीं हैदर राहिला; तो तर फिरंगी लोकांशी लढाई करण्यांत गुंतल्यामुळें त्याच्याकडून ही मदत मिळण्याची आशा नाहीं.

मा०—मला तर असें वाटत नाहीं. आपणाला मदत मिळाली तर टिपू कडूनच मिळेल! व त्याला एक कारणही आहे! मागच्या लढाईंत मराठ्यांनीं हैदरा कडून छत्तीस लक्ष रुपये खंडणी घेऊन सरहद्दी वरील बराच मुलूख आपल्या राज्यांत सामील केला. तो दंश हैदराच्या मनांत आहेच! शिवाय बाबासाहेब घोरपड्यांनीं टिपूची फारच फजिती केली; तेव्हां त्याचा राग बाबासाहेबांवर आहे.

य०—राग असण्याचें काय बरें कारण?

मा०—ज्या ठिकाणीं मराठे लोकांची छावणी पडली होती, तिच्या सभोंवार वेढा घालून बसावें ह्मणून हैदरानें टिपूला हुकूम केला. बाबासाहेब अनेक हुलकावण्या दाखवून एकेदिवशीं टिपूच्या नजरे आड निघून गेले! टिपूनें पाठलाग केल्या बरोबर त्यांच्या

सैन्याची दाणादाण होऊन त्याला फकीराच्या वेषानें पळून जाणें भाग पडलें!

य०—मग त्याच्या कडून मदत मिळण्याचा संभव आहे!

मा०—( कानांत सांगतो ) आणखी ह्या गोष्टी करितां तरी टिपू आपल्याला मदत करीलच.

य०—मित्रा जर तुझ्या हातून ही कामगिरी उत्तम रीतीनें शेवटास जाऊन यश मिळालें तर तुझ्या सौख्याला पारावार नाहींसा होईल! मी सर्व राज्य भार तुझ्या स्वाधीन करून खुशाल आनंदानें राहीन!

मा०—महाराज! हे सर्व उत्तम रीतीनें पार पाडण्याचें मज मध्यें सामर्थ्य आहे; परंतु पैशा खेरीज सर्व मसलती फिऱ्या पडतात सबब पैशाची व्यवस्था लावून द्याल तर थोड्याच दिवसांत आपण ह्या संस्थानाचे मालक बनाल!

य०—किती रुपये पाहिजेत?

मा०—निदान वीस हजार तरी रुपये पाहिजेत!

य०—कांहीं हरकत नाहीं. मी पन्नास हजारांचें जवाहीर तुझ्या स्वाधीन करितों! मग तर कांहीं हरकत नाहींना?

मा०—मग हरकत कसली! काम झालें ह्मणून समजा! परंतु बाहेरून मात्र बाबासाहेबांनीं जी योजना केली आहे ती आपणाला पसंत आहे असें दाखविण्यास चुकूं नका.

य०—तें मजकडे लागलें. कवंडळा प्रमाणें किंवा रम्य-

कोपा सुरी प्रमाणें संधि येईतों पर्यंत माझें आचरण मोठें मोहक असेंच राहील!

मा०—मी आतां रजा घेतों! काम करून येईन तेव्हां तूं पुन्हा भेट!

य०—मी ही बाबासाहेबांच्या भेटीला जातों!

( जातात. )

---

## अंक १

### प्रवेश २

---

हंसाबाई व मंजुळाबाई.

हंसाबाई०—कां मंजुळा बाई? तुह्माला आज इकडे येण्याला कसें बनलें? व परवानगी कशी मिळाली!

मंजुळाबाई०—हें पहा हंसाबाई! मला कधीं परवानगी लागत होती! तरी बरी, बोलावण्या बरोबर आपली हजर असतें! आतां परवानग्या बिरवानग्या सगळ्या तुमच्याकडे! जरा नजरे समोरून नाहींशा झालां ह्मणजे जीव कसा घाबरून जात असेल!

हंसा०—पुरेगबाई तुझी थट्टा! जेव्हां तेव्हां तुझें आपलें तें नी तेंच!

मंजु०—पण गडे आतां खरेंच सांग! तुझ्या मनाप्रमाणें झालें ना! का अजून कांहीं बाकी आहे? यशवंतरावाला तुला देण्याचा जेव्हां नानासाहेबांचा विचार ठरला होता तेव्हां कसें झालें होतें! जेवण सु-

चेना खाण सुचेना एक सारख्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या! आह्मी एवढ्या जीवाच्या मैत्रिणी परंतु आमचे जवळ सुद्धां भाषण नाहीं. पण जेव्हां का मनासारखें होण्याचें ठरलें तेव्हां लागलीच कशी कळी उमलली!

**हंसा**०—खरेंच ग बाई! थट्टा करायाला तुझें काय जातें! जाऊंदे तें.

**मंजु**०—नाहीं कोण ह्मणतें! पण आतां आनंद आहेना? आतां काय बाई तुमचा थाट! छोटेखानी राज्याच्या मालकिणी बनलांत ना!

**हंसा**०—आनंद नसायाला काय झालें! परमेश्वरानें कृपा केल्यावर आनंद कां बरें नाहीं होणार!

**मंजु**०—पण ह्या गरीब मैत्रिणीची आठवण तरी होते का?

**हंसा**०—हें ग काय तुझें बोलणें! असें कधीं तरीं होईल का? तूं माझी लहानपणची मैत्रीण मी तुला कां विसरेन?

**मंजु**०—बरें! जातें बाई मी आतां!

**हंसा**०—बैसग! जाशील! एवढी काय मेली घाई! पण उद्यां खचीत येशील ना?

**मंजु**०—येईन हो खचित! पण आतां संध्याकाळ नाहीं कां झाली! सासूबाई काय बरें ह्मणतील!

**हंसा**०—माझें नांव सांग ह्मणजे झालें!

**मंजु**०—( इतक्यांत रामराव येतो असें पाहून ) अग बाई! तुमचे यजमान आलेच वाटतें! जातें बरें आतां!

हंसा०—ठीक आहे!

मंजु०—( जातां जातां ) आतां कशाला आमची गरज असेल. ( जाते इतक्यांत रामराव प्रवेश करितो हंसा उभी राहते. )

रामराव०—( कोचावर बसतो ) अशी दूर कां! ये!

हंसा०—बरी आहें येथें!

राम०—पण आमचे पाय दुखतात ना?

हंसा०—हा बाई कोण चमत्कार!

राम०—चमत्कार कसला! आपल्या प्रीतीच्या माणसां करितां असेंच होतें!

हंसा०—पण प्रीतीचीं असतील त्यांच्या करितां ना!

राम०—मग आपण आमच्या प्रीतीच्या नाहीं असें कोण ह्मणणार आहे?

हंसा०—दुसरें कोण ह्मणणार? मी ह्मणतें!

राम०—( हंसून ) असें का! आपण कशावरून ह्मणतां बरें?

हंसा०—इतका उशीर झाला तरी इकडे येण्याला बनत नाहीं ह्मणून! आमचा मात्र जीव वेडा! जरा उशीर झाला ह्मणजे कसे वाटेकडे डोळे लागतात!

राम०—असें असें! तरी ह्मटलें आज रुसण्याला कारण काय? उशीर झाला ह्मणून इतका राग! ( जवळ जातो व हात धरून ) प्रिये तूं शहाणी असून असें कसें बरें ह्मणतेस! सगळा दिवस तुझ्या जवळ जर बसलों तर बाबासाहेब काय बरें ह्मणतील!

शिवाय सरकारी कामें तरी कशीं व्हावींत? विचार कर! तूं शहाणी आहेस! तुला विशेष सांगणें नको!

हंसा०—मी असें कधीं ह्मटलें! सगळा दिवस माझ्या जवळ बसावें ह्मणून! पण वेळेवर येणें नये कां होऊं!

राम०—प्रिये एका आज महत्वाच्या कामांत गुंतलों होतों!त्यामुळें इकडे येण्याला उशीर लागला.

हंसा०—असें एवढें कोणतें काम होतें?

राम०—(थट्टेनें) सरकारी कामाची बायकांना कशाला उठाठेव पाहिजे?

हंसा०—( तोऱ्यानें एकीकडे होऊन ) जा गडे नाहीं सांगत तर नाहीं! मीच मुळीं वेडी विचारावेंच कशाला? आमचा मेला बायकांचा जन्मच असा! कितीही जीव तोडून करा पण यश ह्मणून नाहींच!

राम०—( जवळ जाऊन ) राग कसा अगदीं नाकाच्या शेंड्यावर ठेवलेला! शहाणी ह्मणविते परंतु थट्टा देखील समजत नाहीं!

हंसा०—असली कसली मेली थट्टा!

राम०—( जवळ घेऊन ) तुला सांगितल्यावर मग तर नाहीं ना राग?

हंसा०—असें काय बाई बोलणें! आपले वर कां माझा राग?

राम०—असें असें! कोणी ह्मणेल जसें अगदीं खरेंच!

हंसा०—मग सांगावयाचें ना?

राम०—आह्मांला उद्यां पुण्यास जावयाचें आहे 'सम-
जलीस कां.'

हंसा०—( दचकून ) अग बाई! काय पुण्यास जाव-
याचें? तें कशाला?

राम०—होय. श्रीमंताचा हुकूम झाला आहे ह्मणून.

हंसा०—( जवळ सरून ) मग मला नेणार ना?

राम०—वेडी कोठली! बायका कां कोणी बरोबर घेतात?

हंसा०—न नेण्याला काय झालें? जिकडे आपण ति-
कडे मी!

राम०—मला कांहीं फार दिवस लागणार नाहींत. फक्त
श्रीमंतांना भेटून यावयाचें आहे!

हंसा०—मग मी आलें तर नाहीं का चालणार?

राम०—प्रिये! प्रवासाचे श्रम तुला कसे सहन होतील?
जनानखान्यांत हिंडतांना सुद्धां श्रम होतात; ह्या-
चा कांहीं विचार कर. आह्मी शिपाई गडी रोज
वीस पंचवीस कोसांच्या मजला मारणारे. थंडी वा-
ऱ्यांत पडणारे, हुरडा फांकून दिवस काढणारे, घो-
ड्यावर तर घोड्यावर, पायीं तर पायीं, जसा प्र-
संग पडेल त्या प्रमाणें वागणारे, आमच्या बरो-
बर असलीं नाजूक प्रकृतीचीं माणसें काय कामाचीं!

हंसा०—( रडून ) हीच ना आपली प्रीति! आमचा
मात्र जीव वेडा. आह्मी मात्र चातका प्रमाणें वाटे-
कडे डोळे लावून बसावें! आणि पुरुषांच्या तर तें
गांवींही नसतें! देवा! कशाला बरें हा जन्म दिलास?

राम०—प्रिये! जरा शांतपणानें विचारकर; ह्मणजे तु-

ङ्या बोलण्यांत किती सत्यांश आहे तें कळून येई-ल. आह्मीं पुरुषांनीं कष्ट सहन करावे, द्रव्य मिळ-वावें, लढाया माराव्या, उन्हां तान्हांत फिरावें, जें मिळेल तें स्त्रियांना आणून द्यावे त्यांनीं सुखा स-माधानांत घरांत बसावें! जर पति श्रीमंत असला, मना प्रमाणें वागत असला, सगळे चोजले पुरवीत असला तर त्याच्या बरोबर नुसत्या गोड बोलल्या तर बोलतील! तोच गरीब असला, बायकोचें कोड पुरविण्याचें सामर्थ्य नसलें तर त्या बिचाऱ्याला सुखाचा शब्दही मिळणार नाहीं. तरी तो तितकेही सहन करून त्या बायको बरोबर संसार करण्याला तयार असतो. इतकें करूनही बायकांचें जेव्हां ते-व्हां ह्मणणें असतें कीं "आमचा जन्म फुकट"

हंसा०—ह्या सर्व गोष्टी जरी असल्या तरी पण दुस-ऱ्याच्याच जिवावर ना?

राम०-प्रिये! आतां असें बोलून कांहीं उपयोगीं नाहीं; मला उद्यां गेलें पाहिजे बाबासाहेबांचा निरोप घे-तला; सर्व तयारी ही जाहली आहे. पहांटेस नि-घावयाचें. फक्त तुझी परवानगी मात्र घेणें आहे!

हंसा०—पुन्हां आपलें तेंच खरें! माझे मनांतून यावया-चें फार आहे!

राम०-पुढल्या खेपेस तुला घेऊन जाईन! मग तर झालें ना!

हंसा०—पण परत येणें किती दिवसांनीं होणार?

राम०-हें मला कांहीं नक्की सांगतां येणार नाहीं. फार

दिवस कांहीं नकोत. दहा बारा दिवसांत येईन!

हंसा०—पण पत्र पाठविण्याचें तरी स्मरण होईल कां!

राम०—एक दिवसा आड तुझा समाचार कळत जाईल मग आहे ना रजा!

हंसा०—नाहीं कोणीं ह्मणावें?

राम०—आतां एक साखरेचा.

हंसा०—हें काय बाई! मला लाज वाटते!

राम०लाज कसली! येथें कोण आहे!

हंसा०—आतां झोंप नाहीं का येत?

राम०—चला आतां पुन्हां पहांटे उठावयाचें आहे.

( जातात. )

---

## अंक १ ला.

### प्रवेश ३

—o—

### टिपूच्या छावणीचा बाह्य प्रदेश.

### मानाजीराव.

मानाजी—मी काम करण्याची प्रतिज्ञा तर करून निघालों! परंतु अद्याप कांहीं नीटसें जुळलें नाहीं. त्या गफूरखानाला अनुकूळ करून घेतलें ह्मणून टिपू पर्यंत तरी रिघाव झाला. नाहीं तर त्याची भेट होण्याचीच मारामार! आजचा दिवस अखेरचा आहे. एकदां काय तो सोक्ष किंवा मोक्ष झाला पाहिजे. आमच्या व्यूहाची सर्व इमारत टिपूच्या मदतीवर

अवलंबून आहे. आपण आतां तिकडेच जावें ( समोर पाहून ) हा कोणवेरें इकडे येत आहे ( नीट पाहून ) हा तर भयरू जासूद! इतक्या घाईनें कां बरें येत असावा! महाराजांना धीर कोठें निघत असेल! फारच उतावळा स्वभाव! असल्या स्वभावानें एखादें मधेंच संकट उत्पन्न व्हावयाचें ( जासूद येतो व राम राम करून कागद देतो ) ( कागद वाचीत ) काय रामराव पुण्यास गेला? बाबासाहेब एकटेच आहेत! फारच उत्तम! तो हजर असला तर कदाचित् पराजय होण्याची भीति राहणार! एकदां बाबासाहेबांचा समाचार घेतला ह्मणजे आपल्या पक्षाला बरीच मंडळी मिळण्याचा संभव आहे. ( जासूदास ) अरे मी बाहेर जाऊन येईतों पर्यंत जरा विश्रांती घे खाण्या पिण्याचीही व्यवस्था लाव मी परत आलों ह्मणजे उत्तर मिळेल.

**भयरू**—जी सरकार ( रामराम करून जातो )

**मा०**—( पुढें चालून ) आपण तर टिपूच्या छावणी जवळ येऊन दाखल झालों ( समोर पाहून ) अहो शिपाईबुवा टिपू साहेबांना आह्मीं आल्याची वर्दी द्या!

**शिपाई**—कोण आले आहेत ह्मणून सांगू!

**मा०**—पंडीत आले आहेत ह्मणून सांगा!

**शि०**—जरा आपण येथें उभें राहवें मी वर्दी देऊन येतों!

( शिपाई जाऊन परत येतो व मानाजीस घेऊन जातो)

( टिपू व गफूरखां बसले आहेत असा पडदा उघडतो. )

**टिपू०**—वह पंडित तोजिद्लेके बैठा है: मदत देवे तौभी

पंचायत है. पेशव्याके साथ अपना तह हुआ है. बाबासाहेब ये मरहट्टेके राज्यमेंके जाहागिरदार है. तह मोडे तो आजही लढाई शरू होती. हैदरसाहबके मनमे मरहट्टोके साथ लढाई करनेकी खाईश है. लेकीन् अभितक् चाहिये वैशी तयारी हुई नहीं है. तप् क्या करे इस आफतमे पडाहूं ( इतक्यांत मानाजी येतो व मुजरा करून बसतो. )

गफूरखां—क्यूं पंडितजी आपका क्या कहना है?

मा०—आमच्या मदतीला एक हजार स्वार पाहिजेत! स्वारी खर्च देण्याला आह्मीं तयार आहोंत. शिवाय एक सुंदर पाखरूं आपसाहेबांच्या जनानखान्यांत हजर करूं.

टिपू०—क्या कहते हो सुंदर चिडिया! हो! हो!

मा०—सुंदर पण सुंदर आमच्या पुराणांत अनेक सुंदर स्त्रियांचीं वर्णनं आहेत; परतु मी ज्या सुंदरी विषयीं सांगत आहे तिच्या पासंगालाही त्या लागवयाच्या नाहींत. आपल्या शास्त्रांत पऱ्या आहेत, त्या तरी कोणी पाहिल्या आहेत. काय सांगू साहेब जिच्या सौंदर्याला दुसरी जोड मिळणार नाहीं. वय सोळा वर्षांचें, लिंबा सारखी सतेज कांती, नाक डोळे कसे रेखल्या सारखे शब्द किती मधुर जें जें पाहवें तें तें मोहक, ती मनोहर मूर्ति पाहिल्या खेरीज खातरी होणार नाहीं, आपसाहेबांच्या जनानखान्यांत शेंकडों स्त्रिया असतील त्यांत सुंदरहि असतील; नाहीं असें मी ह्मणत नाहीं परंतु तेथें जी एकप्रकारची खुबी आहे ती मात्र मिळणं क-

ठीण! जिचा पाहिल्या बरोबर तहान भूक नाहींशी होतें; बरें नुसत सौंदर्यच आहे असें नाहीं तर मोठी चतुरही आहे. तिच्या बोलण्यांत तर जसें काय अमृत आहे. विनयकही तसाच! खावंद आपल्या सारख्याच्या जनानखान्यांत राहण्या करितां परमेश्वरानें ती उत्पन्न केली आहे. आपण जर आह्मांला मदत देण्याचें कबूल कराल तर असलें रत्न आपसाहेबांना मिळवून देण्याची हमी आह्मीं घेतों.

टिपू०—तुमारे उमेदको सलाह देने मै चाहताहुं लेकीन मरहट्टोंके साथ तह हुआहै उस्का क्या करे इस सोचमे मै पडाहूं.

गफू०—अजि हजूर लढाई तो कबिबी एक दिन होनेवाली है. तो फिर अभिहि शरू करनेको क्या हरज है.

टिपू०—हैदर साहबके बगैर इजाजतसे ऐसा किस तौरसे करसक्तेहो.

गफू०—हैदर साहबकी सलाह पानेको कुछभि हरज न होगी. क्यूके जो हम् ऊनको इसतौरसे लिखके जाहिर करेके घोर पडेके राज्यमे फिसादें शरू है. उनमेसे सच्चा वारस आपनेपर आपका हक्क कबूल करके हरसाल महसूल देनेकोभी मौजूद है. उसका कहनाके फौजकी मदत मिले सवारिका खर्च देनेकोभी कबूल है. इसतौरसे लिखकर भेजदेना! या नेतों इजाजत मिलीही है ऐसाही समजो.

टिपू०-शाबास गफूरखां यह इलाजतो अच्छा है. पंडितजी हैदरसाहबके तरफसे इजाजत आनेतक तुमको याहां रहना चाहि है. फौरन् जबाब आनेके

वास्ते मै कोशिस करताहूं.

मा०—खावंद रामराव पुण्यास गेला आहे तो परत आला नाहीं तों पर्यंत हें काम झालें पाहिजे.

टिपू०—कुच्छ फिकर मत करो दो दिनमे मै निकाल करताहुं. गभराना नही. तुमारे धनीको संस्थानका मालीक बनवाताहूं!

मा०—आपसाहेबांचे मोठे उपकार होतील.

गफू०—पंडितजी जो तुमारे जैसेकी काम नकरे तो फेर किसका करेगे

मा०—( एकिकडे ) गुलामानें दहा हजार रुपये घेतले तेव्हां नुस्ती भेट करून दिली काम झाल्यावर वीस हजार द्यावयाचे ते निराळेच असें असून आह्मांला स्नेही ह्मणवितो. ( उघड ) हें तर खरेंच. आपला स्नेहच तसा आहे.

टिपू०—गफूरखां तुम अभिके अभि हैदरसाहबके तरफ सांडणी सवारको भेजदो और इसका जरूर खुलासा मिलनेकेवास्ते उनसे विनतकरो. पंडितजी! दो दिनमे हम तमको जो कुच निकाल होगासो समझावे कुच फिकर मत करो. ( उठतो )

मा०—( सलाम करून ) रजा घेतों.

टिपू व गफूरखां जातात.

मा०—आज अर्धे अधिक तर काम झालेंच; परंतु आतां हैदराकडून काय उत्तर येतें तें पाहणें आहे; जर त्यानें नाकारिलें तर मात्र पंचाईत! पण असें बहुधा होणार नाहींच. फसलेंच तर मग दुसरा कांहीं मार्ग पाहतां येईल. ( जातो )

# अंक १ ला.

## प्रवेश ४

### हंसाबाई.

हंसा०—( पत्र पाहून ) " काय आम्हांस येणें महिनाभर होत नाहीं " असें कां बरें! नानांना तर सांगणें झालें होतें कीं, " आठ दहा दिवसांनीं खास परत येतों. " कां बरें राहणें झालें? तें तर कांहीं लिहीत नाहींत. मला जर पूर्वींच असें कळतें तर मी तरी येथें कशाला राहिलें असतें! कसेंही करून बरोबर गेलेंच असतें. परंतु आतां काय उपयोग! मागून मेले सर्व विचार सुचतात. मी कशी दिवस मोजीत होतें. एक दिवस गेला, आतां सातच दिवस राहिले. असे मनांत मांडे खात होतें. परंतु आतां तर येण्याचा निश्चयच नाहीं! हो पण श्रीमंतांनीं राहवून घेतलें असेल! तेथें त्यांचा काय उपाय! कोठें स्वारीवर तर नाहींना पाठविणार! अंबाबाई स्वारी लवकर परत येऊं दे! म्हणजे शंभर सुवासिनींच्या खणा नारळांनीं ओंट्या भरीन! मला तर कसें तें मुळींच चैन पडत नाहीं. खातें, पितें, सख्यांबरोबर सुखदुःखाच्या गोष्टीही सांगतें; पण सगळा जीव मात्र तिकडे लागलेला. दिवस कसा तरी जातो. पण रात्र कांहीं जातां जात नाहीं. स्वारी गेल्या पासून स्वस्थ अशी झोंप मुळींच आली नाहीं. जरा डोळा लागावा इतक्यांत कांहीं तरी स्वप्न पडावें! पुन्हां आपली जागी! ह्या कुशीवरून

त्या कुशीवर लोळत असावें! देवा! पति विरहाची बाधा कशी असते ह्याचा अनुभव इतक्या थोड्या दिवसांत मला चांगलाच भासूं लागला. मग ज्यांना वर्ष दोन वर्षे एकटें राहवें लागतें, त्यांची दशा काय बरें होत असेल! आणखी काय होणार! मज सारख्या तळमळत असतील दुसरें काय? पण मी तरी किती आपलपोटी आहें! फक्त आपल्या पुरताच विचार करितें, तिकडे नसेल का कांहीं वाटत! नाहीं असें कसें होईल बरें!

पत्राकडे पाहून ) " प्रिये तुझ्या खेरीज एकेक क्षण युगा प्रमाणें जात आहे " केव्हां एकदां तुला भेटेन असें झालें आहे! परंतु काय करूं! श्रीमंतांची आज्ञा राहण्याची जाहली. तेथें माझा इलाज नाहीं. " प्राणनाथ! खरेंच का हो तुह्माला असें वाटत असेल! कां आपले मला गोड वाटावें ह्मणूनच असें लिहितां! पण काय ही शंका! नाहीं हो नाहीं माझ्या प्राणनाथा कडून असें कधींही व्हावयाचें नाहीं मीच मेली दुष्ट! नाहीं नाहीं त्या शंका काढीत बसतें. पण माझें केवढें नशीब थोर नाहीं तर मला कोण विचारणार होतें! (इतक्यांत चंद्राबाई येतात.)

ंद्राबाई—कां वयनी साहेब! कोण विचारणार ह्मणजे आमचे दादासाहेब विचारतील!

सा०—( दचकून ) या दिवाण साहेब! तुह्मीं केव्हां आलां?

ंद्रा०—जेव्हां आपण पत्र वाचण्याच्या नादांत पूर्ण दे-

देहभान विसरला होता तेव्हांच आलें हो! तिकडू-
न पत्र आलें आहे वाटतें!

हंसा०–( पत्र देऊन ) होय! “ इतक्यांत येणें होत
नाहीं ह्मणून लिहिलें आहे. ”

चंद्रा०–ते आतां स्वत:चे मुकत्यार कां आहेत? जेव्हां
श्रीमंतांची आज्ञा होणार तेव्हां येणार!

हंसा०–पण मी आजच पत्र पाठवितें कीं, मला घेऊन
जाण्याचें करावें.

चंद्रा०–पण हें काय? तुह्माला उतावळी नाहीं का
ह्मणणार!

हंसा०–माझ्यानें कांहीं आतां राहवत नाहीं. त्याला
मी काय करूं!

चंद्रा०–हें पहा दादासाहेब तर सरदार आहेत; त्यांना
नेहमीं स्वाऱ्या शिकाऱ्यांना जावें तर लागणारच!
प्रत्येक खेपेला तुह्मांला का घेऊन जाणार आहेत!

हंसा०–हो हो न नेण्याला काय झालें!

चंद्रा०–वयनी साहेब त्या गोष्टी आतां विसरा! स्वारी
ला गेल्यावर बायकांना नेण्याची तर गोष्टच बोलूं-
नका! अहो श्रीमंत सुद्धां आपला जनानखाना ब-
रोबर नेत नाहींत! रमाबाई साहेबांचें तर श्रीमंता-
वर किती प्रेम आहे ह्मणून सांगू! रामाचें व सीतेचें
जसें प्रेम होतें तसें ह्मटलें तरी चालेल परंतु ही उ-
पमा कांहीं त्यांना बरोबर शोभत नाहीं! कारण
रामानें विनाकारण सीतेचा त्याग केला! शंकर पा-

र्वतीची उपमा द्यावी तर शंकर पार्वतीला सोडून गेले! तर मग रमाबाई व माधवराव ह्यांचे प्रेमाची तुलनाच करितां येत नाहीं. असेंच ह्मणावें हें बरें! त्या जोडप्याला परमेश्वर उदंड आयुष्य देवो.

हंसा०—खरोखर पति प्रेमापेक्षां स्त्रियांना आणखी कांहीं नाहीं. जर पतिप्रेम आहे तर कोणत्याही स्थितींत सुखानें राहण्यास कांहीं हरकत नाहीं. धन्य तें जोडपें! ज्यांच्या बद्दल लोक इतकी स्तुति करितात; जन्मास येऊन असेंच नांव मिळवून जावें;

चंद्रा०—वयनी साहेब. संसार ह्मटला ह्मणजे बायकांचा! पुरुषांना खरें सुख कायतें त्याच्या पासूनच मिळावयाचें! शहाणी बायको असते ती आपल्या पतीची अशी मर्जी संपादन करिते कीं, ज्याचें नांव तें! आपल्या नवऱ्याच्या हकिगती सांगणाऱ्या मी पुष्कळ बायका पाहिल्या आहेत; परंतु मी तर असें समजतें कीं त्या मूर्ख असतात; सत्यभामेनें राजसूय यज्ञाच्यावेळीं द्रौपदीला असें विचारिलें कीं " बाई तुह्मांला पांच पती असून ही तुह्मीं सर्वांना प्रिय कशा झाल्यात ! तुमच्या जवळ कांहीं मंत्र, मणी, औषधी तर नाहींत ना ? मला तर एक पति सुद्धां कह्यांत ठेवितां येत नाहीं. " हें तिचें भाषण ऐकून द्रौपदी ह्मणाली " मी पतीची आज्ञा कधीं मोडीत नाहीं आणखी त्यांच्या भाषणावर मी कधीं

उलटून बोलत नाहीं हाच माझा मंत्र एवढेंच काय तें माझें औषध!" वहिनीसाहेब स्त्रियांना पति हेंच दैवत. कोणताही उपासक आपल्या देवाचा क्षोभ करून घेईल काय? पोंऱ्याच्या मंजुळध्वनीला सर्पही लुब्ध होतो; मग पुरुष स्त्रियांच्या मधुर भाषणाचा अनादर कसा करितील?

हंसा०—धन्य बाई त्या स्त्रिया! त्यांनाच पतिव्रता ह्मणावें.

चंद्रा०—प्रत्येक स्त्रियांनीं जगांत धन्य ह्मणवून घेण्याचा प्रयत्न केला तर हा संसार किती मोहक होईल? व स्त्रिपुरुषांना किती सुख होईल? ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून ह्या संसाराची निंदा केली आहे त्यांना खरोखरीच हेवा उत्पन्न होईल!

हंसा०दिवाणजी! तुह्मी असल्याकीं नाहीं ह्मणजे खरोखरच आनंदानें वेळ जातो. उद्यांपासून तुह्मी रोज याल का!

चंद्रा०—हो न येण्याला काय झालें! जातें तर आतां दिवस मावळण्याची वेळ जाहली!

हंसा०—माझीही देवदर्शनाची वेळ झाली! पण उद्यां यावयाचें बरें का!

चंद्रा०—बरें आहे जातें.

( दोघी जातात. )

---

# अंक १ ला.

## प्रवेश ५ वा.

यशवंतराव.

यश०–मानाजीरावाला जाऊन आज पंधरा दिवस झाले तरी अजून काहीं वर्तमान कळत नाहीं, हें काय? नाहीं ह्मणायला एक पत्र मात्र आलें होतें. त्यांत भेट झाल्याबद्दल मजकूर होता. असें असून परत येण्याला इतका उशीर कां? त्यानें मागाहून मदत करीत नाहीं ह्मणून तर सांगितलें नसेल? पण तो तरी परत यावाकीं नाहीं? तो तर काम केल्या खेरीज परत खास येणार नाहीं! अशी माझी तर खातरी आहे. मग परमेश्वर जाणें! मला तर त्या रामरावाचा दिमाख अगदीं सहन होत नाहीं. मानाजीरावानें सांगितल्या प्रमाणें मी तर त्या ह्मातान्या बरोबर कसा गोड गोड वागत आहे. त्याच्या प्रत्येक शब्दाला माझा आपला होकार ठेवलेलाच! परंतु वेळ मात्र येऊंद ह्मणजे माझें खरें स्वरूप कसें आहे तें दाखवीन! रामराव परवां पुण्याला गेला तेव्हां त्याच्या बरोबर लवाजमा तरी किती दिला! अरे हरामखोरा! आह्माला एकीकडे लोटून आयत्या बिळावर नागोबा झालास नव्हे! हें वैभव तूं फार दिवस भोगणार नाहींस; ह्याचा वचपा सव्याज काढून घेता येईल! सिंहाचा भाग

कोल्ह्याला कधीं तरी जिरला आहे काय? हो पण समजा त्या टिपूनें मदत दिली! आह्मी इकडला सर्व कारभार आटोपिला परंतु तो कोल्हा कसा आमच्या वावडींत सांपडणार? तो तर हल्लीं पुण्यास आहे! त्याच्या बरोबर पांचशें स्वार आहेत! तरी हरकत नाहीं! परंतु श्रीमंताचा त्याला आश्रयही मिळाला आहे! तेव्हां आतां त्याचा विचार काय करावा! तो तर जगांतून नाहींसा झालाच पाहिजे! परंतु मी विचार काय करितों. ज्या ठिकाणीं सामदामाचें कांहीं चालत नाहीं त्या ठिकाणीं शस्त्र काम करितें! जेथें शस्त्रही उपयोगीं पडत नाहीं तेथें फितूर व विषाचा पेला काम करितो! पण ह्या गोष्टी मानाजी शिवाय नीट जुळणार नाहींत! तो तर अद्याप आला नाहीं! आतां कसें बरं करावें.

( इतक्यांत मानाजी येतो त्यास पाहून )

**यशवंतराव**–मित्रा! आतांच मी तुझें स्मरण केलें होतें! सांग सांग कामाचें काय झालें.

**मानाजी**–महाराज काम बिघडलें!

**यशवंतराव**–काय ह्मणतोस काम बिघडलें! मग आमचा तो सर्व व्यूह ढांसळणार आणि तो कोल्हा ह्या जहागिरीचा कायमचा मालक होणार! काय करूं रे दैवच आह्माला कसें प्रतिकूळ झालें! मित्रा मला तुझा भरंवसा कीरे होता परंतु तूं तरी काय

करणार त्या चोरांची सद्दीच तशी आहे.

**मानाजी**—महाराज! त्यांची सद्दी आतां फार दिवस टिकणार नाहीं!

**यशवंतराव**—मित्रा! तिकशीरे! कांहीं जमलें कीं काय? काय असेल तें खरें सांग उगीच मला घोंटाळ्यांत घालूं नको.

**मानाजी**—महाराज हा आपला मानाजी ज्या कामा करितां गेला तें काम केल्याखेरीज परत येईल असेंका आपल्याला वाटलें?

**यशवंतराव**—तसें नाहीं तुझ्या शहाणपणाची मला खातरी आहेच परंतु एखादे वेळेस तसेंही होण्याचा संभव असतो! ह्मणून ह्मणतो! मग काम झालें ना? एकदां हो ह्मण ह्मणजे माझे मनाला धीर येईल!

**मानाजीराव**—महाराज—काम फत्ते! परमेश्वराच्या इच्छेनें आपलें मनोरथ लौकरच पूर्ण होतील!

**यशवंतराव**—मित्रा! सविस्तर वृत्तांत ऐकण्याची माझी फार इच्छा आहे! तर सांग पाहूं!

**मानाजीराव**—आपणाला मी जें पत्र पाठविलें होतें तें पोंचलेंच असेल त्यांत भेटीचा सर्व वृत्तांत कळविलाच होता! पुढें तें सर्व प्रकरण हैदरखानाकडे गेलें त्याच्या परवानगी खेरीज टिपूला पर राष्ट्राशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्याची सक्त मनाई आहे. हैदराच्या मनांत मराठे लोकांबरोबर लढाई करून गेलेला मुलूख मिळविण्याची इच्छा

होतीच व त्याचे प्रयत्नही चालले होते. मागल्या लढाईंत पराजय झाल्यापासून त्यानें फरान्सिस चाकरीस ठेवून साठ हजार कवायती सैन्य तयार केलें! त्याच प्रमाणें उत्तम प्रकारच्या चारशें तोफा ही ओतविल्या; व दारुगोळाही तयार करून ठेविला आहे. तो प्रसंगाचीच वाट पहात होता. टिपू कडून हे प्रकरण तिकडे गेल्याबरोबर त्याला आयतीच संधी मिळाली. त्यानें लगेच टिपू साहेबाला आह्माला मदत करावी ह्मणून हुकूम केला.

**यशवंतराव**—किती सैन्याची मदत मिळणार.

**मानाजी**—गफरखानाबरोबर दोन हजार स्वार देऊन टिपूसाहेबानें त्याची रवानगी मजबरोबर करून दिली.

**यशवंतराव**—तर मग तो उतरला आहे कोठें?

**मानाजी**—त्यांचा मुक्काम येथून तीन कोसांवर आहे. आजच्या आज सर्व व्यवस्था लावावयाची असा संकेत ठरवून मी आपल्या भेटीला निघून आलों.

**यशवंतराव**—वाहवा फारच उत्तम! शाबास! खूप मजा केलीस! चलातर आतां आपल्या तयारीला लागूं. पण मित्रा त्याची व्यवस्था कशी लावावयाची! तो तर पुण्यास आहे!

**मानाजी**—महाराज! त्याची काळजी आपल्याला नको. मराठे लोकांचे हैदराबरोबर युद्ध सुरू होणार! श्रीमंतांचे सरदार युद्ध करण्या करितां जाणार

त्यांच्या बरोबर रामरावानेंही युद्धाला जावें अशी व्यवस्था तर आपण लावून ठेविली आहे. एकदां का तो समर भूमीवर दाखल झाला ह्मणजे टिपूच्या मदतीनें त्याचा समाचार घेण्याला आपल्याला मुळींच कठीण पडणार नाहीं. कदाचित् तो लढाईवर न जाता आपल्या सैन्यासह इकडेसच परत आला तर त्याचा समाचार आपणच घेऊं! इतक्याही गोष्टी जर कदाचित् साधल्या नाहीतच तर एखादा कपट प्रयोग योजितां येईल! आतां मात्र आपणाला उद्योगाला लागलें पाहिजे-संस्थानांतील कांहीं लोक आपणाला अनुकूल आहेतच! त्यांचाही सल्ला ह्या कामांत घेतला पाहिजे!

**यशवंतराव०**—कसेंही करून तो ह्मातारा माझ्या हातून निजधामास गेला पाहिजे. त्यानें माझे सर्व हक्क पायांखालीं तुडविले आहेत!

**मानाजीराव**—महाराज आपल्याला काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या मर्जी प्रमाणें सर्व गोष्टी घडून येतील.

**यशवंतराव**—तुझ्या सारखा मित्र सहायकारी असतां मला काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं!

**मानाजीराव**—महाराज. चला आतां त्याच उद्योगाला लागूं!

**यशवंतराव**—मित्रा पण ती वेळ कोणती ठरली आहे.

**मानाजी**—संध्याकाळीं त्यानीं शहरावर हल्ला करण्या करितां यावें असा संकेत ठरविला आहे.

यशवंतराव-चला तर!

मानाजी-ठीक आहे चलावें.

( जातात. )

---

# अंक १ ला.

## प्रवेश ६ वा.

हंसाबाई व चंद्राबाई

हंसाबाई-आज मला मेलें कसेसेंच वाटतें!

चंद्राबाई-कां बरें असें वाटतें?

हंसाबाई-आज कोंनाई दोनप्रहरी सहज आपली पडली होते. इतक्यांत डोळा लागला. काय बाई सांगूं अजून सुद्धां माझ्या उरांत धडकी भरली आहे. काय तें स्वप्न! मी आपली ओरडतच उठलें.

चंद्राबाई-अहो असें तुह्माला स्वप्न तरी काय पडलें? मला सांगा तर खरें.

हंसाबाई०-माझा नुकताच कोठें डोळा लागत होता, इतक्यात एक मनुष्य माझ्या माहालांत शिरला; काय बाईतरी त्याचें स्वरूप! सर्वांग रक्तानें भरलें होतें. आणि हातांत नग्न तरवार होती चेहरा तर इतका उग्र दिसत होता कीं, तो पाहातांच माझी

तर बोबडी वळली. तो मोठ्या रागांत आहे. असा दिसत होता. आंत येऊन एकदम दरडाऊन तो मला ह्मणाला; चल ऊठ माझ्या माहालांत निजणार, तूं कोण? चल नीघ येथून. असें ह्मणून तो मजकडे येऊं लागला; बाई काय सांगू तो पुढें आल्या बरोबर मी मोठ्यानें किंकाळी मारली; त्या बरोबर मालती बाहेरच होती, ती लागलीच धांवत आंत आली; ती आंत येऊन पाहते तों मला शुद्ध नाहीं असें पाहून माझ्या आंगावर गुलाब पाणी शिंपलें! वारा घातला, तेव्हां मी जरा सावध झालें. मग मला ती विचारूं लागली; बाईसाहेब! आपण एकाएकीं कां ओरडला! आपली अशी अवस्था कशानें झाली! पण मला तर कांहीं सांगतां येईना मग बराच वेळ गेल्यावर मी चांगली हुशार झालें. परंतु चैन पडेना ह्मणून आपल्याला बोलावणें पाठविलें.

**चंद्राबाई**—वयनी साहेब! स्वप्नाचें तें काय इतकें म्यावयाचें! अशीं तर रोज पडतात; ह्मणून तीं खरींका कधीं होतात.

**हंसाबाई**—मला नव्हतें बाई असें कधीं स्वप्न पडलें! अहो तशीं स्वप्नें पुष्कळ पडतात खरीं, पण हें तर बाई कांहीं विलक्षणच! तें मनांत आलें ह्मणजे काळीज धडधडतें! आणि काल पासून उजवा डोळाही लवत आहे काय होईल न कळे! मी आपले कडून पुष्कळ प्रयत्न करितें परंतु मनांत

फार वेडे वेडे विचार येतात; त्यामुळें फार हुर हुर लागली आहे.

**चंद्राबाई**–त्यांत कसली हुर हुर! तशांतून वाटलेंच तर गुरुजींना सांगून शांती करवावी ह्मणजे झालें!

(इतक्यांत पडद्यांत बार होतात व गलबला ऐकूं येतो)

**हंसाबाई**–( घाबरून ) अग बाई! हे बार कसले होतात! ( कान देऊन ) आणि हा गलबला कसला! देवा! आजचा दिवस कांहीं विपरीत दिसतो आतां ते बार तर जवळच ऐकूं येऊं लागले! अंबाबाई काय करशील तें खरें! दुःश्चिन्हें तर मला भिववीत आहेत! दिवाण साहेब हा काय बरें प्रकार असावा?

**चंद्राबाई**–माझातर बाई कांहीं तर्क चालत नाहीं!

**हंसाबाई**–कोणी शोध घेण्याला तरी पाठवा!

**चंद्राबाई**–मी गच्चीवर जाऊन येतें!

( इतक्यांत घाबऱ्या घाबऱ्या मल्हारी येतो. )

**मल्हारी**–बाईसाहेब उठाहो उठा! मोठा घात झाला! स्वस्थ काय बसलां! शत्रूनें काय अनर्थ करून सोडिला आहे!

**हंसाबाई**–काय ह्मणतोस काय! शत्रू कोण! घात कसला! असा घाबरलास कां? काय असेल तें नीट तरी सांग.

**मल्हारी**—बाईसाहेब सांगायाला इतका अवकाश नाहीं! बचावाची कांहीं तरी तयारी केली पाहिजे! शत्रू तर राजवाड्यांत येऊन पोंहचला आहे!

**हंसाबाई**—अरे पण शत्रू तरी कोण! हें तर सांगशील!

**मल्हारी**—बाईसाहेब काय सांगू! कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी अवस्था झाली आहे. अहो तो यशवंतराव मुसलमानांना बरोबर घेऊन येथें आला आहे.

**हंसाबाई**—अग बाई! कोण प्रसंग हा! अरे बाबा साहेबानां तरी जाऊन सांग!

**मल्हारी**—बाईसाहेब! आतां काय सांगू! ( रडूं लागतो. )

**हंसाबाई**—अरे असा रडतोस कां! रडायला काय झालें!

**मल्हारी**—बाईसाहेब रडूं नको तर काय करूं! त्या दुष्टानें बाबासाहेबांना ठारकींहो मारिलें!

**हंसाबाई**—काय ह्मणतोस तरी काय! देवा कोण हा प्रसंग! बाबासाहेब! आह्मांला टाकून कसहो गेलां! आतां माझें रक्षण तरी कोण करणार! मी आतां कोणाचा आश्रय करूं!

**मल्हारी**—बाईसाहेब! शोक करण्याची ही वेळ नव्हे! आलेल्या प्रसंगाला पाठ दिली पाहिजे! शत्रू जामदारखान्याची व्यवस्था लावण्यांत गुंतला

आहे. इतक्यांत आपण येथून निघून जावें हें उत्तम!

**हंसा०**—तर मग मी आतां काय करूं! मला तर कांहीं सुचत नाहीं!

**मल्हा०**—बाईसाहेब त्याची व्यवस्था मी पूर्वींच लावून आलों आहे! बाहेर घोडा तयार करून ठेविला आहे! आपण घोड्यावर बसून माझ्या मागून चलावें! वाड्याच्या मागच्या बोळानें आपण निघून जाऊं!

**हंसा०**—हं चला तर मजकडून तयारी आहे. पण वाटेंतच कांहीं प्रसंग आला तर मग कसें!

( इतक्यांत यशवंतराव हातांत नग्न तरवार घेऊन शिपांया सह येतो. )

**मल्हा०**—बाइसाहेब! आपला सर्व बेत फुकट गेला! तो पहा इकडेच आला.

**यशवंतरा०**—कोण तो मल्हारी! गुलामा तुझें येथें काय काम! कशालारें येथें आला होतास! पाजी नाहीं तर! लुबरा गुलाम! चल नीच! (लाथ मारितो)

**मल्हा०**—सरकार कृपा करा! मारूं नका! मी जातों आपला!

**यशवं०**—जा तर! अरे अजून उभा! ( पुन्हां लाथ मारून ) जा जा!

**मल्हा०**—सरकार०—मी निघालों पण!

**यशवं०**—हा चोर जात नाहीं! बांधारे ह्याच्या मुसक्या ( शिपाई तसें करितात. )

यशवं०—हंसाबाई! चला उठा! जागा रिकामी करा!

हंसा०—मला कोठें जायला सांगता!

यशवं०—तें मागाहून कळेल!

हंसा०—मी येथून कांहीं हालणार नाहीं! तुह्माला जें काय करावयाचें असेल तें येथेंच होऊंद्या! वः चांगलेच दिवे लाविलेत! ज्यांनीं हातात्रोटावर खेळविलें त्यांचे उपकार चांगले फेडलेत!

यशवं०—आपले हे विचार पुरे करा!

हंसा०—मला कांहीं भीति दाखवावयाला नको!

यशवं०—काय-ह्मणतां आपण, भीति नको! अगे भिकारडे चल निघ बाहेर! हा कोणाचा महाल! तुझ्या बापाचा आहे कीं काय! चल नीघ येथून!

हंसा०—कोणाचाही असो! पण मी येथून तसूभर सुद्धां हालणार नाहीं.

यशवं०—असें काय! तसूभर सुद्धां हालणार नाहीं! पाहतों आतां! भिकारडे त्या तुकडे मोड्याची बायको झालीस नव्हे! मी नकोसा झालों! भोग आपल्या कर्माचीं फळें! ( वेणी धरून ओढतो. )

हंसा०—नका हो नका असा माझा छळ करूं! मी असा आपला काय अपराध केला आहे! सोडा हो सोडा! कळ लागली हो! केंस तडतडतात! पायां पडतें! नका मला त्रास देऊं! देवा! नाहीं नाहीं ह्या निर्दयाला दया येत! मेल्या काळतोंड्या तुझा सत्यानास होईल! कोठें पातकें फेडशील! अयाई! देवा रे देवा! सोडाहो मला! मी तुमच्या

पायां पडतें! कां मला छळितां? नाहीं हो मला आतां सोसत! एकदम जीव तरी घ्या! पण असे हाल कां करितां?

**यशवं०**—चल नीघ!

**हंसा०**—मला कोठें घेऊन जातां?

**यशवं०**—त्या मुसलमानांच्या छावणींत!

**हंसा०**—नकाहो नका! असे निष्ठुर होऊं नका! मला तिकडे कोठें पाठवितां? मी तुमच्या घराण्यांतली तर खरीना? मगहो मुसलमानाच्या छावणींत कशी जाऊं!

**यशवं०**—तें कांहीं होणें नाहीं. तुला तेथेंच गेलें पाहिजे!

**हंसा०**—दया कराहो! असलें अभद्र बोलूं नका!

**यशवं०**—बस बस. हें तर झालेंच पाहिजे! अरे दुष्टा माझा हक्क हिरावून घेतोस नव्हे! चल. ( तिचे केंस धरून ओढीत दरवाज्यापर्यंत नेतो. )

**हंसा०**—धांवा हो धांवा! हाय हाय!! आतां माझें कोण रक्षण करील? मेल्या कसाबा तुला कांहीं कांरे दया येऊं नये? मी पायां पडतें! पदर पसरतें, नांक घांसतें, मी रागांत वाईटसाईट बोललें असेन; परंतु दया करा; मला पुण्यास जाऊं द्या.

**यशवं०**—काय? पुण्यास! तुला पुण्यास पाठवूं? पाठवितों बरें! कोण आहेरे? तिकडे हिला गफूरखानाच्या छावणींत घेऊन जा!

( हंसा किंकाळी फोडते. शिपाई घेऊन जातात. )

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थल पुणें.

### रामराव घोरपडे.

**रामराव**–( हातांत पत्र घेऊन येतो ) काय करूं रे? दुष्टांनों! मी तेथें नाहीं अशी संधी साधून तुह्मीं असा घात केला कांय? असें कर्म करितांना तुह्मांला कांहींच का रे दया आली नाहीं? दुष्टच ते; त्यांना कसली दया! हे अधमांनों! आतां तुह्मी माझ्या तडाक्यांतून कोठें जाल? तुह्मांला कोणाचीच भीति नाहींशी झाली काय? पण ध्यानांत ठेवा; माझ्या पित्याच्या मरणाला दुष्टांनो तुह्मी कारण झालां अहां! तुमचीं पाळेंमुळें खणून काढीन! तुमचा पुरा सूड घेतल्याखेरीज ही माझी समशेर म्यानांत घालणार नाहीं! ‘ सूड सूड ’ हाच आतां मी जप करणार! अरे अधमा चांडाळा यशवंत्या! ज्यानें तुजवर मुलाप्रमाणें प्रेम ठेविलें, त्याचा वध तूं स्वतः केलास अं! धिःकार असो तुझ्या कृतघ्नतेला! अरे मनुष्या! ह्या कृत्यानें घोरपड्याच्या विमल वंशाला आज कालिमा कीं रे आणिलास! अरे! राज्याकरितां मारेकऱ्याचा धंदा पत्करिलास! थुः तुझ्या तोंडावर! बाबासाहेब! तुमचा अंत असा व्हावा काय? तुम-

च्या आंगाला त्या नीचानें स्पर्श करावाना! तुह्मी प्राणसंकटांत असतां मजकडून कांहींच कोंहो मदत झाली नाहीं? बाबासाहेब! आतां तुह्माला कोठेंहो पाहूं? मजवर आतां दया कोणहो करील! बाबासाहेब! ज्या नरपशूंनीं हें अघोर कर्म केलें त्यांच्या रक्ताची जलांजुली अर्पण करीन तरच नांवचा होईन. ( पत्र पाहून ) माझ्या प्रियेचेंही हरण केलें! तिला फरफरा ओढिलें काय? काय करूं-रे! कोण हा प्रसंग!! प्रिये! तूं आपल्या महालांत असतां त्यानें तुझा असा छळ केला अं! तुझ्या ओ-रडण्याकडे विनवण्याकडे, देखील त्यानें लक्ष दिलें नाहीं काय? प्रिये! धीर धर. ह्या अपमानाचा पक्का सूड घेईन. पातक्यांनों! आतां माझा कोपानळ तुमची आहुती घेतल्याखेरीज शांत होणार नाही. त्या टिपूनें मदत केली काय? अरे नोडग्या कृतघ्ना अरे तूं देखील सर्व उपकार विसरलास काय? जेव्हां बाबासाहेबांच्या तडाक्यांत सांपडला होता-स, तेव्हां तुझा समाचार त्यांना घेतां आला नसता काय? परंतु मराठे आपल्या धर्माला स्मरले! शर-णागताला अभय देणें हा सुक्षत्रियांचा धर्म! तु-ह्मा यवनांनां कसला धर्म? परंतु कांहीं तरी वि-चार करावयाचा होता. दुष्ट संगतीचा महिमाच असा! तुलाही ह्याचीं फळें भोगावीं लागतील! हे दीनदयाळ प्रभो! माझ्या प्रियेचें रक्षणकर्ता तूंच आहेस! प्रिये! जेव्हां त्या दुष्टांनीं तुजवर हा प्र-संग आणिला तेव्हां तुझी दशा काय बरें झाली

असेल? रडली असेल बिचारी! दुसरें काय करणार? ह्या दुःखाचा प्रतिकार अवश्य केला पाहिजे. श्रीमंतांच्या कानावर हा मजकूर घालून त्यांची आज्ञा घेऊन त्या अधमांचा सूड घेण्याच्या उद्योगाला लागलें पाहिजे. आतां तिकडेच जावें.

( जातो. पडदा पडतो. )

---

( इतक्यांत माधवराव येतात. )

**माधवराव**—राजे फार सुखी असतात असें लोकांनां वाटत असेल; परंतु हा त्यांचा निव्वळ भ्रम आहे. त्यांना ज्या विवंचना असतात त्या त्यांनां काय माहीत? गुलाबाचें झाड दुरून मोठें रमणीय दिसतें, फुलाला रंग व रूप कसें मनोरम असतें, सुवासही मोठा मधूर! भ्रमरांचें निवास स्थान असें ह्मटलें तरी चालेल! परंतु त्याला कांटे असतात हें मात्र विसरतां कामा नये! राजे लोकांचा बाहेरचा डामडौल व इतमाम पाहून प्राकृत पुरुष सर्व सुखाचें आगर हें राज्यपद आहे असें मानितात; परंतु जे त्या पदाचा उपभोग घेत असतात त्यांनां त्याचें खरें वर्म समजतें! आज माझ्या हातांत सत्ता आहे! ऐश्वर्य आहे! मनाजोगी स्त्री आहे? परंतु माझे मनाला कोठें स्वस्थपणा आहे! शिवाजी महाराजांनीं मराठे पातशाहीची प्राणप्रतिष्ठा केली; बाजीरावसाहेबांनीं तिचा विस्तार केला; नानासाहेबांनीं तिला चिरायू करण्याचा घाट घातला. परंतु मराठे लोकां-

च्या दुर्दैवामुळें पानिपतच्या मैदानांत जो संग्राम झाला, त्याच्या योगानें तिला मोठाच धक्का बसला. सिंधू नदींत दक्षिणी घोडे पाजण्याची जी आमची धांव होती, ती तर जागच्या जागीं राहिली. चंबळेच्या उत्तरेस आमचा अम्मल नांवाचा मात्र होता. मराठेशाईवर मोठाच प्रसंग गुजरला होता. आणीबाणीच्या प्रसंगांतून पारपडण्याला अनुभविक मनुष्य लागतें. नानासाहेबांसारखे अनुभाविक मुत्सद्दीसुद्धां थक्क होऊन गेले. त्यांच्यामागें सर्व पोरांडें झालें. येऊन जाऊन दादासाहेब जुने व अनुभविक; परंतु त्यांचे विचार तर अगदींच विपरीत! कसा बसा गृहकलह मिटला; दादासाहेबांची समजूत पडली; निजामसाहेबही जेरीस आले; उत्तर हिंदुस्थानांत शिंदे व होळकरांचा पूर्ण अम्मल बसला; आह्मी दक्षिणेकडे स्वारी करून कडपा व सावनूर येथील नबाबांचा समाचार घेतला; हैदराचीही खोड मोडली; परंतु त्याची खुमखुम मात्र अजून पूर्ण जिरली असें नाहीं! पुढें मागें त्याच्या बरोबर कटकरीचा प्रसंग येणारच!

( भालदार त्रिंबकराव मामा आल्याची वर्दी देतो व मामा येतात. )

**माधवराव**—त्यांनां घेऊन ये.

**भालदार**—जी सरकार ( जातो व मामा येतात. )

**माधवराव**—यावें मामासाहेब! आज काय डांकेतून खबर आली आहे?

**मामा०**—सरकार कर्नाटकांतील सुभेदारांकडून पत्रें आलीं आहेत; त्यांत ते लिहितात कीं, सरहद्दीवर हैदरच्या सैन्यानें फारच पुंडावा मांडला आहे. सरकारांतून लौकर बंदोबस्त न झाल्यास मुलूख उजाड होण्याची वेळ आली आहे!

**माधवराव**—काय मामा! हैदरानें तह मोडला ह्मणावयाचा तर!

**मामा**—होय. हें तर उघड दिसतें!

**माधवराव०**—श्रीमंताच्या रयतेला त्रास देण्याला तो तयार झाला अं! त्याला आपल्या सामर्थ्याची मोठी घमेंड वाटत असेल; परंतु त्याला हें कसें समजलें नाहीं कीं, मराठे वीरांपुढें आपल्याला नाक घांसावें लागेल ह्मणून! माझा तर निश्चय झाला आहे कीं, ह्या बंडवाल्याची आतां पक्की खोड मोडल्याखेरीज परत ह्मणून यावयाचेंच नाहीं.

**मामा**—मला देखील असेंच वाटतें! तो फारच उन्मत्त झाला आहे! त्याच्या बोलण्यांत तर मुळींच प्रमाण नाहीं!

**माधवराव**—ह्यापुढें तो कधींही मराठे लोकांबरोबर दंडेलपणा न करील अशी त्याला जरब दिली पाहिजे! सर्व सरदार लोकांनां पत्रें पाठवा! पटवर्धन सरदारांनां एकदम हैदराच्या प्रांतांत बेचिराक करण्याचा हुकूम करा. तुह्मी हुजुरात घेऊन ताबडतोब त्यांच्या भेटीला जा. मागाहून मी सर्व सरदारांची रवानगी करून देतों.

( इतक्यांत रामराव घोरपडे येतो. )

[library stamp]

**रामराव**–( मुजरा करून उभा राहतो. )

**माधवराव**–कां रामराव! तुह्मी [illegible] इकडे कोणीकडे?

**रामराव**–( हात जोडून ) सरकार! मी इकडे आल्यावर आमच्या संस्थानांत मोठीच धालमेल झाली!

**माधवराव**–काय धालमेल! ती कोणती!

**रामराव**—यशवंतरावानें टिपूच्या मदतीनें शहरावर हल्ला केला. आमच्या लोकांनीं बराच प्रयत्न केला; परंतु शत्रूची संख्या मोठी असल्यामुळें पाहरेकऱ्यांचें कांहीं चाललें नाहीं! बाबासाहेबांची प्रकृती नादुरुस्त असल्यामुळें ते वाड्यांतच होते! पहारेकऱ्यांचा पराजय करून शत्रूचे लोक दौड करून वाड्यांत गेले! तेथें यशवंतरावानें स्वहस्तें बाबासाहेबांनां ठार केलें! ( रडूं लागतो. )

**माधवराव**–फारच वाईट गोष्ट झाली! तो यशवंतराव इतका उन्मत्त झाला काय?

**रामराव**–त्यानें सर्व संस्थानचा कबजा आपल्या ताब्यांत घेतला. आमच्या कुटुंबाच्या मंडळींची वाताहत केली.

**माधवराव**—तुमच्या शत्रूला योग्य शिक्षा करण्याचा तुह्माला अधिकार आहे. सरकारांतून तुह्माला योग्य मदत मिळेल. हैदराबरोबर लढाई लौकरच सुरू होईल. त्रिंबकराव मामा हुजुरात घेऊन हैद-

रावर जाणार. तुह्मीही त्यांच्या बरोबर जावें. मामा तुमची सर्व व्यवस्था लावून देतील.

**रामराव**–ह्या पायांखेरीज मला दुसरा आधार नाहीं!

**माधवराव**–तुह्मी वाईट वाटूं देऊं नका. तुमचा बंदोबस्त योग्य रीतीनें सरकारांतून होईल.

**मामा०**–आजच कूच करण्याचा हुकूम कारितों. विलंब मुळींच उपयोगाचा नाहीं!

**माधवराव**–होय, असेंच झालें पाहिजे!

**रामराव**–माझी एक विनंति आहे!

**माधवराव**–बोला काय ती.

**रामराव**–ह्या मोहिमेंत मला स्वतंत्र कामगिरी असावी हुजुरातीचे दहाहजार स्वार जर माझ्या ताब्यांत देण्यांत येतील तर मी टिपूचा समचार घेईन!

**माधवराव**–ठीक आहे! मामासाहेब! ह्यांच्या मर्जीप्रमाणेंच व्यवस्था लावून द्या!

**मामा०**–सरकार! आतां आह्मी रजा घेतों. अजून बरींच कामें आटपावयाची आहेत!

**माधवराव**–ठीक आहे!

( मामा व रामराव मुजराकरून जातात. माधवराव असतां पडदा पडतो. )

---

# अंक २ रा.

## प्रवेश २ रा.

रमाबाई व दुर्गाबाई.

रमाबाई—कां दुर्गाबाई! तुमच्या यजमानांचें केव्हां पत्र आलें होतें?

दुर्गाबाई—दोन दिवस झालें!

रमा०—खुशाल आहेतना?

दुर्गाबाई—खुशाल आहेत; परंतु मनाला स्वस्थपणा मात्र नाहीं.

रमा०—कां बरें?

दुर्गा०—तिकडे फार धुंडावा माजला आहे; नेहमीं फिरावें लागतें कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल ह्याचा नेम नाहीं.

रमा०—ह्मणजे असा कोणता प्रसंग आहे?

दुर्गा०—हैदराचा भरंवसा काय? तो केव्हां बदलेल ह्याचा काय नेम? टिपूनें तर ब्राह्मणधर्माचा उच्छेद मांडिला आहे. नरगुंदकरांचीं बायकामुलें धरून नेलीं! रामराव घोरपड्याच्या बायकोचीही तीच अवस्था! बाबासाहेब घोरपड्याची जहागीर आपल्या मेहरबानींतल्या मनुष्याला दिली. लिहिलें तात्पर्य, तिकडे सध्यां धामधूम चालू आहे असें आहे.

रमा०—काय रामरावाच्या बायकोला धरून नेलें? अरेरे! फार वाईट झालें! बिचारीचें लग्न होऊन अजून दोन महिने सुद्धां झाले नसतील! रुपानें तर फारच सुरेख आहे असें ह्मणतात. रामराव तर येथें आहेत!!

दुर्गा०—कोणावर काय प्रसंग येईल ह्याचा कांहीं नेम नाहीं!

रमा०—सरकारांतून लौकरच बंदोबस्त होईल!

दुर्गा०—मला कांहीं चैन पडत नाहीं. पत्र आल्यापासून सारखी हुरहुर लागली आहे!

रमा०—कसें बरें वाईट वाटणार नाहीं? सरहद्दीवर आमच्या फौजा आहेतच बंदोबस्ताला; वेळ लागणार नाहींच.

दुर्गा०—पण जर तो हैदरच उठला तर स्वारीच करावी लागेल.

रमा०—मला बाई अजून कांहीं समजलें नाहीं. मी आज सर्व विचारीन.

( इतक्यांत माधवराव येतात व दुर्गा निघून जाते. )

रमा०—( उभी राहून ) हें काय? आज भलतेच वेळीं कां येणें जाहलें?

माधवराव—आपल्या गोष्टींत व्यत्यय आला कीं काय?

रमा०—आपल्यापेक्षां कां गोष्टी जास्ती? कांहीं तरी बोलावयाचें!

**माधवराव**—आतां उभें राहून किती वेळ बोलावयाचें

**रमा०**—मग बसावें?

**माधवराव**—आह्मी मात्र बसावें! तुह्मी उभ्याच राहणार कीं नाहीं!

**रमा०**—( हंसून ) मीही बसेन.

**माधवराव**—( हात धरून कोंचावर बसवितात व आपणही बसतात ) आतां कसें दिसतें?

**रमा०**—दिसायचें काय? पण आज भलतेच वेळीं येणें कसें झालें? अगबाई! चेहरा देखील उतरलेला दिसतो!

**माधवराव**—असलें रत्न जवळ असतां चेहरा उतरण्याचें काय बरें कारण?

**रमा०**—थट्टा पुरे. मला आपलें असें वाटलें ह्मणून विचारिलें!

**माधवराव**—प्रिये काय सांगूं? बाबासाहेब घोरपड्याच्या मरणाची वार्ता ऐकिल्यापासून मला अगदीं चैन पडेना; ह्मणून इकडे आलों.

**रमा०**—एकेक ऐकावें तों आपलें नवेंच! घोरपड्यांच्या घराण्याचें पक्कें दुर्दैव ओढवलें!!

**माधवराव**—आपल्याला कांहीं समजलें आहे कीं काय?

**रमा०**—रामरावाच्या बायकोला टिपूनें धरून नेलें! ह्मणून आतांच दुर्गाबाई सांगत होती!

**माधवराव**—दुर्गाबाई कोण?

**रमा०**—कर्नाटकांतील सरसुभ्यांची बायको.

**माधवराव**—असें काय? मग ती काय सांगत होती?

**रमा०**—तिकडे काय टिपूनें दांडगावा मांडिला आहे! नरगुंदकरांची बायकामुलें धरून नेलीं! रामरावाच्या बायकोला नेलें असें ऐकून तर मला बाई फारच वाईट वाटलें!! नुकतेंचहो तिचें लग्न झालें होतें! तिची सुटका लौकरच झाली तर बरें! नाहीं तर त्या बिचारीवर काय प्रसंग गुजरतील परमेश्वर जाणे!

**माधवराव**—ह्याबद्दल मामाजवळ आतांच विचार होऊन ते आजच निघून जाणार.

**रमा०**—मला बाई कोणाचें दुःख पाहवत नाहीं. सर्वांनीं आनंदानें असावें असें वाटतें.

**माधवराव**—ह्मणूनच मी आपल्याला धन्य मानितों! माझ्या प्रजेवर कोणी जुलूम, जबरी करूं नये, तिला योग्य न्याय मिळावा ह्मणून मी किती जपतों! मग माझ्या सरदाराची बायको शत्रूनें नेली ही गोष्ट मला कशी सहन होईल? प्रिये! मी त्या शत्रूचा पुरा सूड घेतल्याखेरीज राहणार नाहीं.

**रमा०**—पण रामरावाच्या बायकोची लौकर सुटका होईल असें होईल कां?

**माधवराव**—हो. न होण्याला काय झालें? त्या कामावर रामरावाचीच योजना केली आहे. ह्मणजे त्याचा पराक्रम तरी समजेल!

**रमा०**—कोठून तरी त्या बिचारीची सुटका झाली ह्मणजे झालें!

**माधवराव**—प्रिये दरबाराची वेळ झाली! आज पुष्कळ महत्वाचीं कामें करावयाचीं आहेत.

**रमा०**—बोलण्याच्या नादांत विडा सुद्धां दिला नाहीं!

**माधवराव**—हा चेहरा पाहिला ह्मणजे सर्व पोंहचलें!

**रमा०**—( विडा देऊन ) पुरे! इतकें नको कांहीं चढवायला.

**माधवराव**—मी ह्मणतों ह्यांत कांहीं तरी असत्य आहे कां?

**रमा०**—असें कोणी ह्मणावें?

**माधवराव**—( उठून ) रजा घेतों बरें. पण एक!

**रमा०**—जा गडे! ही काय मेली थट्टा! वेळ नाहीं अवेळ नाहीं!

**माधवराव**—ह्याला कां वेळ अवेळ पाहवी लागते? ( मुक घेतो )

**रमा०**—अखेर आपलेंच ह्मणणें खरें करावयाचें.

**माधवराव**—जातों बरें.

**रमा०**—मी पर्वतीला जात्यें.

**माधवराव**—पण लौकर याल ना?

**रमा०**—होय.

( जातात. )

# अंक २ रा.

## प्रवेश ३ रा.

### स्थळ-टिपूची छावणी.

हंसा०-( डोळ्यांत पाणी आणून ) आतां म्यां काय करावें? प्राणनाथ! आपल्या पायांच्या दर्शनाला अंतरल्यें ना? आतां आपलें दर्शन मला दुर्लभ झालें ना? देवा! काय माझी स्थिति! आई नाहीं, बाप नाहीं, सासरा नाहीं, प्राणनाथांचें दर्शनसुद्धां दुर्लभ जहालें! मी अभागी करंडी जन्मास तरी कशाला आल्यें? अजून माझे धिंडवडे काय काय होणें आहेत परमेश्वर जाणे! येथें माझें रक्षण कोण करील? मायेचें माणुस तरी कोण आहे? प्राणनाथ! ह्या आपल्या लाडकीची अशी अवस्था व्हावीना? त्या मेल्यानें माझी विटंबना मांडली आहे! हे माते जोगेश्वरी! ह्या मुलीवर दया असूं दे. तुझ्याखेरीज मला कोणाचा आधार नाहीं. प्राणनाथ तर दूर राहिले! बाबासाहेबांची ती तशी दशा झाली! संकटें येऊंलागलीं ह्मणजे अशीं येतात!! प्राणनाथ! मला बरोबर घेऊन गेला असता तर हा प्रसंग कशाला आला असता? पण तेव्हां कोणाला स्वप्न कां पडलें होतें? असें ठाऊक असतें तर मला सोडून जाणें तरी कसें झालें असतें? ही माझी स्थिति ऐकून तिकडे काय बरें वाटलें असेल? माझ्या मुक्ततेच्या विचारांत असती-

ल कां? कसे त्रें नसतील? मजवर त्यांची प्रीति नाहीं कां? नाहीं असें कोण ह्मणेल? प्राणनाथ माझी सुटका लौकर झाली नाहीं तर मी कांहीं फार दिवस जीवंत राहणार नाहीं. माझें सर्व लक्ष आपलेकडे आहे. पण आपल्याला ही हकिगत समजेल तेव्हां ना? पण माझी सुटका कशी होणार? त्या मेल्यानें भलताच कांहीं प्रकार केला तर मी काय करूं? ह्या धटिंगणा पुढें माझें काय चालणार? देवा! असला प्रसंग येण्यापेक्षां मरण पत्करलें. पण तें तरी आलें पाहिजेना? ( रडूं लागते )

( इतक्यांत फातिमा येते. )

**फातिमा**—बाईसाहेब अशा रडतां कां?

**हंसा०**—रडूं नको तर काय करूं?

**फातिमा**—बाईसाहेब! येथें तुझाला दुःख होणार नाहीं; सुखच भोगाल. मग आमचें स्मरण देखील राहणार नाहीं!

**हंसा०**—शत्रूचे घरीं ग कसलें सुख?

**फातिमा**—आपले बरोबर कांहीं आमच्या धनीसाहेबांचें शत्रुत्व नाहीं! असल्या सुंदर माणसांवर रागावण्या इतके आमचे धनी कांहीं मूर्ख नाहींत!

**हंसा०**—ह्मणूनच ग बाई रडूं येतें! शत्रुत्व असतें तरी पुरवतें! शत्रू काय करणार? फार झालें तर ठार मारील, हाल करील, ह्या पेक्षां तर कांहीं जास्ती करणार नाहीं!

फतिमा—बाईसाहेब! आमचे धनी आपल्यावर इतके खुष झाले आहेत कीं त्यांनां कांहीं सुचत नाहीं. केव्हां पाहीन असें त्यांनां झालें आहे. ह्मणून ह्मणतें आपण रडतां कां? आतां आपल्याला कोण त्रास देणार आहे?

हंसा०—नको ग बाई असले शब्द बोलूं!

फतिमा—बाईसाहेब! पहिल्यानें सगळ्या असेंच ह्मणतात. परंतु एकदां कां आमच्या धन्याची संपत्ति पाहिली, ह्मणजे मग पूर्वींचें सगळें विसरून जातात! बाईसाहेब! आज टिपूसाहेबाचें वैभव कांहीं सामान्य नाहीं! एक मोठ्या बलाढ्य सुलतानाचे हे चिरंजीव! बापाच्या मागें गादीचे मालक हेच होणार! स्वरूपानें उत्तम; शौर्य, पराक्रम, विद्या कशांतही नांव ठेवण्याला ह्मणून जागा नाहीं! मग असल्या पुरुषाला तुमच्या सारख्या बायका अनुकूळ झाल्या ह्मणून आश्चर्य काय?

हंसा०—बाई ग दुसऱ्याच्या संपत्तीला, शौर्याला, पराक्रमाला, विद्येला भाळणाऱ्या बायका असतील. नाहीं असें मी ह्मणत नाहीं. परंतु तुला निक्षून सांगत्यें कीं, माझे बरोबर जर तुझी बोलण्याची इच्छा असेल तर असल्या गोष्टी मुळींच बोलूं नको! जर तुला दुसऱ्याला त्रास देण्यांतच सूख वाटत असेल तर खुशाल बडबड कर. मी तुला एकच सांगत्यें, मी आपल्या व्रतापासून कधींही ढळणार नाहीं. मग प्राण जावो अथवा राहो! मला त्याची मुळींच किंमत नाहीं!

**फतिमा**–बाई! तुह्माला माझें बोलण्याचा राग आला असें दिसतें. मी आपली स्वाभाविकपणानें बोलल्यें! माझ्या डोळ्यासमोर नेहमी असले प्रकार घडतात, ह्मणून ह्मटलें.

**हंसा०**–(मनांत) ही ह्मातारी बरी दिसते. (उघड) बाई! मी कधीं कोणाला वाईट वाटेल असें बोलत नाहीं; कदाचित् माझे तोंडांतून कमी जास्ती शब्द निघाले असले तर क्षमा करा. तह्मीच पहा, ह्याठिकाणीं मी अनाथ आहे. माझे मायेचें माणूस कोणी तरी आहे कां? तशांत माझेवर हा प्रसंग कोणते प्रकारचा हें तुह्मीं जाणतच आहा!

**फतिमा**–( मनांत ) ही थोरा मोठ्याची आहे; आपलें कल्याण करील. (उघड) बाई ही आपले सेवेला तयार आहे. ह्या पोटाकरितां सांगतील तो धंदा करावा लागतो. परंतु, मलाही असल्या गोष्टींचा मनापासून तिटकारा आहे. टिपूसाहेबांचें हें वर्तन मला कांहीं मनापासून आवडत नाहीं; पण करावें काय?

**हंसा०**–बाई! तुह्मी जर मला मदत कराल तर तुमचें दारिद्र्य नाहींसें करण्याचें माझेमध्यें सामर्थ्य आहे. पण माझी सुटका मात्र झाली पाहिजे!

**फतिमा**–बाईसाहेब! माझे गरिबाचे हातून काय होणार?

**हंसा०**–असें कां ह्मणतां? मी सांगेन तसें कराल तर हा चंद्रहार आतांच तुह्मांला बक्षीस देईन!

**फतिमा**–काय करूं सांगा. सांगाल तशी वागण्याला मी कबूल आहें.

**हंसा०**–पहिल्यानें सगळे पहारेकरी अनुकूळ करून घेतले पाहिजेत.

**फतिमा**–पण ते कसे होतील?

**हंसा०**–पैशानें सर्व कांहीं होतें. माझेजवळ वीस पंच-वीस हजाराचे दागिने आहेत. तेव्हां दरमहा दहा बारा रुपये मिळणाऱ्या इसमाला एकदम हजार दोन हजार रुपये दिले तर नाहीं कां तो अनुकूळ होणार?

**फतिमा**–होय. न होण्याला काय झालें?

**हंसा०**–झालें तर. पहारेकरी अनुकूल झाले ह्मणजे आपल्याला पुढें काय करावयाचें तें ठरवितां येईल. तुह्मांला मुलगा नाहीं कां?

**फतिमा**–आहे. तो पलटणींत एक शिपाई आहे.

**हंसा०**–झालें तर. त्याच्या अनुमतानें सर्व कांहीं जमेल.

**फतिमा**–पण पुढें त्याचें कसें होईल?

**हंसा०**–जर कदाचित आपली गुप्त गोष्ट फुटली तर मी त्याची सोय कांहीं तरी लावून देईन.

**फतिमा**–पण आपली सुटका होईल तेव्हां ना?

**हंसा०**–त्याची काळजी तुह्मांला नको. श्रीमंतांना हा अपमान कसा सहन होईल? ते आतां टिपूवर स्वारी करतील!

**फतिमा**–खरी गोष्ट! पटवर्धन सरदारांनीं हैदराच्या ताब्यांतले गांव लुटण्याचा व जाळण्याचा सपाटा चालविला आहे! ह्मणून तर हें नसेल ना?

हंसा०—खरेंच कां? पटवर्धन सरदार इकडे आले आहेत?

फतिमा—असें माझा मुलगा सांगत होता.

हंसा०—त्यांचा मुक्काम कोठें आहे? आहे कां तुह्मांला माहीत?

फतिमा—तें कांहीं मला ठाऊक नाहीं.

हंसा०—आतां तुह्मीं आपल्या उद्योगाला लागा. हा घ्या. ( चंद्रहार देत्ये ) पैशाकडे पाहूं नका.

फतिमा—( घेऊन आनंदानें ) बाईसाहेब! आतां लौकर सर्व थांग जमवून आणत्यें. मी निरोप घेत्यें.

हंसा०—ठीक आहे. काम करून लौकर या.

( जातात. )

---

# अंक २ रा.

## प्रवेश ४ था.

### यशवंतराव व मानाजीराव.

यशवंतराव—कसें ह्मणतोस? मग काय करावयाचें?

मानाजी०—महाराज! उतावळेपणा उपयोगाचा नाहीं. धीर धरा. परमेश्वराच्या कृपेनें येथपर्यंत तर काम शेवटास गेलें. आतां फक्त एकच कांटा आपल्या मार्गांत राहिला आहे. त्याचीही कांहीं तोड निघेल.

यशवंतराव—'मानाजीराव' असें नव्हे, 'दिवाणसाहेब' असें ह्मणावयाचें.

मानाजी०—कांहीं ही ह्मणावें; नांवांत फरक झाला तरी व्यक्तींत मात्र नाहीं.

यशवंतराव—पण मला राहून राहून त्या प्रसंगाची मौज वाटते! त्या ह्मातान्यानें तरी कांहीं कमी केलें नाहीं. दुसरा तिसरा कोणी असता तर त्याची त्यानें तेव्हांच आहुती घेतली असती.

मानाजी०—महाराज! ती गंमत अजून मला ऐकावयाची आहे. रात्रीं जेव्हां हल्ला करण्याकरितां मी गफूरखानाला घेऊन आलों; तेव्हां आह्मी स्वारांच्या दोन टोळ्या केल्या होत्या. एक्या टोळीनें पाहरेकऱ्यांनां हूल दाखवावी व दुसऱ्या टोळीनें राजवाड्यावर हल्ला करावा. मी पहिल्या टोळीबरोबर गेल्यामुळें राजवाड्यांतील गंमत पाहण्याची संधी साधली नाहीं.

यशवंतराव—मी गफूरखानाला घेऊन जेव्हां शहरांत शिरलों, तेव्हां इकडे तिकडे न पाहतां एकदम दौड करून राजवाड्याकडे गेलों. राजवाड्याच्या रक्षणाकरितां जे स्वार उभे होते त्यांनीं अह्मांला अडथळा केला; परंतु आह्मीं त्यांनां दाद दिली नाहीं. एकदम आह्मी वाड्यांतच प्रवेश केला. पाहरेकऱ्यांबरोबर चकमक उडालेली पाहून कांहीं तरी दगा आहे असें समजून सगळ्या वाड्यांत गोंधळ उडून गेला! आह्मी तडक त्या ह्मातान्याचा समाचार घेण्याकरितां त्याच्या बंगल्याकडे गेलों. वाड्यांतून कोणीही पळून जाऊं नये ह्मणून जिकडे

तिकडे नाकीबंदी अगोदरच केली होती. आह्मी बंगल्याजवळ गेल्याबरोबर एकदम बंदुकांची फायर उडाली! आमच्याबरोबरचे तीन इसम तर लागलेच ठार झाले. बंगल्यांत किती इसम आहेत हें दारें बंद असल्यामुळें आह्मांला समजेना! मग आह्मी दारें फोडिलीं, तों ह्यातारा व त्याचे चवघे खिजमतगार हातांत तरवारी घेऊन बाहेर पडले! मग काय विचारतां? मी ओळख देऊन त्याला ह्मटलें अरे थेरड्या! प्रत्यक्ष भावाचा मुलगा जीवंत असतां त्या भिकाऱ्याला दत्तक घेतलें अँ! मी वाईट झालों काय? अरे कोल्ह्या! आपल्या कर्माची आतां फळें भोग. आतां तुझें रक्षण करण्याला तो तुझा कारटा येईल काय? हें भाषण ऐकून त्या ह्यातान्यानें इंगळाप्रमाणें डोळे लाल केले आणि मला ह्मणाला, अरे घातक्या हरामखोरा यशवंत्या! असलें कर्म करणाणारा तूंच आहेस काय? थांब तर. पितृद्रोह करणाराला काय शासन होतें ह्याचा तुला मासला दाखवितों.

**मानाजी०**—बरें मग पुढें काय झालें?

**यशवंतराव**—असें ह्मणून ह्यातान्यानें तरवारीचे हात करीत मंडलाकार फिरण्याला सुरवात केली. धन्याचा कित्ता त्या खिजमतगारांनींही गिरविण्यास कमी केलें नाहीं. काय सांगू मानाजी! त्या प्रसंगाचें स्मरण झालें ह्मणजे आंगावर कांटा उभा राहतो. अरे! आह्मी वीस असामी; ते अवघे पांच! परंतु आमच्यांतले निम्मे लोक त्यांनीं लोळविले! मग

मी मोठा हिय्या करून पुढें सरसावलों. अजूनपर्यंत तर मी गम्मत पाहत होतों. परंतु जेव्हां निम्मे लोक खपले तेव्हां मला इर्षा आली. त्याचें व माझें युद्ध सुरू झालें! गफूरखानानेंही त्या चवघाचा समाचार घेण्याकरितां पुढें पाऊल टाकिलें! तो म्हातारा अगदीं थकून गेला होता; मी तर ताज्या दमाचा होतों. शिवाय खड्गयुद्धांत तोच माझा गुरू होता. तेव्हां त्याचे डाव पेंच मला अवगत होते. मी संधी साधून त्याच्या उजव्या हातावर वार केला, ह्यामुळें त्याचें हस्तचापल्य कमी झालें. मग तर मी त्याचा पुराच समाचार घेतला! दोन तीन वार झाल्यावर तो जमिनीवर पडला; तेव्हां मी त्याच्या छातीवर पाय देऊन त्याला ह्मटलें अरे थेरड्या! आतां तुझें रक्षण कोण करील? दुसऱ्याचें हक्क बुडविल्याचा काय परिणाम होतो तो पाहिलासना? हें माझें भाषण ऐकून तो थेरडा ह्मणाला 'अरे कुलांगारा असलें कर्म करून नरकाची मात्र तयारी करून ठेविलीस! मी तर आतां मरणार; परंतु नीचा ध्यानांत ठेव हें वैभव फार दिवस भोगणार नाहींस! अधमा! तुला शस्त्रानें मृत्यु न येतां मांगाच्या हातून तूं फासावर जाशील! हा शाप कधींही असत्य होणार नाहीं, हें त्याचें भाषण ऐकिल्याबरोबर एक घाव दोन तुकडे करून टाकिले; व झालों मोकळा. गफूरखानही मोकळा झालाच होता. मग लागलाच हंसेच्या महालांत गेलों; ही हकिगत तुला सांगितलीच आहे.

मानाजी०—हंसाबाईला इतका त्रास द्यावयाचा नव्हता. पुढें मागें टिपूचें व तिचें सूत जमलें तर ती सूड घेतल्याखेरीज राहणार नाहीं!

यशवंतराव—रागाच्या सपाट्यांत होऊन गेलें!

मानाजी०—रामरावाची व्यवस्था कशी लावावी?

यशवंतराव—कशी बरें?

मानाजी०—मी असें ह्मणतों, चार मारेकरी मी तयार करितों, त्यांनीं त्याच्या पाळतीवर असावें व संधी सांपडेल तेव्हां उडवावा बार. आहे काय त्यांत?

यशवंतराव—वाहवारे मानाजी! युक्ति तर नामी आहे. साधली मात्र पाहिजे!

मानाजी०—न साधायाला काय झालें?

यशवंतराव०—जा तर. एवढा बार उडवा! पण आज गाणें कोणाचें ठरलें आहे? आज तर खूप मजा उडाली पाहिजे. चांगल्या दहापांचजणी नायकिणी बोलावा. दारूचीही कमताई उपयोगाची नाहीं. आपल्या सगळ्या मंडळीला आमंत्रणें पाठवा. चला जा तर लौकर.

मानाजी०—सरकार! सर्व व्यवस्था लावून असाच भेटीला येतों.

यशवंतराव—ठीक आहे! मी ही जरा फिरून येतों.

( दोघे जातात. )

# अंक २ रा.

## प्रवेश ५ वा.

### स्थळ-टिपूची छावणी.

**हंसा०**—परमेश्वरा! काय माझी अवस्था? आपल्या महालांत असतां माझ्या हुकुमाची वाट पाहत शेंकडो मनुष्यें उभी असत. तीच मी आज एका म्हातारीची मार्ग-प्रतिक्षा करीत बसल्यें आहे. जरा कपाळ दुखलें तर किती पंन्याकार चालत असत; परंतु येथें नुस्तें कोणी कुशलही विचारीत नाहीं. सिंहाप्रमाणें पराक्रमी असे माझे प्राणनाथ रक्षणकर्ते असून आज माझे रक्षणाचा मीच विचार करावा अशी पाळी येऊन बेतली अं! जरा येण्याला उशीर झाला तर मला चैन पडत नसे; परंतु एक माहिन्यांत नुसतें कुशल वर्तमानही कळत नाहीं. देवा! तुझी लीला अगाध आहे! पण अजून ती म्हातारी कां बरें येत नाहीं? आज मुलाला घेऊन येणार होती! सगळे पाहेरकरी अनुकूल झाले तर किती मौज होईल.

(इतक्यांत फातिमा व अबदुल्ला येतो.)

**फातिमा**—बाईसाहेब हा अबदुल्ला आला आहे. मी जासूद तयार केला आहे.

**हंसा०**—काय जासूद मिळाला? फारच उत्तम झालें!

**अबदुल्ला**—होय बाईसाहेब!

**हंसा०**—पण तिकडली कांहीं बातमी समजली आहे कां?

**अबदुल्ला**—होय बाईसाहेब ! पुण्याहून कांहीं लष्कर आलें आहे. सरदार कोण कोण आहेत हें कांहीं नक्की समजलें नाहीं; परंतु त्रिंबकराव मामा व रामराव घोरपडे ह्मणून कोणी आहेत असें समजतें !

**हंसाबाई**—काय घोरपडे? मग तर देवाला माझी काळजी वाटली ह्मणायची तर ! तुह्मी पत्र नेऊन जासुदाला द्या व मराठ्यांच्या सैन्यांत पाठवा. घोरपडे सरदार आहेतना, त्यांनां देण्याला सांगा. पण पाहेरेकऱ्यांचें कसें काय झालें?

**अबदुल्ला**—ते सर्व अनुकूळ आहेत! त्यांची काळजी नको.

**हंसा०**—( पत्र लिहून देते ) हें घेऊन जा ! सगळा वृत्तांत ह्यांत आहे. फार सावधगिरीनें वागायला सांगा बरें त्याला !

**अबदुल्ला**—जी सरकार ! आज्ञे प्रमाणें करितों. ( मुजरा करून जातो. )

**हंसाबाई**—आपला सर्व घांट जुळे तों पर्यंत जर त्यानें कांहीं वेडावांकडा प्रकार केला तर मग कसें करावें?

**फातिमा**—त्याची काळजी नको. टिपूला तर हल्लीं इतकी फुरसत नाहीं. तशांत जर तो कांहीं कमीजास्ती करील तर त्याचा बंदोबस्त मी करीन. राजरोस टिपूचे लोक त्याच्या विरुद्ध वर्तन करतील !

**हंसाबाई**—जर मला तुमचें सहाय्य मिळालें नसतें तर माझी अवस्था काय झाली असती?

**फतिमा**—त्यानें आपले हेतू पार पडले असते!

**हंसाबाई**—देवा! नकोरे असा कोणावर प्रसंग आणूं!

**फतिमा**—बाईसाहेब! जरा पडा तरी. आपण असे आपले हाल करून घेऊं नका. आपल्याला कांहीं काळजी नको! खुदाच्या दयेनें सर्व ठीक होईल!

**हंसाबाई**—तुह्मीं आहाना पण येथें?

**फातिमा**—मी बाहेर पाहऱ्यांत बसत्यें. जरा त्यांच्या जवळ गोड गोड बोललें पाहिजे. काम पडलें तर हाक मारा.

**हंसाबाई**—मी जरा पडत्यें! झोंप तर येणार नाहींच!

( फातिमा जात्ये व पडदा पडतो. )

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

### स्थळ—मराठ्यांची छावणी.

( रामराव व शिपाई दोन मारेकऱ्यांनां घेऊन येतात. )

**रामराव**—( मारेकऱ्यांस ) अरे हरामखोरांनों! तुह्मांला कोणी पाठविलें? बोला बोला, लौकर बोला. अरे बेरडांनों! मला मारून तुह्मांला काय मिळणार होतें? पाजी कोठले! बोला, सांगा सगळें. मला सर्व समजलें पाहिजे. काय तुह्मी बोलत नाहीं? ( शिपायांस ) अरे पाहता काय? उडवा कोरडे! चोरांच्या पाठीचें धिरडें झाल्याखेरीज ते वठणीवर येणार नाहींत! कायरे गुलामांनों! सांगता कां नाहीं? अरे ते असे बोलणार नाहींत; महा बेरड आहेत. हं! उडवा!! ( शिपाई कोरडे मारितात. )

**पिऱ्या १ मा०**—अयायी, ओ-देवारे देवा! सरकार! सांगतों सर्व सांगतों! नका हो नका मारूं!

**वाघ्या २ मा०**—सरकार! आह्मांला अभय असेल तर सांगूं.

**रामराव**—अरे बेरडांनों! तुह्मांला अभय पाहिजे काय? मारेकऱ्यांचा धंदा करणारे बेरड अभय मागतात! अरे, पाहतां काय उडवा कोरडे!

**पिऱ्या**–सरकार! हं चालू द्या तर तुमचे कोरडे. ( तोंडावर हात ठेवून ) हें तोंडाला कुलूप लागलें! या पिऱ्याच्या तोंडून एक अक्षर सुद्धां कळणार नाहीं!

**बाघ्या**–आणि मी सांगेन असें कां तुला वाटतें? प्राण गेला तरी बेहत्तर! पण नाहींच सांगणार!

**रामराव**-अरे हे पक्के बेरड आहेत. ह्यांनां राखेचे तोबरे द्या. उन्ह उन्ह राखेच्या तोबऱ्यांखेरीज हे वठणीस येणार नाहींत! ( शिपाई तसें करितात. )

**पिऱ्या**–सरकार! आतां तारा कीं मारा. ह्या चरणाजवळ सगळें सांगतों!

**रामराव**–आतां कसे बेतावर आलां! सांगा तर सर्व. तुह्मांला कोणीं पाठविलें?

**पिऱ्या**–मानाजीनें सरकार!

**रामराव**–काय, त्या मानाजीनें? असा करण्याचा त्याचा हेतु काय?

**पिऱ्या**–सरकार! ते दिवाण झाले आहेत; मोठे महाराजांचा खून केल्यावर यशवंतराव राजे झाले सरकार!

**रामराव**–'बाबासाहेबांचा खून' हे शब्द कसे जाळीत जातात! तो हरामखोर मारेकरी राजा झाला काय? तो मानाजी दिवाण झाला? अरे दुष्टांनों! आणि त्यांनींच तुह्मांला पाठविलें नव्हे?

**पिऱ्या**–होय, सरकार!

**रामराव**—तुह्मांला काय देऊं केलें होतें ?

**पि-या**—दोन दोन हजार रुपये व एकेक गांव!

**रामराव**—अरे! मी तुमचा असा कोणता अपराध केला होता ?

**पि-या**— पण पैशाकरितां आह्मीं धनी साहेबांचा जीव घेण्याला तयार झालों!

**रामराव**—तुमचा बेत फसला तर ह्मणावयाचा!

**पि-या**—सरकारांचा पराक्रमच मोठा. आह्मीं आपली शिकस्त केली; तीन दिवस सारखी आमची नजर होती; पण आपण एकटे कधींच सांपडला नाहीं! शेवटीं तसाही योग आला; परंतु, आमचें नशीबच फुटकें! आमचे दोन सोबती मरून गेले ते आमचे पक्षां सुखी!

**रामराव**—तुमची ही रवानगी करितों! तुमच्या धन्या करितां पुढें जागा पाहून ठेवा! अरे, ह्यांना घेऊन जा व तोफेच्या तोंडीं नेऊन बांधा!

( शिपाई घेऊन जातात. )

**रामराव**—अरे निर्दया, यशवंत्या! तुझ्या नाशाला माझा राग निमित्त मात्र असो. तूं आपल्या कर्मानींच नष्ट होणार! कोण अधमपणाहा!! अरे समोर तरी लढावयाचें होतेंस! शिपाईबाण्याचा त्याग करून हें अधर्माचें वर्तन करण्याला कशाला तयार झालास? आतां तुझ्या पातकाचे घडे भरले! असले खेळखंडोबा करण्याला तुह्मांला फार दिवस ह्या जगांत

ठेवीत नाहीं. प्रिये! तुझी अवस्था काय झाली असेल? कांहींच वर्तमान कळत नाहीं!! ( इतक्यांत फकिराच्या वेषानें जासूद येतो. )

**जासूद**–( मुजरा करून ) सरकार, हा कागद!

**रामराव**–( कागद घेऊन ) अरे, तूं कोणीकडून आलास ?

**जासूद**–सरकार, टिपूच्या छावणींतून!

**रामराव**–हा कागद कोणी दिला ?

**जासूद**–तें कांहीं मी जाणत नाहीं!

**रामराव**–बरें जा! बाहेर बैस. हांकमारीन तेव्हां ये.

**जासूद**–जी सरकार! ( मुजरा करून जातो. )

**रामराव**–( पत्र उघडून ) अक्षर तर माझे प्रियेचें! ( पत्र वाचीत ) शाबास. माझे लाडके! शाबास!! तुझे विचार मला पसंत आहेत! ( पुढें वाचतो ) " माझी सुटका लवकर व्हावी. " प्रिये, अग हें तूं कशाला सांगावयाला पाहिजेस? मी स्वस्थ बसलों आहें असें का तूं समजतेस? नाहीं बरें! प्रिये असें मुळींच नाहीं; मी त्याच उद्योगांत आहें. थोड्याच दिवसांत तुझी मुक्तता करितों! आतां फार अवधी नको. ( पुढें वाचून ) " पाहेरकरी अनुकूळ करून ठेविले आहेत. " लाडके! तूं तर मोठी कारस्थानी बनलीस! परंतु प्रसंगच मनुष्याला शहाणपणा शिकवितो! ( पुढें पाहून ) " चातका प्रमाणें वाट पाहत आहें. " प्रिये, माझी ही अवस्था तीच आहे!

चैन ह्मणून पडत नाहीं! बाबाच्या मृत्यूनें व तुझ्या वियोगानें जें दुःख होत आहे, तें, प्रिये तुला काय सांगू? प्रिये! ह्या अनर्थाला जे कोणी कारण झाले, त्यांचा सूड घेतल्याखेरीज मला ह्मणून स्वस्थपणा वाटणार नाहीं! त्या दुष्टांचा पुरा सूड घेईन, तेव्हांच मला समाधान वाटेल! ते दुष्ट हरामखोर, पातकी, मारेकऱ्यांचा निजधंदा करणारे, जेव्हां ह्या जगांतून नाहींसे होतील तेव्हांच माझा क्रोध शांत होईल! त्या दुष्टांच्या कृत्यांचें स्मरण झालें ह्मणजे आंगाचा दाह होतो; क्रोध अनावर होतो; विचार सरणीचा भंग होतो. काय करावें आणि काय नाहीं, ह्याचें भान राहत नाहीं! ( तरवारीकडे पाहून ) हे माझे प्रिय शस्त्रा! आजपर्यंत तुझी मला गरज पडली नाहीं! परंतु, आजपासून सुरवात झाली. आतां तुला मनमुराद रक्त प्राशन करावयास सांपडेल. हे बुभुक्षित गिधाडांनों, हे सर्व भक्षण करणाऱ्या काक पक्षांनों, वाळलेलीं हाडें खाऊन क्षुधा शांत करणाऱ्या वृकांनों, आपल्या भयंकर आरोळ्यानीं रात्रीच्या शांततेचा भंग करणाऱ्या जंबुकांनों, तुह्मांला मेजवानी देण्याकरितां मी आलों आहें! माझ्या शत्रूचें रक्त मनसोक्त प्राशन करा; मांस व अस्त ह्यांवर यथास्थित ताव मारा! हे भू माते! या पातक्यांच्या रक्तानें शांत हो! हे परमेश्वरा! ह्या दासाला आपलें कर्तव्य बजाविण्यास शक्ति दे! हे सूर्य नारायणा, ! हे अष्ट दिक्पाळांनों! पितृवधानें क्रुद्ध झालेला, प्रिया विरहानें दग्ध झालेला, राज्या-

प्रहारानें भणंग झालेला हा जन रणयज्ञाची आज्ञा मागत आहे! हे माझे शूर वीरहो! आपण ज्या कार्या करितां इतके दूर आलों आहों, तें कार्य जवळ येऊन ठेपलें आहे! ज्या शत्रूचा आपण शोध करीत होतों, तो अगदीं जवळ असल्याची खबर लागली आहे! आतां माझ्या मनाला नवा दम आला आहे! नानासाहेबांची आज्ञा घेऊन आजच्या आज त्या दुष्टावर हल्ला करावयाचा! आतां तिकडेंच जावें. श्रीमंतांची आज्ञा आहेच कीं, मला स्वतंत्र कामगिरी द्यावी म्हणून! मामासाहेबांनीं त्या हैदराचा खुशाल समाचार घ्यावा! टिपू हा माझा भाग आहे! तो वांटा मलाच मिळाला पाहिजे! अरे उन्मत्ता हिंदु धर्मद्वेष्ट्या! हिंदु धर्माचा उच्छेद करण्यामध्यें तुला मोठी प्रतिष्ठा वाटते नव्हे? स्त्रियांचें पातिव्रत्य हरण करण्यांत तुझा हातखंडा आहे काय? आतां माझे बरोबर प्रसंग आहे! मराठ्यांचा भाल्याचा फटकारा विसरलास वाटतें! तुला विसर पडतो नव्हे? संभाळ आतां! ( इतक्यांत मामा येतात. )

**रामराव**—यावें मामासाहेब! मी आपल्याकडे येण्याच्या तयारींतच होतों.

**मामा०**—आपल्यावर मोठा प्रसंगच आला होता, असें ऐकिलें म्हणून आलों?

**रामराव**—असें खरें!

**मामा०**—सगळे सांपडले कां?

**रामराव**—दोन तर पहिल्याच झटापटींत ठार झाले! दो-

यांनां तोफेच्या तोंडीं देण्याचा हुकूम केला!

**मामा०**—हें कृत्य त्या यशवंतरावाचेंच असेल!

**रामराव**—नाहीं तर काय?

**मामा०**—कोण अधमपणा हा! त्याला चांगलीच शिक्षा झाली पाहिजे!

**रामराव**—मामासाहेब! टिपूची छावणी येथून वीस कोसांवर आहे, असा मला शोध लागला आहे. तिकडे जाण्याला मला आज्ञा व्हावी.

**मामा०**—त्याच्याजवळ वीस हजार सैन्य आहे, तोफखानाही आहे, अशी बातमी मला समजली आहे!

**रामराव**—मला दहा हजार स्वार द्या; मग टिपू आहे आणि मी आहें. पाहून घेईन!

**मामा०**—ठीक आहे. केव्हां कूच करणार?

**रामराव**—आजच. वेळ मुळींच नको.

**मामा०**—आह्माही श्रीरंगपट्टणाकडे मोर्चा फिरवितों! (जातात.)

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला

### स्थळ—टिपूची छावणी.

(टिपू व गफूरखान.)

**टिपू**—फेर क्या बातमी है?

**गफूरखां**–त्रिंबकरावमामा श्रीरंगपत्तनके तरफ गया है. रामराव घोरपडिया आपनेपर हल्ला करनेके वास्ते निकला है.

**टिपू**–तुम ऐसा करो, पांच हजार सवार लेके जाव और घोरपडेको रोको; और उस्से सामना नही करके छापेसे उसको हैरान करो. मैभी इदर पटवर्धनको फौजकेसाथ मेहमानी देतांहूं. उसने तो बहोत तोबा कियाहै. गोपालराव पटवर्धन गांवके गांव जलाता हुवा चला आता है. उनोपर जो जो सरदार सामना करनेको गयेथ, उनको हटाकर आगे पढा हुवा चला आता है. हैदरसाहेब त्रिंबकरावकी खबर लेगे. मरहट्टोके सरदार सिलसिलेसे एकके पिछे एक किल्ला सर करकेचले आतेहै खुद्द पेशवाभि फौज लेकर पूनेसे निकला है, ऐसी खबर आई है. कुल मरहट्टोकी फौज एक लाखके उपर होगी. निजामको सामील होनेकेवास्ते मिन्नत करनेके लिये वकील गये है. लेकिन अभीतक कुछभि अहवाल बनाहुआ मालूम नही देता.

**गफूरखां**–अबवक्त गारत करनेमे हासिल नही है. मरहट्टोका जोर बहोत है; वास्ते मै अभिके अभि कूच करताहुं.

**टिपू**–अच्छा है. पेहेरेवालोंकूं सखत ताकीद दो के दुशमन बिलकूल नजदिक आये है. बहोत होशिआरिसे पेहरा करो. मरहट्टे बडे काफर होते है.

कब छापा डालेंगे, कब आवेंगे और किधरसे चले जायेंगे, इसका पत्ताभि न लगेगा. एक तरफ जाने-का बायास बतलाके दुसरेही तरफसे चले जायेंगे. वास्ते उनके फरेबीसे होशिआर रहना चाहिये. हैदरसाहेबका गुस्सा बहोत मुशकिलहै. थोडी कसूर के वास्तेभि उनसे माफी न होगी.

**गफुरखां**–मै सब सिलसिलेसे तदबीर करनेको सफ-रिजखांस कहके जाता हूं.

**टिपू**–कुछ हरकत नहीं है. लेकिन, वह गुलाम बडा फरेबी है. मुजको वह पहले दरजेका दगाबाज और जिसमे मिलावो उसमे मिलनेवाला और जबानका काबील मालूम होता है. लेकिन खुद्दसे तो कुछभि न बनेगा. मै उसके आदतको एक घडीमे भुला-देता, मगर क्या करूं? हैदरसाहेबका बडा प्यारा है उस दगाबादनें मुझको एकवक्त अच्छि तौरसे फजियत किया है. तकदिर अच्छा था वास्ते उस-मेसे बचाहुं. लेकिन कौन फजिअत! तोबा तोबा! जो कुच हुवा उसकेवास्ते खैर क्योंके बुजुरगोंकी क्यैत हैं के “ बीतीसो बीतने दे; आगेकी सुधले.” इसके हवतपर ध्यान देकर इस गुलामका कुछभि नकिया. अव्वलके लढाईमें बाबासाहेब घोरपडेको हटानेका बिलकूल वक्त आयाथा. लेकिन इस हरामखोरने ऐन वक्तपर हातपांव ढिले करदियेथे! उस वक्तसे इस हरामिको मै अच्छी तऱ्होंसे पच्छानताहूं.

**गफुरखां**–उसवक्त उसकाभि कुछ इलाज नहीथा,

जो उसवक्त उसने वैसान किया था, तो दुष्म, नोसे सब लाग गारत हुये थे.

**टिपू**—वह कैसाभि होवे. उसके बारेमें ज्यादा ख्याल नही करताहूं! मगर अच्छी तऱ्हेसे समजाके कहि-नाके जो कसूर हई तो माफी न होगी.

**गफूरखां**—( सलाम करून ) तो फिर मै अब जाताहुं तयारीके वास्ते.

**टिपू**—यह तो तदबिर लगादि; उस फतिमाको जो कामगिरी कहीथी वह हुई या नही, यह कुछबी उस बलासे मालूम नही होता. कौन है रे उधर ? जा और फतिमेको ले आ! आज उसका तालाश करके मेरेतरफ भेजदे. मै जनानखानेमे हूं भला!

( जातो. )

---

# अंक ३ रा.

## प्रवेश ३ रा.

### स्थळ—टिपूची छावणी.

( हंसाबाई व फतिमा. )

**हंसा०**—आपलें काम तर बरेंच रंगारुपाला आलें. आतां बाई माझ्या जीवांत जीव आला! स्वारीचा मुक्काम जवळच आहे, ह्मणून नाहीं का तो ह्मणाला?

**फतिमा**—आजचा दिवस एवढा परमेश्वरानें निभावला ह्मणजे झालें. दिवस तरी कसला? हे रात्रीचे चार प्रहर व उद्याचा दिवस एवढाच काय तो अवकाश.

**हंसा०**—परमेश्वराच्या कृपेनें सर्व सुरळीत होईल! माझी काळजी त्या अंबाबाईला आहे. बाई! तुमच्या सारखी मला साह्य नसती, तर मी कांहीं हे दिवस पाहिले नसते!

**फतिमा**—पण आतां कशाला त्याचें स्मरण! त्यानें तर अनर्थ केला आहे!

**हंसा०**—देवा! नकोरे असा कोणावर प्रसंग आणूं! किती तरी अधमपणाहा!

**फतिमा**—अहो, प्रत्यक्ष आपल्या रयते पैकीं कित्येकांच्या बायकांवर त्यानें गहजब गुजरविला आहे. सर्व जनानखाना असल्या बायकांनीं भरून गेला आहे. त्या बिचाऱ्यांचे आईबाप, बहीणभाऊ, सोयरेधायरे, धाई धाई रडत आहेत. पण कोण दाद घेणार?

**हंसा०**—हें त्याच्या बापाला कसें आवडतें?

**फतिमा**—तेथ पर्वेतों दाद जाते आहे कशाला?

**हंसा०**—अरे अरे!! देवा! माझी अबरू राखणें तुझ्या स्वाधीन आहे. बाई! हें ऐकून माझे आंगावर कांटा उभा राहतो! छाती धडधडूं लागते! आंगाला कांपरें भरतें! केव्हां एकदां ह्या वाघाच्या जाळींतून सुटेन तेव्हां खरी!

**फतिमा**—बाईसाहेब! आपल्यावर परमेश्वराची कृपा आहे ह्मणून तर इतके दिवस पार पडले! नाहीं तर त्यालाही कसला धीर? परंतु एक मात्र कारण आहे!

**हंसा०**—तें कोणतें?

**फतिमा**—आपण येथें आल्यापासून पटवर्धन सरदारांचा त्याच्या पाठीशीं नेट असल्यामुळें त्याचा सगळा वेळ त्या खटपटींत जातो. लढाईच्या फिकिरीमुळें त्याला इकडे तिकडे पाहण्यास फुरसूत नाहीं. जर तो आपल्या कामांत चुकेल तर हैदरसाहेब सक्त शिक्षा केल्या खेरीज राहणार नाहीं!

**हंसा०**—पटवर्धन सरदारांचें इकडे येणें मला बरेंच पथ्यावर पडलें तर!

( इतक्यांत टिपू येतो. )

**फतिमा**—बाईसाहेब! टिपूसाहेबांची स्वारी आली.

**हंसा०**—( दचकून उभी राहत्ये, इतक्यांत टिपू येतो. फातिमा दाराबाहेर जात्ये. )

**टिपू०**—ऐ प्यारी! मेरी इतनी शुक्र गुजारी किसवास्ते करतीहै? जिस वक्त मैंने तेरे खुपसुरतीका बयान सुना, उस वक्तसे, मेरा दिल तेरेपर फिदा हुआ है. प्यारि! तुजको ज्यादा मै क्या कहूं? मेरे जनानखानेमें जुदे जुदे किस्मकी शेंकडों औरतें है. लेखिन, जबसे मैने तुजको देखा, तबसे एकभि तेरे जैसी मेरे ख्यालमें नही आती; क्योंके, तेरे खुप-

सुरतीका सामना करनेवाली, उनोमें एकभी नही है. मेरा मरतबाभी कुछ कम नही है. तुह्मारा पेशवाभी मेरे बापका डर रखता है. फिरंगी तो डरके मारे घबराते है. बावाके पिछे, मैहि सुलतान होनेवाला हूं. प्यारी! कहो; ऐसी सुलतानकी पट्ट-रानी होनेको क्या तूं कबूल न होगी? मेरेसे बडा ऐसा खाविंद इस दुनयामें तुजको न मिलेगा. प्या-रि! बोल बोल; ऐसी चुप क्यों बैठीहो? बहोत दि-न मै तुजकों न मिला; वास्ते क्या तुजको गुस्सा आया है? लेकिन, ये प्यारि! उसमें मेरा कुछभी तकसिर नही है भला! क्या कहूं? वो बला फातिमा कहां गई है? उस बलाने मुजको आने न दिया. आज तो मैही, चला आयाहूं. ऐ ताजनी! मैने इन दिनोंको किस तौरसे गुजारे है, यह सिर्फ मैही जानताहूं. अब ऐसा, चुप रहना कहांतक चलेगा? तेरी यह खुपसुरती देखकर मेरी आखोंको बहोत तसल्ली हुई है. ऐ प्यारि! एकवक्त यह तेरा चुप रहना तेरे शिरिन जबानसे इन मेरे कानोंको तस-ल्ली तो दे भला! ऐ खुषनुमा? इन मेरे गोषहा, तेरी जबान सुननेके वास्ते, बहोत अजुर्दे है. खुप सुरत औरतो बडी मगरूर होती है. बगर खुशाम-तके वो आशक होती नही है. यह मुजको मालूम है. इसी वास्ते मै तेरी मिन्नतवारी कर रहा हूं. भ-ला एकवक्त तो खुश दिल हो! खुशनुमा औरते जंगबाज खाविंदसे प्यार करती है. मै कैसाहूं यह तैने कानोंसेभी सुना होगा.

हंसा०—आपल्या शौर्याचा विचार करावा तों एक शंका येते.

टिपू—( आनंदानें ) हो! हो! प्यारि! कहो कहो! ऐसा कौनसा शक तुजको है भला?

हंसा०—शूराचें हेंच कां लक्षण?

टिपू—वो कौनसा?

हंसा०—दुसऱ्याच्या बायका चोरून आणणें ह्यांतच कां शूर पुरुष भूषण मानतात?

टिपू—बगर ऐसा करनेसे, तेरे पानेका दुसरा रस्ता ही नंही था.

हंसा०—शूर पुरुषांनां कमीपणा आणणारें वर्तन आपण आपल्या स्वार्थाकरितां करतां. तर एकूण मग हें आपल्यामध्यें व्यंग नव्हे कां? शूर पुरुष उदार, परोपकारी, पापभीरू, सदाचरणी असे असतात, असें माझे ऐकण्यांत आहे. इथें तर सर्वच गोष्टीचा अभाव दिसतो. आतां आपणच सांगा; स्त्रियांनां शूर पुरुष पति आवडतो, असें आपणच ना ह्मटलें? मग आपल्या स्वार्थाकरितां खून करणाऱ्या गळेकापूला कोणीतरी शूर ह्मणेल कां?

टिपू—ऐ नाजनी! जो कुछ बना, उसके वास्ते, इलाज नही है. इतना खता माफ होना चाहिये. सब औरतोंको छोडकर, तुजको पट्टरानी बनावूंगा; और तेरे बरहुकूम ताबेदारी उठावूंगा.

हंसा०—आज माझेवर मन गेलें ह्मणुन सर्व स्त्रियांचा त्याग कां करणार?

टिपू–बेशक! कुछ फिकर मत कर! आजके आज सब-को छोड देता हूं.

हंसा०–पण हें खरेंना? कां आपलें तोंडापुरतें बोलणें?

टिपू–नही! नही! ऐसा कभी होनेवाला नही.

हंसा०–सुलतानसाहेब! धन्य आहे तुमची! आज माझेवर मन गेलें ह्मणून सगळ्या स्त्रियांचा त्याग करण्याला कबूल झाला. समजा; उद्यां मजपेक्षां सुंदर एखादी भेटली ह्मणजे आपण असेंच ना करणार? मग तिलाही आपण पट्टराणी बनविणार ना? सुलतानसाहेब आपले शास्त्रांत काय असेल तें असो. परंतु आमचें शास्त्र तर असलें आचरण निंद्य मानितें.

टिपू–ऐ बान! मुजको यह तेरे बह्मग्यानकी जरूर नही है. सिर्फ मेरे कहनेको तूं कबूल हो, इतनीही मेरी अर्जीजी है.

हंसा०–आह्मी हिंदु स्त्रिया एकवार लग्न करितों; एका पती बरोबरच जन्म घालवितों; पतीच्या सुखाला किंवा दुःखाला विभागी होतों; पति हेंच आमचें दैवत, तोच आमचा राजा, तोच आमचा ईश्वर; पती खेरीज अन्य कांहीं आह्मी जाणत नाहीं; पति खेरीज सर्व पुरुप आह्मांला बापा भावा समान आहेत. श्रीमंत सरकारच्या एका शूर सरदाराची मी धर्मपत्नी आहे दैवयोगानें आज तुमचे कैदेंत सांपडली आहे, ह्मणून असलें वर्तन करण्याचा आपल्याला मुळींच अधिकार नाहीं. समजा; उद्यां

आपला जनानखाना श्रीमंताच्या हस्तगत झाला, तर त्यांनीं असेंच वागावें काय? आमचे सरकार त्यांचा गौरव करून बहुमानानें आपलेकडे पाठवून देतील. मग आपणला नको कां असें वागावयाला? श्रीमंता बरोबर आपली लढाई सुरू आहे. अशा प्रसंगीं जर आपण असलें थोरपणाचें वर्तन कराल, तर त्यांचा आपलेविषयीं ग्रह काय होईल? ते खरोखरच आपणास थोर मानतील. जर असें न कराल, तर मराठे वीरांचा पराक्रम अझून लुप्तप्राय झाला नाहीं; त्यांच्या भाल्यांचें पाणी बोथट झालें नाहीं; वीरश्रीनें त्यांना सोडिलें नाहीं; किंवा, विजयश्रीनें त्यांचा त्याग केला नाहीं. ह्या गोष्टीचा पक्का सूड घेतील. श्रीमंताची आपणावर पूरी इतराजी होईल. कांहीं विचार करा; व माझा नाद सोडा.

टिपू—मै उसकी दरकार बिलकूल नही रखताहूं. पेशवेको सुर्ख कपडे पहिनवाकर, सनान संध्या करनेकेवास्ते, बनारसको भेजनेकेलिये तो यह लढाई है.

हंसा०—सुलतान साहेब! अझून आपण विचार केला नाहीं. जरा शांतपणानें विचार करा. श्रीमंत सरकारचे दोन तीन छोटे सरदार आले आहेत, तर आपली पांचावर धारण बसली आहे; मग जेव्हां अगणित सैन्यासह पेशवे सरकारांचे मोठमोठे पराक्रमी सरदार येतील, तेव्हां आपली दशा काय होईल? शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले अस-

लीं जाडीं जाडीं धेंडें जर आपल्या मुलखांत शिरलीं, तर आपली दशा काय होईल? मग आपल्याला आसरा कोठें मिळेल? असा कोण आहे कीं, श्रीमंताच्या कोपाग्नींतून आपल्याला बाहेर काढील? टिपूसाहेब! मी तर अबला आहे. माझें आपण कांहीं वरें वाईट कराल; पण, त्याचा परिणाम किती भयंकर आहे ह्मणून सांगूं? आपलें हें एवढें वैभव आहे; परंतु. एका क्षणांत त्याची राख रांगोळी होऊन जाईल! शोध केल्यास कोठें पत्ताही लागावयाचा नाहीं! एवढा रावण; परंतु सीतेचें हरण केल्यामुळें त्याची कोण दशा उडाली? द्रौपदीचा छल केल्यामुळें अठरा अक्षौहिणी सैन्याचा सप्पा उडाला! सुलतान साहेब! माझ्यापेक्षां सुंदर अशा स्त्रिया आपणास बायका मिळतील; सुखानें आपल्या बरोबर संसार करतील; मी तर साफ सांगत्यें कीं, तुह्मीं कितीही प्रयत्न केला तरी मी तुमची कोणतीही गोष्ट मान्य करणार नाहीं. जिवांत जीव आहे, तोंपर्यंत ह्मणून असली गोष्ट होणार नाहीं, हें खूब ध्यानांत ठेवा.

टिपू—अगर, जो तूं आपने खुशीसे अशक न हुई, तो जबरदस्तीसे ताबे कर लूंगा.

हंसा०—नकाहो नका! असले दुष्ट विचार मनांत आणूं नका! मी तुमच्या पायां पडत्ये! मला नकोहो छळूं! मी तुमच्या मुलीप्रमाणें आहें; किंवा धाकट्या बहिणीप्रमाणें आहें! जाऊंद्या हो मला!

कां विनाकारण मला छळतां? दया येऊंद्या हो कांहीं तरी!!

टिपू—तूं दिमागी या मिन्नत कर; मगर, मेरे मनकी मुराद पुरी हुवेबगर मै तुजको न छोडुंगा.

हंसा०—कायरे मेल्या ह्मणतोस? तुझा हेतु पुरा होईल ह्मणून मेल्या तुझा सत्यानाश होईल! ये तर खरा पुढें; मी अबला आहे, असें समजतोस होय? हो- ऊंदेच एकदां! मेल्या कसाबा! तुला दया कोठून येणार? मी तर आपल्या जीवावरच उदार आहें. मेल्या तुझ्या नरडीचाच घोट घेत्यें.

टिपू—ऐसा क्या? होने दे तब. ( पुढें होऊन तिला धरूं जातो. )

हंसा०—हं! खबरदार माझ्या अंगाला हात लावशील तर! देवा! आतां मी कसें करूं? प्राणनाथ! धां- वाहो धांवा!! हा मेला लांडगा हरणीवर झडप घालीत आहे!!! ( टिपू धरतो, ती हाताचा चावा घेत्ये, रक्त निघतें. )

( इतक्यांत हातांत नग्न तरवार घेऊन रामराव पुढें येतो. )

रामराव—प्रिये! भिऊं नको, भिऊं नको! हा मी आलों पहा. ( टिपू हे शब्द ऐकून तिचा हात सोडून खिन्न होऊन रामरावाकडे पहात दूर उभा राहतो. ) ( रामराव त्यास पाहून, क्रोधानें ) अरे उन्मत्ता! अरे पतिव्रतास्त्रियांचा छल करणाऱ्या अधमा! आतां कोठें जाशील? ह्या जगांत तुझा कोणी शा-

स्ता नाहीं असें समजतोस काय? तूं पाहिजे तसें आचरण केलेंस; तरी, तुला कोणी बोलणार नाहीं, असें समजतोस काय? अधमा! मराठे वीरांचा पराक्रम तूं जाणत नाहींस काय? अरे दुर्जना! मराठ्यांच्या पराक्रमाची साक्ष इतिहास देत नाहीं काय? अरे कृतघ्ना! त्या उन्मत्त अफझुल्याला कोणीं ठार केलें? पाहिस्तेखानाचीं बोटें कोणीं छाटलीं? रणमस्तखानाची मस्ती कोणीं जिरविली? अरे! फार कशाला? तुझ्या बापाला रानोमाळ कोणीं हिंडविलें? जबरदस्त खंडणी कोणीं घेतली? अरे हराम खोरा! तुझ्या हातांत भोपळा कोणीं दिला माझ्या बापानेंचना? तें विस्मरण तुला कसें झालें? आतां माझे पासून तुझें रक्षण कोण करिल? बोल बोल दुष्टा! तुझा त्राता कोण आहे? आतां तुझी चरबी बाहेर काढली तर मला प्रतिबंध करण्याचें कोणाचें सामर्थ्य आहे? अरे अधमा! माझ्या पित्याचा घात करण्याला त्या दुष्टाला मदत दिलीस नव्हे? माझे प्रियेचा छल कोणीं केला? तूंच ना तो? काय करूं रे? या चांडाळांना मृत्यूपेक्षांही भयंकर शिक्षा पाहिजे होती; परंतु, काय करूं? इलाज नाहीं!

टिपू—( तरवार सरसावून ) अबे हरामखोर! मेरे पिरसे हुवे दस्तरखानेमे तुने आके धुल डाली, और क्युलगाया है? नाहक बकवा करनेवाले! तेरेमे कुछ ताकद होगी, तो आ जा सामने; तेरे और

मेरे दो हात होने दे. सच्चे मुसलमिनकी ताकद कैसी होती है यह तुजको दिखलाताहूं आ जा.

**रामराव**–तूं युद्ध करणार काय? ठीक आहे. ( दोघे लढतात टिपू खालीं पडून रामराव छातीवर पाय देऊन ) हा दुष्टा! आतां कोठें जाशील? ( तरवार दाखवून ) तुला सुंदर बायको पाहिजे होती काय? ही पहा आतां तुझ्या गळ्याला मिठी मारते. ( हात वर करतो. हें पाहून. )

**टिपू**–मै आपका गुलाम हूं. मुजकोबचाओमुजको मारके आपका कौनसाभी काम न होगा. इस शिवाय तुह्मारे पिदरके मरनेको मै कुछभी बाईस नही हूं. सिर्फ मदतकेवास्ते मैने सवार दियेथे. सिवाय पादशाई बाइसके मेरा दुसरा कुचभी इरादा नहीथा. तुह्मारे औरतको उन्होनेही मेरे तरफ भेजा. अभीतक मैने उसका नामभी नही लियाथा. यहि पहिला वक्त है. वो बडी पाक है. मै उसको अपने हमशिराके मुआफिक समजाता हूं. मुजको बहोतही पसेमानी हुई है. यह मेरे बुजूर्गोंके जगहपै है. इसबाद मै दुसरेके औरतपर बद नजर न रखूंगा.

**रामराव**–हें भाषण सत्य असें कधींही मी मानणार नाहीं. संकटांत सांपडलेले प्रसंगीं पाहिजे तें बोलण्याला तयार होतात.

टिपू–नही जनाब नही; मै कुरानकी कसम खाकर कहता हूं, के तुह्मारे साथ कभी दुशमनी न रखूंगा. यह मेरे हमशिरा मुआफिक है; दुसरोंकी औरतें मादर मुआफिक है. इसमें तफावत होगी तों वह सब देखनेवाला परवरदिगार मुजको सजा देवे.

रामराव–आणखी एक गोष्ट कबूल केली पाहिजे; माझ्या बरोबर माझे छावणीपर्यंत तुह्मीं आलें पाहिजे. मी दगा करणार नाहीं; परंतु, माझे संरक्षणाकरितां मला ही खबरदारी घेतली पाहिजे.

टिपू–मुजको कबूल है. मै आपके साथ आऊगा.

रामराव–ध्यानांत ठेवा, जर दगा दिसला तर तेथेंच तुह्माला ठार करीन.

टिपू–ऐसा कभी न होगा. मुजको आपला भरोंसा है.

रामराव–( पाय काढून ) उठातर आतां. प्रिये! हा पुरुषाचा पेहराव आहे हा घे.

( हंसाबाई पुरुषाचा वेष घेत्ये. )

रामराव–चला टिपूसाहेब! गडबड केल्याखेरीज बरोबर चला.

टिपू–बहोत अच्छा!

( तिघे जातात. )

# अंक ३ रा.

## प्रवेश ४ था.

( रामराव प्रवेश करितो. )

**रामराव**—अहो वीरहो! पाहतां काय? उपसा तरवारी 'हरहर महादेव' ह्या पवित्र शब्दाचा जयघोष करून शत्रूवर तुटून पडा. तुह्मांला ह्यानें भारी त्रास दिला आहे. अनेक वेळां ह्यानेंच तुमची रसद गारद केली. रानावनांत हिंडविण्यास तरी हाच कारण झाला. आज तुह्माला विजय खास मिळणार! ह्याचा पुरा समाचार घेतल्याखेरीज विश्रांती ह्मणून घ्यावयाची नाहीं. तुह्माला फार श्रम झाले आहेत; पण होऊं द्या. मराठे वीर कसल्याही त्रासाला डरत नाहींत; असें, तुमच्या शत्रूला समजलें पाहिजे! गडेहो! विचार करण्याची ही वेळ नव्हें! ते पहा तुमचे मित्र शत्रूला मागें सारीत चालले आहेत. चला; उचला अनिनी. 'हरहर महादेव' ह्या घोषानें दशदिशा भरून टाका. तुमच्या तीक्ष्ण भाल्याचा फटकारा शत्रूला दाखविण्याची हीच वेळ आहे. ( कान देऊन ) काय ह्मणतां! आह्मी तयार आहों ह्मणून? शाबास! शाबास!! असेंच पाहिजे. तो पहा तुमचा शत्रु पाठ दाखवून सुं पळत सुटला. चला करा लगट! ( इकडे तिकडे पाहून ) काय ह्मणता 'गफूरखान पळतसुट -

ला ' ह्मणून? पळूं द्या पळूं द्या; मीच त्याचा पाठलाग करितों. तो माझाच वांटा आहे! तुह्मी ह्या पळणारे लोकांनां कैद करा. परंतु, उगाच कोणाला ठार मारूं नका. शरणांगताला अभय देणें हा आपला धर्म आहे. ज्यानें शस्त्र टाकिलें त्याच्यावर हात करण्यांत काय पुरुषार्थ? चला जा. मी त्या गफूरखानाचा समाचार घेतों. ( पुढें चालून ) काय ह्मणतां ' मी एकटाच जाऊंनये ' ह्मणून? वाहवारे वाहवा! एकट्या शत्रू बरोबर दहाजणांनीं युद्ध करावें असें कोणत्या शास्त्रांत सांगितलें आहे? चला जा; तुह्मी आपलीं कामें करा. मजबरोबर कोणीही येऊं नका! ( कान देऊन ) काय ह्मणता? हें साहस आहे ह्मणून! असें तर मुळींच नाहीं. शत्रूला पराक्रम दाखविण्याची हीच वेळ आहे; पाहिजे तर बरोबर या; परंतु, माझ्या कामांत कोणीही मदत करितां उपयोगाची नाहीं. ( पडद्यांत ) ' कबूल. ' हं चला तर मजबरोबर.

( जातो. )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( यशवंतराव व मानाजीराव येतात. )

**यशवंतराव**—मग पुढें प्रसंग कठिण दिसतो. हैदराचा पराजय झाला ना? स्वतः श्रीमंत सुद्धां रणभूमीवर आले? काळ फिरला ह्मणजे सर्व विपरित बातम्या ऐकण्याचें नाशिबीं येतें! हल्लीं काहीं आपलें दैव अनुकूळ दिसत नाहीं! रामरावानें तर मोठीच मात केली! कोण त्याचें धाडस! टिपूच्या गोटांत शिरून हंसाबाईला घेऊन जाणें ह्मणजे कांहीं सामान्य काम नव्हे!!

**मानाजी०**—हंसाबाईला घेऊन गेला इतकेंच नाहीं; तर, टिपूला सुद्धां त्याच्याबरोबर जाणें भाग पडलें! एवढा मानी वीर टिपू; परंतु, तो सुद्धां दीन झाला! काय करील बिचारा! सांपडला तडाक्यांत!!

**यशवंतराव**—त्या भिकारड्याचा उत्कर्ष ऐकण्याची पाळी येणें ह्यापेक्षां जास्ती दुःखाची गोष्ट कोणती?

**मानाजी०**—त्याचा उत्कर्ष ह्मणजे आमचा अपकर्ष हें कांहीं सांगावयाला नको!

**यशवंतराव**—त्याचें दैव जोरावर खरें! त्या मारेकऱ्यांच्या हातून सुद्धां काम झालें नाहीं!! दोन तर मारले गेले; दोघांनां तोफेच्या तोंडीं देऊन उडविलें!! तिकडून कार्यभाग झाला नाहीं ह्मणून गफूरखाना

कडे संधान बांधिलें; आतां, तो तरी काय करितो हें पाहणें आहे!

**मानाजीराव**—त्याचाही परिणाम चांगला होईल असा रंग दिसत नाहीं!

**यशवंतराव**—पण मला अजून असें नाहीं वाटत!

**मानाजी०**—महाराज! एकंदर गोष्टींचा विचार केला ह्मणजे आपलेदेखील ध्यानांत सहज येईल कीं, आतां आपल्याला सुखाचे दिवस येण्याची आशा नको!

**यशवंतराव**—कां बरें?

**मानाजी०**—अनेक लढायांत त्रिंबकराव मामानें हैदराचा पराजय केला आहे; किल्ल्याचा पाठीमागून किल्ले मराठे वीर सर करीत चालले आहेत; खासे श्रीमंत श्रीरंगपट्टणच्या किल्ल्याला घेरा घालून बसले आहेत; रामरावानें तर टिपूचा पुराच फजेता उडविला. त्यानें कुराणाची शपथ घेऊन त्याच्या बरोबर मैत्री केली आहे. पटवर्धन सरदारांनीं त्याच्या राज्यांत हुतुतूचा डाव मांडला आहे; गांवचे गांव जाळून पोळून खाक करीत मुख्य सैन्याला मिळण्याकरितां निघाले आहेत. ह्या एकंदर गोष्टींचा विचार केला ह्मणजे रामराव आतां इकडे मोरचा फिरविल्याखेरीज राहणार नाहीं. रामरावावर श्रीमंताची बहाल मर्जी आहे; वारंवार त्याला शाबासकीचीं पत्रें येत आहेत. मिळून एकदां प्रसंग कठीण तर खराच!!

**यशवंतराव**–माझा तर निश्चय आहे; लढाई केल्याखेरीज रहावयाचें नाहीं. समरांत त्याला दोन हात दाखवूं; मग, कांहींही होवो! मी त्याचा समाचार घेणार. तो जसा वीर आहे तसा मीही आहें, असें त्यालाही समजलें पाहिजे. पण, बहुधा गफूरखानच त्याचा समाचार घेईल! पण, अजून तो खंड्या कां बरें येत नाहीं? त्याला मुद्दाम गफूरखानाकडे पाठविलें होतें.

**मानाजी०**–आज तरी तो परत यावा! मग काय झाले परमेश्वर जाणे! ( इतक्यांत खंडू येतो, व मुजरा करितो. )

**यशवंतराव०**–( मुजरा घेऊन ) काय रे बाबा, काय हकिगत आहे?

**खंडू**–सरकार कसली खबर? मोठा घात झाला!!

**मानाजी०**–काय झालें? सांग सांग; भिऊं नको. अप्रिय ऐकण्याचेच आतां आमचे दिवस आहेत!

**खंडू**–सरकार! टिपूच्या गोटांतून रामराव परत आले. सर्व लोक मोठ्या आनंदांत होते. गफूरखान त्यांच्या टेहळीवर होताच. त्याला वाटलें कीं, असल्या प्रसंगीं छापा घातला तर आपलें काम होईल. महाराज! काय सांगूं तो प्रसंग? मुसलमानांनीं पाहांटेच्या चार घटका रात्रीस मराठ्यांच्या छावणीवर हल्ला केला; तेव्हां, फक्त पहारेकरी पहारा करीत होते; बाकी सर्वत्र शांतता होती. मुसलमान छपून गोळीच्या टप्प्यावर गेले; त्यांनीं आपलीं शस्त्रास्त्रें

सरसावलीं, आणि एकदम दीन दीन करून मराठ्यांवर चाल केली! मराठे पाहारेकऱ्यांनीं आपली लढण्याची शिकस्त केली. जरी मुसलमान ज्यास्ती होते; तरी, त्यांनीं त्यांनां एक तसूभर सुद्धां पुढें येऊं दिलें नाहीं! मुसलमानही मोठ्या नेटानें लढले! अगदीं हातघाईचा प्रसंग तो!! हा इकडे असा घोंटाळा चालला आहे; इतक्यांत, सर्व सैन्य तयार होऊन आलें. मग तर मुसलमानांची पुरतीच त्रेधा! पुढेंही जातां येईना व मागेंही हटतां येईना! मराठ्यांच्या स्वारांनीं त्यांनां मध्यें घेतलें, व जी कापाकापी सुरू केली; ती, न भूतो न भविष्यति! मुसलमान दीन दीन करीत अगदीं हातांत तरवार धरण्याचें सामर्थ्य होतें, तोंपर्यंत लढले; परंतु, कांहीं इलाज चालेना!!

**यशवंतराव**—मग पुढें काय झालें?

**खंडू**—सरकार! ह्याप्रमाणें सुमारें एक प्रहर मारामारी चालली होती! काय सांगू साहेब? रामराव एकसारखे आपल्या शिपायांनां उत्तेजन देत विजेप्रमाणें चमकत होते. अखेर, मराठे वीरांमध्यें जयाच्या आरोळ्या सुरू झाल्या; व मुसलमान लोकांनीं पळ काढला. ज्याला जिकडे वाट सांपडली, तिकडे तो गेला! मराठे स्वारांनीं पाठलाग करून कित्येकांचीं डोकीं कापिलीं; कित्येकांनां जखमी केलें; कित्येकांनां कैद करून नेलें! मिळून, त्या लढाईंत मुसलमानांची फारच त्रेधा उडाली!!

**यशवंतराव**—गफूरखानाची काय अवस्था झाली?

खंडू–सरकार! जेव्हां पळापळ सुरू झाली; तेव्हां, तेही दहा स्वार बरोबर घेऊन पळून जाऊं लागले. परंतु, बरोबरचे सर्व स्वारही मारले गेले! मग, एकटेच जीवाच्या भयानें पळत होते; इतक्यांत, रामरावांची नजर त्यांच्यावर गेली!

यशवंत०–मग पुढें?

खंडोजी-मग, मेघगर्जनेप्रमाणें आरोळी मारून रामराव ह्मणाले; अहो कपट पटू! अहो पलायन पंडित! फिरा; माघारे फिरा. असें पलायन तुह्मांला शोभतें काय? छापा घालून मराठ्यांचा पराजय करूं इच्छिणारे तुह्मींच ना? मग असें पळतां कां? हा तुमचा शत्रू समोर असतां त्याला पाठ दाखवून पलायन करणें हेंच कां तुमचें ब्रीद? धिःकार असो तुमच्या सारख्या शिपायांनां!! हे शब्द ऐकून व पाठलाग करणारे हे आपला पिच्छा सोडीत नाहींत असें पाहून तो मागें फिरला व ह्मणाला, अरे गर्विष्टा! जयमदानें फुगून जाऊन वीराचा अपमान केल्याचें प्रायश्चित्त तुजला मिळालें पाहिजे. आतां ह्याचा पराक्रम पहा; असें ह्मणून, त्यानें आपला घोडा मंडळावर धरिला.

मानाजी०–मग पुढें?

खंडोजी–मग रामरावांनीही आपल्या स्वारांनां नुसती गंमत पाहा, ह्याचा समाचार मीच घेतों, असें ह्मणून तेही पवित्र्यावर उभे राहिले. सरकार दोघेही पट्टाईत वीर! एक घटकापर्यंत दोघांचें युद्ध

झालें! अखेर, रामराव ओरडून ह्मणाला, ' अरे नीचा! यशवंतरावाला मदत करणारा तो तूंच ना? तुझ्या समक्षच ना त्या हराम खोरानें माझे पित्याचा घात केला? बेरडा; सांभाळ; तुझी मर्यादा आटोपली. ' असें ह्मणून त्यानें जो गजब करून सोडिला, तो सांगतां येईना! त्याच्या हस्तकौशल्याकडे नजरही ठरेना. खानानेंही कमी केलें असें नाहीं. त्यानेंही दोन वेळां रामरावाला ठार मारण्याचा घाट केला. परंतु, फुकट गेला! असे डाव व पवित्रे होतां होतां रामरावानें गफूरखानाच्या हातावर वार केला. आधींच श्रमला होता; हाताला जखमही जबर लागली; ह्यामुळें, बिचारा धाडकन् घोड्यावरून खालीं पडला!

**यशवंत०**—मग पुढें?

**खंडोजी**—तो खालीं पडतांच रामरावानेंही खाली उडी टाकिली; व छातीवर पाय देऊन ह्मणाला, तूं जर माझ्या बापाला मारण्याच्या कामांत नसतास, तर असल्या स्थितींत तुझें रक्षण केलें असतें. परंतु, तुझी उपेक्षा करतां येत नाहीं, असें ह्मणून त्याचें मस्तक धडापासून वेगळें केलें!!

**मानाजी०**—हाय! हाय! फारच वाईट झालें!! आपलें सुकृत संपलें; आतां धडगत नाहीं. तो आमचीही अशीच अवस्था करणार! तो रणमदानें धुंद झाला आहे; त्याला जे अपकार केले त्यांचा तो पूरा सूड घेणार! हाय! हाय!! कोण प्रसंग हा!

सरकार! ही हकीगत ऐकून माझे तर हातपाय थंड पडत चालले!

**यशवंत०**—भिण्याचें कारण नाहीं. मरणाला कोण भि-तें? माझा तर निश्चय आहे. अखेर पर्यंत मी लढेन; मारीन किंवा मरेन. दोहों खेरीज मला अन्य गती नाहीं!

**मानाजी०**—आणि मला तरी काय आहे? चला तर. आपल्या तयारीला लागलें पाहिजे. तो आतां इकडे केव्हां धाड घालील, ह्याचा नेम नाहीं. कारण, त्याची कामगिरी तिकडली बहुतेक आटपलीच आहे.

**यशवंत०**—कायरे खंडू! मग पुढें काय झालें?

**खंडोजी०**—पुढें काय? तें शिर भाल्याला टोंचून घेऊन गेले!

**मानाजी०**—हें तुला कसें पहावयास सांपडलें?

**खंडोजी०**—मी गफूरखानाबरोबर होतों. जेव्हां भरीच बिकट प्रसंग आला; तेव्हां, मी सगळ्यांच्या आधीं पळालों; तों एका उंच झाडावर चढून बसलों! ह्मटलें, सर्व निरवा निरव झाली ह्मणजे निघून जाईन. पुढें दोघांचें युद्ध त्याच झाडाजवळ झालें; तेव्हां, मला आयतेंच पाहण्यास सांपडलें!

**मानाजी०**—चला जाऊं! जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें वागलें पाहिजे!

( सर्व जातात. )

———

# अंक ४ था.

## प्रवेश २ रा.

### स्थळ–श्रीरंगपट्टण.

( माधवराव, त्रिंबकरावमामा, गोपाळराव पटवर्धन. )

**माधवराव**–माझे शूरसरदारहो! आज पर्यंत तुह्मीं अनेक लढाया जिंकिल्या; शेंकडों बळकट असे डोंगरी किल्ले सर केलेत; अगणीत अशी लूट मिळविलीत; शत्रूच्या शूर सरदारांनां कैद केलें; हैदराला तर मोहरम करून किल्यांत पळविलें; त्याचा सारा प्रांत उजाड करून टाकिला. इतक्या गोष्टी केल्यात; तरी, अझून त्या मानी हैदराला जय मिळविण्याची उमेद आहे. वीरहो! अजून त्याचीं कारस्थानें बंद होत नाहींत. निजामानें आमच्या राज्यावर स्वारी करावी ह्मणून त्याचे प्रयत्न सुरू आहेत. फरान्सिस लोकांकडे तर त्याचें संधान सुरू आहे. इंग्रज लोकांनां, वळविण्याकरितांही त्यानें वकील पाठविले आहेत. परंतु, तुमच्या बाहूबळाचा सर्वांनां दरारा बसला आहे. हैदराच्या कवायती सैन्याचा तुह्मी फडशा उडविला; हें पाहून सर्व राजे चकित होऊन गेले आहेत. तुमच्या विरुद्ध शस्त्र उचलण्याचें कोणालाही धैर्य होत नाहीं. सरदारहो! तुह्मी आपला पराक्रम जगाला चांगला दाखविला. तुमचे देशबांधव हें ऐकून तुह्मांला

शाबासकी देत असतील. भाट तुमच्या शौर्याचें कवन करून गात असतील! परंतु, इतक्यांत आपलें कर्तव्य संपलें असें मात्र नाहीं. जों पर्यंत आपण शत्रूची राजधानी हस्तगत केली नाहीं; तों पर्यंत आह्मी कितीही जय मिळविले, कितीही किल्ले सर केले, तरी फुकट आहेत. आपण ह्या ठिकाणीं वेढा घालून पंधरा दिवस बसलों असून, अद्याप आपण किल्ला सर केला नाहीं; ह्याबद्दल आमच्याविषयीं लोक काय ह्मणतील ह्याचा विचार करा. " मराठे एवढे पराक्रमी असून त्यांनां श्रीरंगपट्टणचा किल्ला सर करितां आला नाहीं. " अजून तुह्मी येथें किती दिवस बसणार! बापहो! चला, उठा; कंबरा बांधा; घ्या देवाचें नांव; तुमच्या जयघोषानें दाही दिशा भरून टाका; तुमच्या शस्त्रास्त्रांनीं शत्रूची त्रेधा उडवा; आपल्या धन्याचा भगवा झेंडा किल्ल्याच्या तटावर फडकावा. तुह्मीं मनावर घेतलें तर तुह्मांला कोणती गोष्ट अशक्य आहे? तुमच्यापुढें उभें राहून लढण्याचें कोणाचें सामर्थ्य आहे? तुह्मांला दुर्गम अशी कोणती जागा आहे? नंदीदुर्ग, रामदुर्ग, बासकोटा, बालापूर, मंगळोर हे किल्ले कोणी सर केले? दऱ्यांत, खोऱ्यांत, पहाडावर, मैदानांत, पाहिजे त्या ठिकाणीं लढाईची शिकस्त करण्याचें सामर्थ्य मराठ्यांखेरीज दुसरे कोणामध्यें आहे? तुह्मांला आपल्या धर्माचा मोठा अभिमान आहे; तुमच्या पूर्वजांनीं धर्माकरितां आपल्या देहाच्या आहुती दिल्या आहेत. अ-

सें असून, तुमच्या पवित्र धर्माचा छल ह्या हैदराच्या राज्यांत किती होत आहे ह्याचा विचार करा. फार काय सांगू? वीरहो! ह्या अविधानें दहा हजार हिंदूच्या सुंता केल्या आहेत! हाय हाय!! तुमचे सारखे शस्त्रपाणी वीर हिंदुधर्माचे अभिमानी ह्या पृथ्वीवर हयात असतां असा छल व्हावा ना? पतिव्रता स्त्रियांनां अब्रूखातर मरणें भाग पडावें ना? धिःकार, धिःकार आह्मां शस्त्रधरांनां! ज्यांच्या राज्यांत असले घोर अनर्थ घडतात त्याचा सूड आह्मीं अजून घेऊं नये?

मामा०—काय विशाद आहे? श्रीमंतांनां इतका विषाट वाटण्याचें काय बरें कारण? सरकार! आपल्या ह्या सरदारांनां आज्ञा मात्र व्हावी; मग, ह्यांचा पराक्रम पहा. जो जो हुकूम ह्या तोंडातून निघेल तो बजाविण्यास हे रथि महारथी तयार आहेत! सगळा किल्ला जमीन दोस्त करूं; हैदराच्या मुसक्या बांधूं; शहराचा विध्वसं करूं!! सरकार! आज आपल्या सरदारांचा पराक्रम पाहा. किल्ला सर केल्या खेरीज परत ह्मणून फिरणार नाहीं.

गोपाळ०—सरकार! अनेक जिवावरच्या लढाया मारून थकलें भागलेलें सैन्य विश्रांति घेत होतें ह्मणून किल्ला सर करण्याला अवधी लागली; इतक्यावरून शत्रूला गर्व करण्याचें कारण नाहीं. मराठे वीरांनीं आपला क्रम सोडिला होता काय? शहराची नाकेबंदी कोणी केली? रसद बंद कशी झाली? मोरचे कोणी बांधिलें? इतक्या गोष्टी झाल्या ह्या

मराठे वीरांच्या दिरंगाईनेंच काय? आतां आमचे शिपाई विश्रांति घेऊन ताजेतवाने झाले आहेत; लढाईची सर्व तयारी होऊन चुकली आहे; आतां आमचा पराक्रम पहा! दिवाभीताप्रमाणें लपून बसणाऱ्या शत्रूचीं हाडें खिळखिळीं करितों. किल्ला आजच्या आज सर करूं!

**माधवराव**—शाबास! वीरहो शाबास!! तुमचा धैर्यसूर्य मावळला नाहीं; किंवा, विजयश्रीनें तुमचा त्यागही केला नाहीं. तुह्मीं मनावर घेतल्यावर काय नाहीं होणार? करा तर तयारी; बांधा कंबरा; शत्रूला आपला पराक्रम दाखवा, व लढाईचा शेवट लावा.

**मामा०**—सरकार! आजचा दिवस हा ह्या युद्धाचा शेवटचा आहे. आह्मी रजा घेतों; आमच्या तरवारीचें पाणी कसें आहे तें दाखवितों. चला; वीरहो माझ्या मागून चला! आपापल्या मोरचावर हजर व्हा. चालूं द्या तोफांचा धडाका. आज किल्ला सर केल्याखेरीज परत ह्मणून फिरावयाचें नाहीं.

( सर्व मुजरे करून निघून जातात! )

पडदा पडतो.

---

# अंक ४ था.

## प्रवेश ३ रा.

( हंसाबाई व रामराव. )

**हंसाबाई**—अग बाई! कोण तो प्रसंग; त्या प्रसंगाचें स्मरण झालें ह्मणजे आंगावर कांटा उभा राहतो!

तेव्हां जर येणें झालें नसतें, तर कसें झालें असतें? पुन्हा किनई हे पाय नजरेस पडले नसते.

रामराव–पण परमेश्वराच्या घरीं अन्याय नाहीं. प्रिये! तुझा छळ करण्यांत ज्यांचें ज्यांचें ह्मणून आंग होतें; त्यांचा सूड घेण्याची तर माझी प्रतिज्ञा होती. ह्या कपट-नाटकाचे अग्रेसर व मुकुटमणि यशवंतराव व मानाजी असून अनान्वित कृत्यें करून मिळविलेलें वैभव भोगीत आहेत. त्यांचा सूड घेतला ह्मणजे, मी तुझ्या ऋणांतून मुक्त झालों! श्रीमंतांचा हैदराबरोबर तह झाल्याबद्दल खलिता आला आहे. आमचें इकडलें सर्व काम आटोपलें. आतां आपल्या संस्थानाकडे जाण्याला हरकत नाहीं.

हंसाबाई–विचारीन ह्मणून ह्मणतां ह्मणतां तसेंच राहिलें!

रामराव– काय तें विचार आतां.

हंसाबाई–आपलें अकस्मात येणें तेथें कसें झालें? हें एक गूढ आहे.

रामराव–आपणाकडून पत्र आलें नव्हतें कां?

हंसाबाई–होय, पण त्याचें काय?

रामराव–त्यांत पाहेरकरी अनुकूळ असल्याचें नव्हतें कां लिहिलेस?

हंसा०–होय, तसा मजकूर होता खरा.

रामराव–मी लागलाच निघालों! बरोबर दोनशें निवडक लोक घेतले!

**हंसाबाई**—मग छावणींत प्रवेश कसा झाला?

**रामराव**—पाहरेकऱ्यांनां सांगितलें कीं, यशवंतराव घोरपड्याचे आह्मी लोक आहोंत.

**हंसाबाई**—पण दोनशें असामी पाहून त्यांनां शंका कशी आली नाहीं?

**रामराव**—मी सगळे लोक छावणी बाहेर छपवून बसविले! फक्त एक इसम बरोबर घेऊन गोटांत शिरलों. तुझ्या तंबू जवळ गेलों, तों एक म्हातारी घाबऱ्या घाबऱ्या कांहीं त्या पाहरेकऱ्यांनां सांगत होती. मला पाहतांच शिपायांच्या कानांशीं लागली, व लगेच मला आंत जाण्याची परवानगी झाली.

**हंसाबाई**—बरें निभावलें ह्मणून! कोण धाडस हें! तो टिपू कांहीं सामान्य नाहीं. माझ्यातर जीवांत जीव नव्हता. परमेश्वरानें सर्व सुरळीत पार पाडलें.

**रामराव**—आज आपणास येथून कूच करून गेलें पाहिजे. अजून मुख्य शत्रु ते तिकडेच आहेत. श्रीमंतांची ही आज्ञा अशीच आहे. लढाई केल्याखेरीज ते कांहीं वठणीस येणार नाहींत.

**हंसाबाई**—असें त्यांच्या जवळ कितीसें सैन्य असणार?

**रामराव**—दोन तीन हजार लोक त्यांनीं नवीन ठेविले आहेत. परंतु, विशेष भिण्याचें कारण नाहीं; सगळे सरदार मला अनुकूळ आहेत. माझ्या जाण्याची ते वाट पाहत आहेत. एकही मनुष्य न

दगावतां, मी संस्थानचा कबजा घेईन. प्रिये! आतां मी कूचाच्या तयारीचा हुकूम करण्याला जातों.

( रामराव जातो व पडदा पडतो. )

---

# अंक ४ था.

## प्रवेश ४ था.

( यशवंतराव व मानाजी. )

**मानाजी**–सरकार! हैदराकडील कांहीं वर्तमान कळलें कां?

**यशवंतराव**–नाहीं. काय झालें?

**मानाजी**–मराठे सरदार श्रीमंताजवळ किल्ला सर करण्याची प्रतिज्ञा करून निघाले. इतकी हकिकत आपणास समजलीच आहे.

**यशवंतराव**–होय. तें मला कळलें आहे. पुढें काय झालें?

**मानाजी**–आधींच श्रीमंतांच्या मर्मभेदक व विरश्रीच्या भाषणानें मराठे सरदारांचीं डोकीं भणाणून गेलीं होतीं. मोरच्यांत गेल्याबरोबर त्यांनीं तोफांचा व बंदुकीचा सारखा वर्षाव सुरू केला. धडाधड तोफाचे गोळे तटाला धडकूं लागले. सटासट बंदुकीच्या गोळ्या लागूं लागल्या. धुराच्या योगानें

आकाश पाताळ एक होऊन गेलें. कित्येक साहसी वीर शिड्यांच्या साह्यानें वर चढण्याचा प्रयत्न करूं लागले. कित्येकांनीं दरवाज्यावर धडाका सुरू केला. मराठे लोकांचा हा अनावर मारा सहन न होऊन किल्ल्यावरचे लोक जिवावर उदार होऊन रक्षण करूं लागले. तेही शत्रूवर जळकीं लांकडें तापलेल्या तेलाच्या कढया, विटा, दगड, कुलपी गोळे ह्यांचा वर्षाव करूं लागले. जीवावर उदार होऊन दोन्ही पक्षांकडील वीर लढत होते. बराच वेळपर्यंत जय कोणाला मिळणार ह्याचा अंदाज होईना! परंतु श्रीमंतांची सद्दी जोरावर असल्या मुळें, तोफांचा मारा सहन न होऊन, दक्षिणेकडचा बुरूज कोसळून पडला. मग काय विचारतां? टोळधाडीप्रमाणें मराठे वीर पडक्या बुरजाकडे धावूं लागले. शहरांत एकच आकांत उसळला. तोफांच्या गोळ्यांनीं शहरांत आगी लागल्या. त्या वेळीं त्या शहरावर पंच महाभूतें क्षोभलीं कीं काय असें वाटूं लागलें. सगळ्यांच्या तोंडचें पाणी पळालें. मराठे वीरांत विजयाच्या आरोळ्या सुरू झाल्या. शत्रूकडील वीर कपाळावर हात मारून घेऊं लागले. तहा खेरीज आतां तरणोपाय नाहीं असें हैदराला वाटूं लागलें. त्यानें तहाचें बोलणें करण्याकरितां वकील रवाना केले. परंतु, आह्मी किल्ला सर केल्या खेरीज कांहीं ऐकत नाहीं, असा मराठ्यांकडून जबाब मिळाला. तेव्हां तर हैदराची पांचावर धारण बसली. तह करण्याविषयीं तो गाया वाया करूं लागला.

परंतु, मराठे आपला हट्ट सोडीनात. अखेर मराठ्यांचें भगवें निशाण श्रीरंगपट्टणाच्या किल्ल्यावर फडकूं लागलें. मराठ्यांच्या लष्करांत विजय सूचक नौबता झडूं लागल्या. तोफांची सरबत्ती सुरू झाली. शत्रूच्या सैन्यांत तर कोणाच्या तोंडावर नूर राहिला नाहीं. हैदराचे वकील तहाचीं बोलणीं बोलूं लागले. श्रीमंतांनीं तहाच्या अटी सांगितल्या त्या फार जरब होत्या. तरी नाइलाजास्तव हैदराला मान्य कराव्या लागल्या. जितका मुलूख मराठ्यांनीं जिंकला आहे तो त्यांच्याकडे रहावा. जे किल्ले मराठ्यांनीं सर केले आहेत, त्यांवर मराठ्यांचें लष्कर असावें, लढाईचा खर्च द्यावा, पाळेगार लोकांपासून नियमापेक्षां जास्ती खंडणी घेऊं नये, हिंदुप्रजेला त्रास देऊं नये, श्रीमंताबरोबर स्नेह भावानें वागावें.

**यशवंतराव**—ह्या अटी तर फारच जरब आहेत.

**मानाजी**—तरीसुद्धां काळाकडे नजर देऊन हैदरानें त्या कबूल केल्या. तहावर शिक्के मोर्तबें झालीं.

**यशवंतराव**—प्रसंग तर मोठा अणिबाणीचा आला.

( इतक्यांत एक शिपाई येतो. )

**शिपाई**—महाराज! पाहतां काय? चला, पळा, धांवा, जिव वांचवा. आपल्या सैन्यांत फितूर झाला.

**यशवंतराव**—काय फितूर?

**शिपाई**—होय महाराज! आतां वादविवाद करण्याची वेळ नव्हे. शत्रूचा प्रवेश शहरांत जहाला. रामरा-

व हातांत नग्न तरवार घेऊन आपलाच शोध करीत हिंडत आहे. महाराज पळा पळा. आतां अवधी नाहीं. तो दुष्ट तुमचा जीव घेतल्याखेरीज, स्वास राहणार नाहीं. महाराज! त्याच्या त्या भयंकर मुद्रेकडे पाहवत सुद्धां नाहीं. क्रोधाच्या योगानें त्याचे डोळे लाल झाले आहेत; सर्वांग रक्तानें न्हालें आहे; सापाच्या जिव्हेप्रमाणें लळ लळ करणारी तरवार त्यानें हातांत घेतली आहे; असा तो दुष्ट पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें सैरावैरा धांवत आहे.

**मानाजी**—महाराज! माझें रक्षण करा! आतां कसें होईल? मी पळून जातों. तुह्मी ही चला. आपण भीक मागूं! नको राज्य. महाराज! चलाहो चला! मी पांयां पडतों! ( पांयां पडतो. ) तो खरोखरच ठार मारील! अहो तिळा एवढाले तुकडे किहो करील! चला, चला, नको आतां अवधी!

**यशवंतराव**—भिऊं नको! भिऊं नको! मी जीवंत आहें, तोंपर्यंत तुझ्या केंसालाही भीति नाहीं.

**मानाजी**—महाराज! तो अगोदर तुह्मांला मारील, व मग मला मारील! ह्मणून ह्मणतों, तो इकडे येण्याच्या पूर्वींच आपण पळून जाऊं!

**यशवंतराव**—हा भित्र्या, इतकें भिण्याचें कारण काय? अरे, केव्हां तरी मरावयाचेंच! मग दोन हात करून तरी मरूं. कुत्र्याप्रमाणें दारोदार तुकड्यांकरितां भीक मागण्यांत अर्थ काय?

**मानाजी०**—महाराज! हा आपला विचार मला पसंत

नाहीं. विनाकारण मरण्यांत अर्थ काय? चला, आपण जिवंत राहिलों तर कांहीं तरी कारस्थान करूं. पुन्हां राज्य मिळवूं. असें फुकट मरण्यात अर्थ काय? नाहीं तर मी ह्मणजे मरावयाला थोडाच भिणार आहें! चला चला, आतां विलंब करूं नका!

**यशवंतराव**—चल तर. तुझे मर्जीप्रमाणें कां होईना! ( जातात. )

( इतक्यांत रामराव येतो. )

रामराव०—अहो गृहस्थहो! मला पाहून घाबऱ्याप्रमाणें पळतां कां? मजपासून तुह्मांला त्रास होणार नाहीं! मला तुह्मी ओळखिलें नाहीं काय? मी तुमचा शत्रु नव्हे, किंवा तुह्मांला त्रास देण्याकरितां आलेला यवनही नव्हें; किंवा तुमच्या माजी राजाचा खून करणारा यशवंतरावही नव्हें! मी तुमचा राजा, मी तुमचा रक्षण कर्ता, असा असून, तुमच्या राजाचा खून करणाऱ्याचा शास्ता आहें. माझें नांव रामराव. भिऊं नका, भिऊं नका. मी विचारितों, ह्याचें सरळ उत्तर द्या. ज्याची राज्यतृष्णा अनावर झाली होती, ज्यानें प्रत्यक्ष आपल्या चुलत्याचा खून केला, ज्यानें अविंधाबरोबर सख्य करून तुमच्या पोरांबाळांची राखरांगोळी केली, ज्यानें राज्यचक्रामधें घालून तुह्मांला पिळून काढिलें, असा तो दुष्ट, कृतघ्न, पितृघातकी, राजद्रोही, मारेकऱ्याचें नीच काम करणारा यशवंतराव

तुह्मीं कोठें पाहिला काय? भिऊं नका! सांगा, सांगा! त्यानें राजवधासारखें भयंकर कर्म केलें आहे. इतकेंच नाहीं, तर स्वातंत्र्य वृक्षावर कुऱ्हाड मारून त्याला जमीनदोस्त करण्याचेंही धाडस केलें आहे. त्याच्या कर्माचें पातडें फार मोठें आहे! मग सांगा, तो कोणत्या ठिकाणीं लपून बसला आहे? जो कोणी त्या हरामखोराचा शोध लावून देईल, त्याला मोठें इनाम मिळेल! तसाच त्याचा तो दुष्ट स्नेही ज्यानें असलें अघोर कर्म करण्याला त्याला पूर्णपणें सहाय दिलें, तो मानाजी, त्याचप्रमाणें अपराधी आहे. सबब त्याबद्दल ही बक्षीस मिळेल. ( कान देऊन ) काय ह्मणतां? ते आतांच ह्या रस्त्यानें गेले ह्मणून! शाबास शाबास! चला त्यांचा पाठलाग करा! जिकडे जिकडे ते जातील तिकडून त्यांनां धरून आणा; ह्याचा मोबदला तुह्मांला मिळणार नाहीं असें नाहीं; तुमची स्वामिभक्ति जागृत आहे, असें समजून तुमचा मोठा गौरव करण्यांत येईल! तो तुमचा सर्वांचाही शत्रु आहे. त्यानें तुह्मांलाही त्रास दिला नाहीं असें नाहीं. ( पुन्हां कान देऊन ) काय ह्मणतां? आह्मीं त्याचा पाठलाग करितों ह्मणून! शाबास, बापहो शाबास! त्वरा करा; त्वरा करा. मीही त्याच्या शोधार्थ स्वार रवाना केले आहेत! आतां तुह्मांला भिण्याचें कारण नाहीं. तुमचीं दुःखें विलयाला गेलीं ह्मणून समजा. आपल्या मुलांबाळां सहवर्तमान सुखानें संसार करा. मी तुमचा राजा असतां तुमच्या मालमत्तेचा अपहा-

र करण्याचें कोणाचेंही सामर्थ्य नाहीं. मी ही त्यांच्या शोधार्थ गमन करितों. ( जातो. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

### स्थळ–रान.

( यशवंतराव व मानाजीराव. )

**यशवंतराव**–( कपाळावर हात मारून ) मित्रा! काळ फिरला ह्मणजे सर्व फिरतें! धारातीर्थी मरण आलें असतें तरी पुरवतें. माझा निश्चयही पण होता; परंतु, परिणाम अगदींच विपरीत झाला. आमचे सगळे सरदारच त्यांना अनुकूळ झाले. माझा त्यांच्यावर भरवंसा होता; परंतु, गुलामांनीं आयत्या वेळीं दगा केला. एक तरी बार झाला कां?

**मानाजी०**–असें होणेंच स्वाभाविक होतें. बाबासाहेबांवर सगळ्यांचें प्रेम होतें. त्यांचा आपण खून करून राज्य मिळविलें. हा पहिला प्रमाद. बरें, राज्य मिळाल्यावर तरी आपण त्यांच्या शांतवनाचा काय प्रयत्न केला? उलट त्यांना त्रास मात्र दिला. बाबासाहेबांचे प्रीतींतील सर्व मनुष्यें आह्मीं नाहींशीं केलीं. ह्यामुळें सर्व लोकांचीं व सरदारांचीं मनें अस्वस्थ झालीं. आह्मीं त्याच वेळीं विचार

केला पाहिजे होता; परंतु, राज्यमदाच्या धुंदीनें आह्मी बेफाम झालों होतों. सारासार विचार केला नाहीं, त्याचा हा परिणाम आहे. पण आतां काय करावें? कोणीकडे जावें? आपल्याला आश्रय कोण देईल? ( मागें पाहून ) घोड्यांचीं पावलें कोठें वाजतात? आतां आह्मांला स्वस्थता ह्मणून मिळणार नाहीं! आह्मांला कोणी धरण्याला तर नाहीं ना येत? तो आह्मांला सुखानें रानांत सुद्धां राहूं देणार नाहीं.

**यशवंतराव**—धैर्य सोडून उपयोग नाहीं. आपण त्याच्या तडाक्यांतून तर निसटलों. आतां वेषांतर करून निजामाच्या राज्यांत जाऊं. ( वेषांतर करितात. )

( इतक्यांत दोन घोडेस्वार येतात. )

**एक घोडेस्वार**—( दरडावून ) कोणरे तुह्मी?

**मानाजी**—( घाबरून ) आह्मी प्रवाशी आहों.

**दु० घोडेस्वार**—मग इकडे कोठें जातां?

**यशवंतराव**—पाहिजे तिकडे जातो. तुला विचारण्याचें कारण काय?

**पहि० घोडेस्वार**—पकडा ह्या गुलामांना! भले सांपडले.

**दु० घोडेस्वार**—( मानाजीस ) दिवाणसाहेब! वेषांतर करून आतां कोठें प्रयाण करणार होतां?

**मानाजी**—कोणालारे दिवाण ह्मणतोस? गरिबाची उगीच थट्टा काय करावी?

**प० घोडेस्वार**--अहो! हे तर आमचे महाराज.

**यशवंतराव**–( मनांत ) ह्यानीं तर ओळखिलें खरें. ( उघड ) अहो भले लोक! आह्मी तर आतां निराश्रित झालों! आमच्यावर दया करण्याचें आपल्या हातांत आहे.

**प० घोडेस्वार**–दया? आणि ती काय ह्मणून? मोठ्या महाराजांनां ठार करतांना तुह्मांला कोठें दया आली?

**दु० घोडेस्वार**–आणि त्या धाकट्या बाईसाहेबांनां फरफर ओढितांना तरी विचार केला काय?

**मानाजी**–तुमच्या पायां पडतों. आमचे हे सर्व अलंकार घ्या. पण अह्मांला सोडा. आह्मी पुन्हां इकडे मुळींच येणार नाहीं.

**दु० घोडेस्वार**–हें तर मुळींच होणार नाहीं. आह्मी हुकमाचे ताबेदार. आमच्या धनीसाहेबांचा तुह्मांला धरून आणण्याचा हुकूम आहे.

**प० घोडेस्वार**–ह्यांच्या बरोबर बोलण्यांत अर्थ नाहीं; पकडा ह्यांनां.

**यशवंतराव**–( तरवार उपसून ) काय? तुह्मी आह्मांला पकडणार होय? या तर पुढें. माझा पराक्रम ओळखीत नाहीं काय?

**प० घोडेस्वार**–तो तर आह्मांला माहीत आहे. ( दोघे धरूं जातात, दोघांची लढाई होते, इतक्यांत रामराव येतो. )

**रामराव**–त्या गुलामांचा पुष्कळ शोध केला; परंतु, अ-

ह्याप पत्ता लागत नाहीं. त्या ह्यातान्यानें सांगितलें कीं, ह्या वाटेनें दोघे इसम गेले. ( पुढें जाऊन ) हा रस्ता तर जंगलाकडे जातो. छे! इकडे तर पायवाट सुद्धां दिसत नाहीं! पण ते कदाचित् ह्याच रस्त्यानें नसतील गेले ह्मणून कशावरून? ( रेखून पाहून ) ते कोण दिसतात? अहो! ते तर चौघे! ( पाहून ) त्यांत दोघे तर घोडेस्वार आहेत. ( नीट पाहून ) अरे! त्यांची तर लढाई चालली आहे! हं; आलें ध्यानांत. मी घोडेस्वार पाठविले होते. त्यांपैकीं हे दोघे असतील. ते तर यशवंतराव व मानाजी संरक्षणाकरितां लढत असतील. ते दोघे; स्वारही दोघे. शिवाय तो यशवंतरावही सामान्य नाहीं; शूर आहे. स्वारांनां दाद देणार नाहीं. आपणास त्वरा केली पाहिजे. ( जवळ जाऊन ) गडे हो! भिऊं नका, भिऊं नका. पकडा त्या गुलामांनां.

**यशवंतराव**–( पाहून ) अरे बरा सांपडलास. ये तूंच मला धर. तूं मला जाणत नाहींस काय?

**रामराव**–( रागानें ) अरे हरामखोरा! चोरा! घातक्या! नीचा! मी तुला पुरा ओळखितों. आतां कोठें जातोस? तुजसारख्या हरामखोराला फासांवरच चढविलें पाहिजे. शस्त्रानें मरण मुळींच उपयोग नाहीं. ह्मणून तुला जीवंत धरून नेतों. ( दोघे लढतात, यशवंतरावाची तरवार मोडते. व शिपाई त्यास धरितात. )

**रामराव**–( शिपायांनां ) ह्या गुलामांनां बंदोबस्तानें

घेऊन चला. सावधपणानें असा बरें! हे मोठे काफर आहेत! तुमच्या मागून मीही येतों.

( शिपाई त्यांना घेऊन जातात. )

**मानाजी**—( जातां जातां ) आतां आमचीं शंभर वर्षें भरलीं. माझी बायको उघडी पडली. वाळ्याला आतां कोण? देवा! कर्माप्रमाणें फळें मिळालीं!

( जातात. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश २ रा.

( हंसाबाई व चंद्राबाई. )

**चंद्राबाई**—वहिनीसाहेब! एक दुःखाची गोष्ट सांगण्याचं माझे नशिबीं आलें आहे!

**हंसा०**—( दचकून ) काय? दुःखाची गोष्ट! ती कोणती?

**चंद्रा०**—कशी तरी सांगू? मला बाई धीर होत नाहीं!

**हंसा०**—इतकी कां ती वाईट आहे?

**चंद्रा०**—वाईट, पण किती वाईट ह्मणून सांगू? ह्यापेक्षां आणखी वाईट तें काय असणार?

**हंसा०**—पण सांगितल्या खेरीज मजला कशी कळेल?

**चंद्रा०**—तेंच तर मोठें संकट आहे! तुह्मांला तर क-

ळविली पाहिजे. सांगायला तर धीर होत नाहीं. न सांगून परिणाम नाहीं. हें काम माझ्या वांट्याला कां यावें? दुर्दैवच माझें!

हंसा०–( उतावळेपणानें ) सांगा सांगा. मजविषयीं कां कांहीं आहे? माझा कां त्यांत कांहीं संबंध आहे?

चंद्रा०–होय ग बाई! तुझाच त्यांत संबंध आहे. देवा! नकोरे नको असला प्रसंग कोणावरही आणूं!!

हंसा०–देवा! असें आहे तरी काय? सांगा; मी ऐकण्याला तयार आहें.

चंद्रा०–सांगतेंच तर आतां. वहिनी साहेब! आपणांला विमलगडास गेलें पाहिजें. आणि तें आजचें आज!

हंसा०–काय? विमलगडास; आणि तें आजचें आज?

चंद्रा०–होय ग बाई! 'आजचें आज' असा दादासाहेबांचा हुकूम आहे.

हंसा०–पण तिथें कशाला? स्वारी कां जाणार आहे?

चंद्रा०–काय आतां कसं सांगूं? सांगूं तरी काय?

हंसा०–असें हो काय करितां? नीट सांगा काय तें!

चंद्रा०–सुखाची कां गोष्ट आहे ह्मणून सांगूं? वहिनी साहेब! तुमच्यावर दुःखाचा पर्वत किहो कोसळला!

हंसा०–माझी अझून समजूत पडली नाहीं!

चंद्रा०–वहिनीसाहेब! आपण टिपूच्या घरीं बरेंच दिवस होतां; आपणा विषयीं लोक कुरकुर करितात! मुसलमानांच्या जनानखान्यांत इतके दिवस रा-

हिलेली बायको घरांत कशी घेतली? दादासाहेबांनां तर आपल्या विषयीं शंका नांहीं! परंतु, काय करतील बिचारे! लोकापवादाकरितां तुमची रवानगी विमलगडावर आजच्या आज करण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे.

हंसा०–( रडूं लागते. ) देवा! शेवटीं हें कपाळीं आलें ना? मला डाग लागला ना? प्राणनाथ! कायहो हा विचार केला? आपल्याखेरीज माझें राहणें कसें होईल? माझा त्याग केलाना? माझें तोंडही पाहणार नाहींना? कोण हा प्रसंग! आतां जगांत जगण्यांत तरी काय भूषण आहे? लोकांनां तोंड तरी काय दाखवावें? ज्यांच्या जिवावर उड्या मारावयाच्या, त्यांनींच असें केलें! मग आतां जगावयाचें तरी कोणा करितां? प्राणनाथ! जर मी नकोशी होत्यें, तर आपल्या हातांनीं माझा शेवट कां लाविला नाहीं? मी सुखानें आपल्या समक्ष मेलें असत्यें! आपल्या आज्ञेनें मी विषाचा पेला आनंदानें प्राशन केला असता! पण अशी विटंबना कशी सहन करूं? किती तरी मी अभागी! जन्मास आल्यें तेव्हांपासून असेंच चाललें आहे! आईबाप लहानपणीं वारले! नानासाहेबांनीं बाबांच्या लोभास्तव पालन केलें. तेथें होतें तोंपर्यंत त्यांनीं मला कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. पुढें लग्न झालें; सर्व मनाप्रमाणें घडलें. परंतु माझें दैवच खोटें! तो प्रसंगच कां यावा? परमेश्वराच्या कृपेनें त्यांतूनही निभावल्यें. आतां तरी सुखानें राहावयास सांपडेल

ह्मणून ह्मणत होत्यें; परंतु, माझें दैवच कोठें मला सुख भोगूं देतें? असली दुर्दैवी जगून तरी काय करणार? दुःखेंच भोगावयाचीना? मी त्या डोंगरी ओसाड किल्यावर राहाणार ना? हाय! हाय! आई अंबाबाई! मी असें कोणतें पातक केलें होतें? माझा तर निश्चय झाला. आतां जगावयाचें ह्मणून नाहीं!

चंद्रा०–हं वहिनीसाहेब! असें अभद्र बोलूं नका. आत्महत्येसारखें दुसरें पातक नाहीं. परमेश्वर ज्या स्थितींत ठेवील त्यांत सुखानें राहिलें पाहिजे. कदाचित् तुमचें दैव उलटणार नाहीं ह्मणून तरी कोणीं सांगावें?

हंसा०–त्यांत आतां काय बूज राहिली आहे? माझे इथून तिथपावेतों धिंडवडे धिंडवडे किं हो झाले! आतां जगण्यांत काय शोभा? ज्याच्या जिवावर आह्मीं सुख भोगावयाचें, त्याचें मन दूषित झाल्यावर मग राहिलें काय?

चंद्रा०–असें ह्मणूं नका. सीतादेवीवर असा नव्हता कां आरोप आला? तिला नाहीं कां शेवटीं सुख मिळालें?

हंसा०–तिची गोष्ट निराळी. तिचे साह्यकर्ते केवढाले समर्थ ऋषी होते? शिवाय मुलांकडे नजर देऊन तरी तिला समाधान मानितां येत असे.

चंद्रा०–बाईग! सदोदित सारखे दिवस रहात नाहींत. सत्यमेव जयते! खऱ्याला कोठें भीति नाहीं. सोनें

जों जों तापवावें, तों तों त्याचे गुणच वाढतात. सद्गुणी मनुष्यांचीही गोष्ट अशीच आहे. असले प्रसंग ही कसोटी आहे. जो या कसोटींत उतरेल, त्याची किंमत वाढल्या खेरीज राहणार नाहीं. सुखामागें दुःख व दुःखामागून सुख, असा जगाचा क्रमच आहे. बाई धैर्य सोडूं नका. काळाकडे नजर दिली पाहिजे. तेथें तुह्मांला कोणत्याही गोष्टीची न्यूनता पडणार नाहीं. नोकर चाकर सर्व असतील; फक्त दादासाहेबांची भेट नाहीं.

**हंसा०**—बाकी घेऊन मला काय करावयाचें आहे? त्यांच्या समागमांत मी अरण्यवास सुद्धां सुखावह मानीन.

**चंद्रा०**—कपाळीं आलें तें भोगिलें पाहिजे. थोड्याच दिवसांत बाई सुखाचे दिवस येतील!

**हंसा०**—तुमच्या तोंडांत साखर पडो.

**चंद्रा०**—आतां तुह्मीं निघण्याची तयारी करा. मी दादासाहेबांकडे जात्यें.

**हंसा०**—पण एकवार तरी भेट घेणार नाहींत कां?

**चंद्रा०**—आतां बहुधा तसें होणार नाहीं. पण यत्न करून पाहत्यें.

**हंसा०**—जा; एवढें तरी काम करा.

**चंद्रा०**—मी जाऊन येत्यें. ( जाते. )

**हंसा०**—परमेश्वरा! आतां मी कसे दिवस काढूं? आतां मला कसली आशा आहे? कोणत्या तरी गो-

ष्टीचें सुख आहे कां? मी अभागी! मी करंटी! जन्मापासूनच अशी. त्या मेल्याच्या येथें होतें; तेव्हां, इकडे येण्याची आशा होती. प्राणनाथांचा सहवास घडेल ह्या आशेवर मी कसे तरी दिवस काढिले; परंतु, आतां तर कांहींच नाहीं! हा जीव नकोसा झाला! जाईल तरी बरा! पण तो कशाला जाणार? अजून पुष्कळ दुःखें भोगण्याचें बाकी असेल! पुन्हां पुन्हां आत्महत्या करण्याचें मनांत येतें; परंतु, त्यांत केवढें पातक आहे? एका जन्मांत तरी सगळें भोगून घेऊं! अंबाबाई! तुला नाहीं ना दया येत? नशीब माझें! एकवार भेट तरी होईल कां पण? माझी भेट झाली तर खास मन वळवीन! माझें बोलणें फुकट जाणार नाहीं! ( इतक्यांत चंद्राबाई येत्ये. )

चंद्रा०—वहिनीसाहेब! तें कांहीं जमत नाहीं!

हंसा०—काय? नाहीं ह्मणाले! मला भेट नाहीं ना होत? दिवाणसाहेब! सांगाहो सांगा; आतां म्यां कसें जगावें? हें तोंड लोकांनां कसें हो दाखवूं? तुमचा उपदेश ऐकिला; पण, मला नाहीं हो ह्या वेदना सहन होत! तुह्मांला काय सांगूं? माझ्या पोटांत दुःखाचे उमाळ्यावर उमाळे येत आहेत! दिवाण साहेब! असे कसे हो निष्ठुर झाले?

चंद्रा०—वहिनीसाहेब! निष्ठुर झाले असें नका हो ह्मणूं! हें करणें त्यांनां गोड कां वाटतें? मला पाहतांच तोंड झांकून घेऊन रडूं लागले! तोंडांतून शब्द निघे-

ना! परंतु, सर्व दुःख गिळून जाऊन ह्मणालें, "जा तुह्मी; असें कांहीं होणार नाहीं." असें ह्मणतांना त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण दुःखाचें चिन्ह दिसत होतें!

**हंसा०**—माझ्याकरितां इतकें वाईट वाटतें ना? मग आह्मी उभयतांनींही जन्मभर असेंच दुःख भोगावयाचें ना? पण तिकडे कशाला इतकें दुःख होणार आहे? दुसरें लग्न करितील; ह्मणजे मग विसर नाहीं कां पडणार? दिवाणसाहेब! तुह्मी तरी जाऊन सांगा बरें! तिकडे सुख झालें ह्मणजे मी आपली दुःखांत असलें तरी चालेल! मी नेहमीं पायांचें स्मरण करीत बसेन! प्रत्यक्ष दर्शन घेण्याला परवानगी नाहीं; परंतु, माझे हृदयांत जी मूर्ति वसत आहे तिचें तर ध्यान करण्यास कोणाचा प्रतिबंध नाहीं ना?

**चंद्रा०**—वहिनीसाहेब! इतकें दुःख करूं नका! परमेश्वर भजनांत दिवस घालवा; ह्मणजे तोच तुमचेवर कृपा करील. चला आतां सर्व तयारी झाली आहे!

**हंसा०**—चला मी तयार आहें! माझी तयारी ती कसली?

**चंद्रा०**—चला तर.

(जातात.)

# अंक ५ वा.

## प्रवेश ३ रा.

### स्थळ–श्रीमंतांची छावणी.

( हलकारा. )

हलकारा०–अहो सैनिक हो! श्रीमंत सरकाराची अशी आज्ञा होत आहे कीं, हैदरअल्ली बरोबर तह झाला व ते आतां आपले दोस्त झाले आहेत. तर, त्यांच्या मुलखांत जोंपर्यंत तुह्मीं आहां, तोंपर्यंत रयतेला कोणी ही त्रास देऊं नये! स्वराज्यांतील रयतेप्रमाणें त्यांच्याबरोबर वर्तन करावें. दुसरा हुकूम असा आहे कीं, आजच्या आज सर्व सरदारांनीं आपल्या पथकांसह देशीं जाण्याकरितां कूच करावें. श्रीमंतांबरोबर जे सरदार रहाण्याचें ठरलें आहे, ते शिवाय करून सगळ्यांनीं आजच्या आज हा हुकूम अमलांत आणिला पाहिजे. ( कान देऊन ) काय ह्मणतां? श्रीमंतांची आज्ञा कोण उल्लंघन करील? नाहीं नाहीं; कोणाचेंही सामर्थ्य नाहीं! बदरीकेदारापासून तों तहत् रामेश्वरापर्यंत ह्यांची आज्ञा शिरसामान्य होते. आमच्या श्रीमंतांचें भाग्य थोर आहे! इंग्रज, फरान्सिस, हैदर, मोंगल, अयोद्धेचा नबाब वटसार त्यांचा दरारा बाळगितात. शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, राजेबहादूर, पानशे, गोखले, वाटोले, घोरपडे, पां-

ढरे, काळे, ढवळे, पांवळे, आंबेडे, फांकडे, वांकडे, असलीं असलीं वीररत्नें ज्यांच्या पदरीं आहेत, त्यांच्या बरोबर दंडेलपणा कोण करूं शकणार आहे- ज्यांनीं आपल्या अतुल पराक्रमानें सर्व शत्रु पादाक्रांत केले, राजपटुत्वानें मोठमोठ्या मुत्सद्यांनां खालीं पाहण्यास लाविलें, उमेट कामगारांच्या डोळयांत अंजन घातलें, रयतेच्या कल्याणा करितां ज्यांनीं उत्तम कायदे केले, रामशास्त्र्यांसारखे न्यायशास्त्र निपुण असे न्यायाध्यक्ष नेमिले, असे आमचे परम थोर प्रतापवंत श्रीमंत सरकार देवदर्शनासाठीं रामेश्वरास जाण्याकरितां निघणार ! सबब, स्वारीला पोंहचविण्याकरितां सर्वांनीं तयार होऊन दरबारच्या डेऱ्यांत हजर व्हावें. ( जातो. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश ४ था.

### स्थल—चवाठा.

( यशवंतराव व मानाजी ह्यांस घेऊन दोन मांग येतात )

१ **मांग**—ऐकाहो सर्व लोकांनों! आह्मी ह्या दोघांनां फांशी देण्याकरितां घेऊन जात आहोंत! हे कोण हें सांगण्याची गरज नाहीं! ह्यांचीं सर्व कृत्यें जगजाहीर आहेत! मोठ्या महाराजांनां ठार मारून राज्य मिळविलें; धाकट्या बाईसाहेबांस त्या नोड-

ग्याकडे पाठविलें; धाकट्या महाराजांस ठार करण्याकरितां मारेकरी पाठविले; जुने कामदार ठार मारिले; लोकांवर जुलूम केला; अशीं, अनेक ह्यांनीं अघोर कर्मे केलीं आहेत !! ह्मणून, आमच्या महाराजांनीं श्रीमंताच्या आज्ञेवरून त्यांनां फांसी देण्याचा हुकूम केला आहे! लोकहो! ऐका. जो कोणी असें भयंकर कृत्य करील त्याला अशीच शिक्षा होईल!

**यशवंतराव**—लोक हो! आह्मी अपराधी आहोंत! आह्मांला पुरा पश्चात्ताप झाला आहे; वाईटाचा परिणाम असाच व्हावयाचा! आह्मी महापातकी! राजद्रोहासारखा गुन्हा आमच्या हातून झाला आहे! आह्मांला जी शिक्षा झाली आहे ती योग्य आहे! केल्या कर्माचीं फळें भोगिलीं पाहिजेत! मित्रहो! क्षमा करा; आमचे अपराध पोटांत घाला; आह्मी तुमचा फारच छळ केला आहे! तुह्मांला आतां खरोखरच सुख होईल!

दु० **मांग**—चला; रस्ता सोडा. आह्मांला फिरून दवंडी पिटूं द्या. (तसें करितो.)

**यशवंतराव**—गृहस्थहो! माझे मरणाबद्दल वाईट वाटूं देऊं नका. तुमचे मुद्रेवरून तसें दिसतें; परंतु, विचार करा. परचक्रापासून तुमचें रक्षण करावयाचें, हिंदुधर्माचा अभिमान धरून मुसलमान लोकांची खोड तोडावयाची, हीं माझी खरीं कर्तव्यें असून, मी कुऱ्हाडीचा दांडा गोतास

काळ, असा झालों! मी वाईट नादास लागलों; दु-र्व्यसनांत निमग्न झालों; बाबासाहेबांच्या सदुपदेशाचा तिरस्कार केला. इतकेंच करून थांबलों नाहीं; तर, त्या थोर पुरुषाच्या मरणाला किहो मी कारण झालों! ती पितृहत्या माझ्यापुढें मूर्तिमंत दिसत आहे! केवढा मी पापकर्मा!! धिःकार असल्या नीच मनुष्याला! सद्गृहस्थहो! त्या घोर पातकाच्या क्षालनार्थ ह्याच्या तोंडावर थुंका; लाथा बुक्या मारा; अतिशय घाणेऱ्या शब्दांनीं निर्भर्त्सना करा; अगदीं कसर करूं नका! हंसाबाई! ह्या पाप्यावर दया कर! शाप देऊं नको! तुझ्या विपत्तीला हाच कारण झाला आहे! तूं खरोखरच महा साध्वी आहेस!

प० **मांग**—चला; व्हा दूर! अभागी मनुष्यांची विपत्ति पाहण्यांत मौज कसली? चला; लोकहो! रस्ता सोडा. आह्मी तर वधस्थानीं येऊन पोंहचलों; आतां, आह्मांला आपलें शेवटचें काम करूं द्या.

(यशवंतराव व मानाजी ह्यांस गणेशटोप्या घालून फांसावर चढवितात. पडदा पडतो.)

---

# अंक ५ वा.

## प्रवेश ५ वा.

( अत्यंत उदासीन झालेला रामराव येतो. )

**रामराव**–प्रिये! मोठ्या कठोर अंतःकरणानें तुझी रवानगी केली! परंतु, आतां मला कोठें चैन पडतें आहे? तुझ्याकरितां मी जिवावरचीं संकटें तुच्छ मानिलीं; सर्व शत्रूंचा पक्का सूड घेतला; श्रीमंतांची मर्जी प्रसन्न करून घेतली; नवीन मुलूख मिळविला; परंतु उपयोग काय? हें सर्व वैभव तुझ्या खेरीज तुच्छ वाटतें. तुझा विरह सहन होत नाहीं. जों जों दुःख दाबण्याचा प्रयत्न करावा, तों तों तें जोरानेंच वर येऊं लागतें. प्रिये! झाला बरें माझा संसार! मी दुसरें लग्न करून तुला विसरून जावें काय? अग लाडके! ह्या तुझ्या गुणांनींच मला वेडें केलें आहे! जनापवादा करितां जरी मी तुझा त्याग केला, तरी, तुजवरची माझी प्रीति नाहींशी झाली नाहीं बरें! मी असाच तुझें स्मरण करीत भ्रमण करणार. नको मला राज्य! ज्या ठिकाणीं तुजसारखी स्त्री नाहीं, त्या ठिकाणाला काय करावयाचें? प्रिये! मी आतां तुझा उपासक झालों! तुझी ती मनोहर मूर्ती हृदयसंपुटामध्यें बसवून मानसिक पूजा करितों. आजपर्यंत फक्त जनानखान्यांत मात्र तुझा व माझा समागम होत असे; परंतु,

आतां तर मुळींच विरह होणार नाहीं. आतां सर्व व्यवहार मानसिक होणार. प्रिये! तूं मजवर कोप करशील! खरोखरच मी पाषाण हृदयी आहे! तुझ्या बरोबर मधुर मधुर भाषणें करून, अखेर तुझा त्याग करण्यास तयार झालों. ह्या पेक्षां आणखी दुष्ट कृत्य तें कोणतें? महालांत चैन पडेना ह्मणून बागेंत आलों; परंतु, येथें तरी काय आहे? (समोर पाहून) अरे, हे मोर मला पाहून पळतात कां? ह्या कोकिळ पक्षांचा तो मधुर आवाज बंद कां झाला? समजलों! माझा दुष्टपणा त्यांनां समजला असेल! ह्मणूनच, नेहमीच्या संवयीचे असून सुद्धां माझ्याजवळ न येतां पळून जातात! हीं हरिणबालकें आपल्या पाणीदार डोळ्यांनीं मजकडे पाहत आहेत; त्यांचाही पळून जाण्याचा विचार दिसतो! काय करूं? जो जो पदार्थ पहावा, तो तो मला प्रियेचें स्मरण देण्याला कारण होतो! कोकिळांचा मधुर स्वर, हरिण बालकांचे डोळे, ह्यांच्या योगानें, मला प्रियेचा विरह तर जास्तच पीडा देऊं लागला!!

(इतक्यांत एक चाकर येतो.)

**चाकर**—सरकार! श्रीमंतांकडून त्रिंबकराव मामा आले आहेत.

**रामराव**—काय? मामासाहेब?

**चाकर**—जी सरकार!

**रामराव**—चल; मी आलोंच. कारण तर कांहीं समजत नाहीं. समक्ष भेटी अंतीं समजेलच. (जातो.)

---

# अंक ५ वा

## प्रवेश ६ वा.

( माधवराव व रमाबाई. )

**माधवराव**–हंसाबाईबद्दल शोध करण्याकरितां मामा साहेबांनां टिपूकडे पाठविलें असून, ते शोध करून पुढें चालू झाले, असा निरोप आला आहे.

**रमा०**–पण तिच्याबद्दल काय समजलें?

**माधवराव**–तें कांहीं त्यांनीं लिहिलें नाहीं ; समक्ष सर्व विदित होईल, ह्मणून त्यांनीं कळविलें आहे.

**रमा०**–कोण बरें हा प्रसंग त्या बिचारीवर आला आहे! शत्रूच्या हांतून सुटका झाली; आतां तरी सुख मिळावें किं नाहीं? परंतु नशीब बिचारीचें! आपण सांगितल्यावर रामराव नाहीं कां ऐकणार?

**माधवराव**-मला तसें सांगतां येणार नाहीं. जनापवादास्तव त्यानें त्याग केला आहे! बाकी ती पवित्र असल्याबद्दल त्याच्या मनाची खातरीच आहे! त्यानें समक्ष दोघांचीं भाषणें ऐकिलीं आहेत.

**रमा०**–होय. तें आपण मला सांगितलेंच आहे!

**माधवराव**–तेव्हां लोकांची खातरी झाली पाहिजे. मी सर्व तजवीज लाविली आहे. मामांची रवानगी टिपूकडे केल्यावर गोपाळरावांनां विमळगडास पाठविलें आहे.

**रमा०**–कशाकरितां बरें?

**माधवराव**—हंसाबाईनां त्यांनीं घेऊन यावें!

**रमा०**—पण रामरावाच्या आज्ञे खेरीज तिला कसें येतां येणार आहे?

**माधवराव**—मी तेथल्या किल्लेदाराला हुकूम केला आहे कीं, गोपाळरावांबरोबर हंसाबाईची रवानगी करून द्यावी. शिवाय हंसाबाईला ही पत्र पाठविलें आहे कीं, मुलींनां सासर किंवा माहेर! आह्मी तुह्मांला मुलीप्रमाणें मानिलें आहे, सबब सत्वर निघून यावें.

**रमा०**—फारच उत्तम योजना केली आहे.

**माधवराव**—बाबासाहेब, रामराव हे गादीचे एकनिष्ठ सेवक आहेत. त्यांच्या कल्याणाकडे लक्ष देणें हें आमचें कर्तव्य आहे.

**रमा०**—मग तिनें कोठें येऊन मिळावें ह्मणून सांगितलें आहे?

**माधवराव**—ती सर्व व्यवस्था गोपाळरावांकडे सोंपविली आहे.

**रमा०**—त्या बिचारीचें एकदां बरें झालें ह्मणजे मला मोठाच आनंद होईल.

**माधवराव**—आतां आपल्याला काळजी नको; थोड्याच दिवसांत सर्व व्यवस्था होईल.

**रमा०**—आज पुढें चलावयाचें ना?

**माधवराव**—हो तर! झालीच कूच करण्याची तयारी. तुमचीही तयारी असूंद्या.

**रमा०**—मी ही तिकडेच जात्यें तर.

**माधवराव**—ठीक आहे.

( दोघे जातात. )

# अंक ५ वा

## प्रवेश ७ वा.

( श्रीमंत माधवराव, टिपू, त्रिंबकरावमामा, गोपाळराव पटवर्धन, रामराव व इतर गृहस्थ बसले असतां पडदा उघडतो. )

मामा०—गृहस्थहो! आजचा दरबार भरविण्याचें कारण हेंच कीं, हंसाबाई टिपूसाहेबांच्या गोटांत कित्येक दिवस असल्यामुळें रामरावांनीं, त्या साध्वीचा त्याग केला; ह्यामुळें, चंद्राबाई ह्यांनीं श्रीमंतांकडे विनंति अर्ज केला कीं, ह्याबद्दल चौकशी व्हावी. तेव्हां, श्रीमंत सरकारांतून ह्या कामावर माझी नेमणूक करण्यांत आली. मी टिपूसाहेबांच्या छावणींत फारच बारीक तपास केला; हंसाबाईच्या दिमतीस जीं मनुष्यें होतीं, त्यांच्या जवळही पुरा शोध केला; त्यावरून माझी खातरी झाली कीं, त्या खरोखरच महापतिव्रता आहेत. टिपूसाहेबांनां ही बातमी समजल्यावरून, ते ही आज येथें हजर आहेत त्यांनीं हंसाबाईनां आपल्या बहिणी समान मानिलें आहे! बहिणीचा असा छळ कोणाला बरें सहन होणार आहे? गृहस्थहो! सांगा सांगा; असल्या पतिव्रतेचा छळ होणें असल्या धर्मराज्यांत योग्य आहे काय? श्रीमंतांची स्वारी एवढ्याच करितां इकडे आली आहे.

**गोपाळ०**—धन्य धन्य ती माऊली! जन्मास येऊन तिनें आपलीं दोन्हीं कुळें उद्धरिलीं! आपल्या पातिव्रत्याच्या रक्षणार्थ ती जिवावर उदार झाली! केवढी तिची थोरवी वर्णन करावी? हाय हाय! असल्या माउलीवर खोटा लोकापवाद यावाना? आणि लोकांच्या मूर्खपणाचें फळ त्या बिचारीला भोगणें लागावेना? सांगा सांगा! गृहस्थहो! जर टिपूसाहेब स्वतः ती पवित्र आहे, ह्मणून सांगण्याकरितां इतके दूर आले आहेत; तर, आपण काय बरें ह्मणाल? पवित्र आहे असें ह्मणणार नाहीं काय?

**लोक**—होय, ती पवित्र आहे! पवित्र आहे!! तिनें खुशाल यावें. आमची खातरी जाहली!

**माधवराव**—मामासाहेब व गोपाळराव ह्यांच्या बोलण्यावरून व टिपू साहेबांच्या आगमनावरून माझी खातरी झाली कीं, हंसाबाई पवित्र आहे. रामरावांनीं तिचा अंगिकार करावा. रामराव! ह्यावर तुमचें काय ह्मणणें आहे?

**रामराव**—श्रीमंतांची आज्ञा व लोकापवादाचें निरसन एकदम होत आहे; ह्मणून मी अंगिकार करण्यास तयार आहें!

**माधवराव**—जा रे. हंसाबाईनां घेऊन या!

( हंसाबाई येते व माधवरावांस आणि मामास नमुस्कार करित्ये. )

**माधवराव**—( हंसाबाईचा हात रामरावाच्या हातांत देऊन ) रामराव, ही आमची धर्मकन्या आहे. हिचें रक्षण करा. वयानें लहान आहे; वारंवार उप-

देश करा. ही तुह्मांला सुख देणारी अशी होईल. हिच्या चोळी बांगडी करितां आह्मी वीस हजारा च्या सनदा देतों; ह्या घ्या. ( देतात. )

**टिपू**—रामरावजी! ही आमची धाकटी बहीण आहे. आह्मी ही दहाहजारांचे गांव वंशपरंपरेनें ह्यांनां आंदण दिले आहेत. हैदरसाहेबांचा शिक्काही झाला आहे! ( देतो. )

**माधवराव**—रामरावजी! तुमचें आतां काय ह्मणणें आहे? हंसाबाई! तुमचे आतां कोणते हेतु राहिले आहेत?

**हंसा०**—टिपूसाहेबांच्या गोटांत असतां फातिमा फार उपयोगी पडली, तर तिला यांतील पांच हजाराचे गांव टिपूसाहेबांनीं द्यावे. बाकीच्यांचा मी स्वीकार करित्यें.

**टिपू**—फार उत्तम आहे! तिची व्यवस्था आह्मी लावून देऊं.

**रामराव**—सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या! श्रीमंतांनीं ह्या पामराकारितां फार त्रास करून घेतला; ह्याबद्दल मी फार फार ऋणी आहे! असल्या उदार व परोपकारी प्रभूची सेवा निरंतर ह्या दासाकडून घडो, इतकीच त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ विनंति आहे!

**सर्व**—तसेंच होवो.

( पडदा पडतो. )

**समाप्त.**

# या पुस्तकास आश्रय देणारांचीं नांवें.

| नांव. | | प्रति. |
|---|---|---|
| ना. बडोद्याचे मा. दि. ब. लक्षुमण जगन्नाथ, शिवदादर. | | २ |
| श्री० रा० माधवराव निंबाजीराव ढवळे, | बडोदें. | १ |
| ,, बाळासाहेब गायकवाड. | ,, | २ |
| ,, मुगुटराव शिंदे फाकडे. | ,, | १ |
| ,, आपाजीराव यशवंतराव मोरे. | ,, | १ |
| ,, आनंदराव माधवराव पवार. | ,, | १ |
| ,, बाबासाहेब राजे शिर्के. | ,, | २ |
| ,, यमाजीराव हरपळे. | ,, | १ |
| रा० रा० लक्षुमणराव चिमणराव खानवेलकर. | ,, | २ |
| ,, आबाजी बळवंत राहूरकर. | ,, | १ |
| ,, कृष्णाजी सीताराम पाठक. | ,, | १ |
| ,, यादवराव आहिलाजी ह्मसके. | ,, | १ |
| ,, सदाशीव त्रिंबक सिनरकर. | ,, | १ |
| ,, जी. डी. कारळेकर. | ,, | १ |
| ,, चिंत्तामण त्रिंबक कुलकर्णी. | ,, | १ |
| ,, दत्तो बळवंत कुलकर्णी. | ,, | १ |
| ,, लक्षुमण आनंदराव बोधे. | ,, | १ |
| ,, हरि सदाशिव मनोहर. | ,, | १ |
| ,, गणेश बाळाजी जोशी. | ,, | १ |
| ,, चिंतामण परशराम नातू. | ,, | १ |
| ,, रामराव नानाजी निकम. | ,, | १ |
| ,, काशीनाथ बळवंतराव. | ,, | १ |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. कृष्णाराम रामनाथ शुकल, | बडोदें. | १ |
| ,, व्यंकटराव अप्पाजी ओतूरकर. | ,, | १ |
| ,, शंकरराव रामराव हरणीकर. | ,, | १ |
| ,, गोविंद रघुनाथ. | ,, | १ |
| ,, सदाशिव शंकर सिंधकर. | ,, | १ |
| ,, विठोबा खंडेराव जाधव. | ,, | १ |
| ,, रामचंद्र खंडेराव जामदार. | ,, | १ |
| ,, नानासाहेब गणपतराव सिंदे. | ,, | १ |
| ,, रामचंद्र हरि सिंदे. | ,, | १ |
| ,, बाळकृष्ण नारायण वालेकर. | ,, | १ |
| ,, गणपतराव धोंडीबा गोरे. | ,, | १ |
| ,. नारायणराव गोपाळ बंड. | ,, | १ |
| ,, गणपतराव गोविंदराव सुर्वे. | ,, | १ |
| ,, मोरो रामचंद्र पुरंदरे. | ,, | १ |
| ,, नारायणराव आपाजीराव सिंदे. | ,, | १ |
| ,, रामचंद्र गोपाळ अष्टेकर. | ,, | १ |
| श्री. रा. रा. विठ्ठलराव भास्कर. | ,, | १ |
| रा. रा. रघुनाथ गणेश देव. | ,, | १ |
| ,, यशवंतराव बळवंत मायगांवकर. | ,, | १ |
| ,, यशवंतराव निगडे. | ,, | १ |
| ,, गंगाजीराव कृष्णराव गरुड. | ,, | १ |
| ,, रामचंद्र लक्ष्मण. | ,, | १ |
| ,, पांडोबा महिपतराव वीर. | ,, | १ |
| ,, बळवंतराव भाऊ जामदार. | ,, | १ |
| ,, कृष्णराव महादेव वाडगांवकर. | ,, | १ |
| ,, बापूराव रामचंद्र पानसे. | ,, | १ |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. यशवंतराव नाथाजीराव मोहिते, | बडोदें. | १ |
| ,, गजराजी बाळोबा जामदार. | ,, | १ |
| ,, हरीबा कोंडाजी शिवतारे. | ,, | १ |
| ,, रामचंद्रराव बहिरजीराव जगताप. | ,, | १ |
| ,, मगणलाल दामोदर परीख. | ,, | १ |
| ,, द. तुकाराम नारायणराव काळे. | ,, | १ |
| ,, ना. द. देवबा आबाजी गाडे. | ,, | १ |
| ,, द. लक्षुमणराव विठोबा मलेक. | ,, | १ |
| ,, फत्तु गायकवाड. | ,, | १ |
| ,, मुकिंदराव मल्हारराव कातूरकर. | ,, | १ |
| ,, ना. द. भिकाजी चिमणराव कोकाटे. | ,, | १ |
| ,, नारायणराव जगताप. | ,, | १ |
| ,, विनायक बळवंत शृंगारपुरे, | डहाणू. | १ |
| ,, विश्वनाथ हरि, | जंजीरा. | १ |
| ,, चिमणराव मल्हारराव गांवढे, | बडोदें. | १ |
| ,, ना. द. नरहरी अनाजीराव राक्षे. | ,, | १ |
| ,, ना. द. रावजी खासेराव भालेराव. | ,, | १ |
| ,, ना. द. निळकंठराव ग्यानोजीराव बाबर. | ,, | १ |
| ,, वासुदेव गोविंद स्कूलमास्तर. | ,, | १ |
| ,, बळवंतराव रावसाहेब गाडवे. | ,, | १ |
| ,, खासेराव रावसाहेब जाधव. | ,, | १ |
| ,, महादेव नारायण कुलकर्णी. | ,, | १ |
| ,, उखाजी विठूजी सिंदे ना. द. | ,, | १ |
| ,, ना. द. यार महमदखामुस्ते. | ,, | १ |
| ,, ना. द. श्रीपतराव बळवंतराव सिंदे. | ,, | १ |
| ,, माधवराव नारायण. | ,, | १ |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. री. दा. अप्पासाहेब मोरोबा कडू, | बडोदें. | १ |
| ,, सुडक्या आपासेट खेडकर, | चिपळूण. | १ |
| ,, गोविंद महादेव दीक्षित, | शहापूर. | १ |
| ,, भागू महादू मेडिकल ऑफिसर, | ह्यसळे. | १ |
| ,, केशव वामन दस्ते, | चिपळूण. | १ |
| ,, री. दा. मे. सखाराम नारायण काळे, | बडोदें. | १ |
| ,, द. दा. भगवंतराव नारायणराव. | ,, | १ |
| ,, रामचंद्र रघुनाथ. | ,, | १ |
| ,, कुशाबा शिवराम आवखडे. | ,, | १ |
| ,, भागूजी सदबा सितोळे. | ,, | १ |
| ,, द. फे. खंडेराव रामजी मासारे. | ,, | १ |
| ,, द. दा. माधवराव भगवंतराव निंबाळे. | ,, | १ |
| ,, श्रीपतराव लक्ष्मणराव सिंदे. | ,, | १ |
| ,, गोविंदराव गणपतराव चवाण. | ,, | १ |
| ,, खंडेराव रामचंद्र गाडे. | ,, | १ |
| ,, यादवराव माधवराव वाकचवरे. | ,, | १ |
| ,, खंडेराव तुकाराम सिंदे. | ,, | १ |
| ,, गोपाळराव सावळेराम रावडे. | ,, | १ |
| ,, बळवंतराव भवाणराव मते. | ,, | १ |
| ,, गंगाराम रामजी साळुंके. | ,, | १ |
| ,, विठ्ठलराव आनंदराव निंबाळकर. | ,, | १ |
| ,, आणगाजी भिकाजी. | ,, | १ |
| ,, रामचंद्र सदाशिव निंबगांवकर. | ,, | १ |
| ,, पुरुषोत्तम चिंतामण आठवले. | ,, | १ |
| ,, हरि नारायणसेट सोनार. | ,, | १ |
| ,, पांडुरंग दामोदर पवार, | मुंबई. | १ |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. विष्णु सीताराम वाकणकर, | बडोदे. | १ |
| ,, रामराव मोरोबा कडु. | ,, | १ |
| ,, द. दा. रामजी सदाशिव भोसले. | ,, | १ |
| ,, लायब्ररी छोटी खासरेडिमेंटल सेक्रेटरी. | ,, | १ |
| ,, यशवंतराव जोतीराव राऊत. | ,, | १ |
| ,, रावजी मानाजी झावरे. | ,, | १ |
| ,, द० बाजीराव बाबाजीराव सिंदे. | ,, | १ |
| ,, हणमंता तिमाप्पा जेठी. | ,, | १ |
| ,, खंडेराव महीपतराव सिंदे. | ,, | १ |
| ,, री० यादवराव सखाराम काळे. | ,, | १ |
| ,, गोविंदराव नारायणराव आवोर. | ,, | १ |
| ,, शंकरराव मल्हारराव प्रधान. | ,, | १ |
| ,, शाहाजी सूर्याजी आंबाडे. | ,, | १ |
| ,, गणपतराव अमृतराव कदम. | ,, | १ |
| ,, रघुनाथराव पुताजीराव गाढवे. | ,, | १ |
| ,, को० द० आमृतराव बाबाजी मोरे. | ,, | १ |
| ,, को० द० माधवराव जयवंतराव काळे. | ,, | १ |
| ,, पे० द० माधवराव केदारजी. | ,, | १ |
| ,, महीपतराव आबाजी कदम. | ,, | १ |
| ,, नबाजीराव काकडे. | ,, | १ |
| ,, री० मानसिंह बापुसिंह. | ,, | १ |
| ,, भगवंतराव नारायण. | ,, | १ |
| ,, मुगुटराव बळवंतराव फडतरे. | ,, | १ |
| ,, साहेबाजी नबीसाहेब. | ,, | १ |
| ,, मानाजी बाबाजीराव तासकर. | ,, | १ |
| ,, शिवराम विठोजी वाघ. | ,, | १ |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. गोपाळराव माधवराव पवार, | बडोदें. | १ |
| ,, ना० द० अहिलाजी शिवराम. | ,, | १ |
| ,, मलेक जाफर आजम. | ,, | १ |
| ,, का. मा. द. भगवंतराव नारायण वाकडे. | ,, | १ |
| ,, बाळाजी गणपतराव उगले, | नवसरी. | १ |
| ,, रंगराव हरि नातणें, | डाहाणू. | १ |
| ,, रामचंद्र दीनानाथ हजारे, | वसई. | १ |
| ,, हरी प्रभाकर लवाटे, | वासिंद. | १ |
| ,, नारायण रामराव चौबळ, | डाहाणू. | १ |
| ,, शिवराम गणेश गुप्ते, | उरण. | १ |
| ,, मोरेश्वर रामचंद्र येशवीकर, | नवसरी. | १ |
| ,, महीपतराव कुशाबा गाडे, | बडोदें. | १ |
| ,, ना० द० माधवराव हणमंतराव आंबाडे. | ,, | १ |
| ,, को० द० बापूराव पिलजीराव यादव. | ,, | १ |
| ,, भाऊराव वाघोबा शिर्के. | ,, | १ |
| ,, ना० द० रावजी रामचंद्रराव गुजर. | ,, | १ |
| ,, दामोदर भास्कर प्रधान. | ,, | १ |
| ,, बाबूराव रामराव डुबे. | ,, | १ |
| ,, बळवंतराव माधवराव घाडगे. | ,, | १ |
| ,, डी० मा० माधवराव विठूजी बोधे. | ,, | १ |
| ,, द० मे० नारायणराव रावजी बोरकर. | ,, | १ |
| ,, नारायणराव गणेश कारखनीस. | ,, | १ |
| ,, एम. ए. मोरे. | ,, | १ |
| ,, माधवराव नारायण जावळे. | ,, | १ |
| रा. सा. बजाबा व्यंकटेश शृंगारपुरे, | उंबरगांव. | १ |
| ,, बाळाजी केशव शृंगारपुरे, | डाहाणू. | १ |

रा. रा. गणेश लक्ष्मण सुळे, नागोठणे. १
,, द्वारकानाथ सीताराम हजरणीस, उंबरगांव. १
,, मोरो विश्वनाथ सासवडकर, उमेळें. १
,, दामोदर सीताराम गडकरी. ,, १
,, पुरुषोत्तम बळवंत देशमुख, वसई. १
,, त्रिंबक आत्माराम दोंदे वकील. ,, १
,, केशव सखाराम प्रधान. ,, १
,, वामन खंडेराव सुळे. ,, १ ,, केशव नारायण राजे. ,, १
,, नरसाआपा कनकाआपा. बडोदें. १
,, खंडेराव गंगाराम वाकचौरे. ,, १
,, बळवंतराव बापूजी माहाडीक. ,, १
,, गोविंदराव गणपतराव सुर्वे. ,, १
,, रामराव गोविंदराव जाधव. ,, १
,, गणपतराव बळवंत पागेदार. ,, १
,, खंडेराव मल्हार जगधाने, गणपतपुरा. १
,, महीपतराव रावजी घाडगे, बडोदें. २
,, सावळाराम कृष्णराव पवार. ,, १
,, नानासाहेब चिमणराव ढोमसे. ,, १
मे. रा. गणपतराव जाणराव काळे. ,, १
रा. रा. सावळाराम गोविंद सेट. ,, २
,, विष्णु गणेश फाटक. ,, १
श्री. रा. जनार्दन आनंदराव आंबेगांवकर. ,, १
रा. रा. दगेराव गंगाराम देशमुख. ,, १
,, रामराव गोविंदराव जाधव. ,, १
श्री. रा. गणपतराव बळवंतराव पागेदार. ,, १
रा. रा. नरहर गोविंद दीडोरकर. ,, १

| | | |
|---|---|---|
| रा. रा. रामचंद्र बळवंत भोंडे. | बडोदें. | १ |
| ,, बुध्या शिवचरण भाई. | ,, | १ |
| ,, महादेव नारायण केळकर. | ,, | १ |
| ,, रामचंद्र हरि पंडित. | ,, | १ |
| ,, परशुराम भिकाजी वकील. | ,, | १ |
| ,, लक्षुमणराव बक्षी. १ ,, कोंडु नाना सप्रे. | ,, | १ |
| ,, घोटीकर मास्तर. १ रा. रा. नानासाहेब. | ,, | १ |
| मिसे० आंबाबाई. | ,, | १ |
| रा. सा. काशीनाथ बाबाजी प्रधान. | ,, | १ |
| ,, बाबूराव चवाण. | ,, | १ |
| रा. रा. रामभाऊ पाटणकर. | ,, | १ |
| श्री. रा. सख्या हरी मोहिते. | ,, | १ |
| रा. रा. गणपत सुर्वे. | ,, | १ |
| श्री. सौ. संतूबाईसाहेब भोसले. | ,, | १ |
| रा. रा. यादवराव कृष्णाजी निंबाळकर. | ,, | १ |
| ,, बगाराम गणेश बेडेकर. | ,, | १ |
| ,, आत्मारामपंत विनायक. | ,, | १ |
| ,, गणू नऊसाजी नागुलकर. | ,, | १ |
| ,, हा०मे०बापूजी येसूजी.,, १ ,, प्रा०चिनाआपा. | ,, | १ |
| ,, ना०बाबाजीराव गणेश. | ,, | १ |
| ,, जा० तात्याबा शिवराम मोरे. | ,, | १ |
| ,, दत्तात्रय वासुदेव प्रधान. | ,, | १ |
| ,, कृष्णराव नथू सोनगडकर. | ,, | १ |
| ,, आबाजी धाकूजीराव गुजर. | ,, | १ |
| रा. रा. वामन तातोबा बर्वे, | जालगांव. | १ |
| ,, नारायण रामचंद्र गोकटे, | दापोली. | १ |

रा. रा. गणपतराव साने. दापोली. १
,, रेव्हरेंड् आल्फ्रेड् ग्याडनी. ,, १
,, परशराम नीलकंठ पटवर्धन. ,, १
,, गोपाळ बाळकृष्ण गोखले, जबलपूर. १
,, मंडलीक वकील, दापोली. १
,, वासुदेव नारायण गोळे, हर्णै. १
,, कृष्णाजी त्रिवलकर शास्त्री, अंजर्लै १
,, हरि केशव गोखले, मुंबई. १
,, सखाराम बाबाजी जोशी, हर्णै. १
,, रामकृष्णपंत रानडे. ,, १
,, वासुदेव गोविंद जोशी, दापोली. १
,, गंगाराम शेट. ,, १
,, वामनराव केळकर हेड्मास्तर, केळशी. १
,, गणेश श्रीधर आपटे, बडोदें. १
,, वासुदेव नरहर उपाधे. ,, १ ,, रावसाहेब लेले. ,, १
,, केशवलाल हरिवल्लभ पारख. ,, १
,, हणमंतराव भीमाजीराव. ,, १
,, महावीर अयोध्यासिंग. ,, १
,, रीसाई० दा० कालका प्रसाद. ,, १
,, द० दा० कल्याणराव पांडुरंग कर्णीक. ,, १
,, गंगाराम रामजी गुप्ते. ,, १
,,स्कू. मा. रामचंद्रराव नारायण खानवेलकर,वडवली. २
,, बचाजी विनायक रानडे, राजापूर. १
रा. रा. गणेश रावजी मुठ्ठल, बडोदें. १
,, नारायण सीताराम हर्डीकर. ,, १
,, द्वारकानाथ नारायण समेळ, मुंबई. १

| | | |
|---|---|---|
| रा. रा. मोरेश्वर केशव सावे, | खोचीविडे. | १ |
| ,, आर. जी. आपटे, | आंकलेश्वर. | १ |
| ,, रघुनाथ नारायण खोटे, | मुंबई. | १ |
| ,, अनंत शिवराम साव्हणे. | सोनेवाडी, | १ |
| ,, नारायणराव मल्हारराव देशमुख, | वणी. | १ |
| ,, चिमणाजी नीलकंठ परांजपे, | मुंबई. | १ |
| ,, दामोदर रामचंद्र देशमुख, | . भगूर. | २ |
| ,, स्कू०मा०नारायण भवानजी गोंदवलेकर, | मुंबई. | १ |
| ,, गणपतराव रावजीराव राणे, | विगतपुरी. | १ |
| ,, धोंडो केशव भावे तळेकर, | पनवेल. | १ |
| ,, वामन आत्माराम पुसाळकर, | बडोदें. | १ |
| ,, विष्णु सीताराम पुसाळकर. | ,, | १ |
| ,, बाळकृष्ण भाऊ गाडेकर, | वेंगुर्लें. | १ |
| ,, गणपतराव आपाजी घोटीकर, | बडोदें. | १ |
| श्री. रा. एस्. एस्. पागेदार. | ,, | १ |
| ,, एन. के. घोरपडे. ,, १ ,, एन. जी. महाजन. | ,, | १ |
| ,, भगवंतराव माधवराव जगताप. | ,, | १ |
| रा. रा. काशीनाथ नारायण पारखी. | ,, | १ |
| ,, गणपतराव बाजी. ,, १ ,, रामचंद्र बाळाजी. | ,, | १ |
| ,, एन्. जी. महाडीक. | ,, | १ |
| ,, गोविंदराव रावसाहेब. | ,, | १ |
| ,, हरीबा रावजी नाईक कदम. | ,, | १ |
| ,, अमृतराव धाकोजीराव मोरे. | ,, | १ |
| ,, माधवराव गणपतराव. ,, १ ,, पांडु बाबाजी. | ,, | १ |
| ,, बापूजी बाळकृष्ण. ,, १ ,, सीताराम विश्वनाथ. | ,, | १ |
| ,, अणाआपा व्यंकाआपा. | ,, | १ |

,, भिकाजी रामचंद्र जमादार. बडोदें,, १
,, रामचंद्र सोनबा पवळे. ,, १
,, बाळोजी रामचंद्र मोहिते. ,, १
,, रावजी नागोजीराव घाडगे. ,, १
,, तात्या माधवराव निंबाळकर. ,, १
,, सुंदरराव आनंदराव कीमकर. ,, १
,, बाजीराव संभाजीराव पवार. ,, १
,, यशवंतराव दाजीबा चव्हाण. ,, १
,, रामजंद्र गुणाजीराव सावंत. ,, १
,, बळवंतराव गणपतराव तळेकर. ,, १
,, रामजी वाघोजी उकीर्डे. ,, १
,, मुकुंदराव गुणाजीराव सावंत. परुळे. १
,, पांडोबा महिपतराव वीर. बडोदें. १
,, लक्ष्मण आंधारीकर. ,, १
,, बदाजीराव बापूजीराव कदम. भेलराई. १
,, खंडेराव बाळकृष्ण टिपणीस वकील, पनवेल. १
,, रे० पो० देविदिनमाता दिनतीवारी, कर्जत. १
,, माहादेव गोविंद नाडकर, साष्टी. १
,, दत्तात्रय पांडुरंग निमक, पेन. १
रा. सा. आ० ई० नारायण महादेव राजे. ,, १
रा. रा. श्रीधर विनायक कर्णीक, ठाणें. १
,, बाळकृष्ण रघुनाथ प्रधान, जैतापूर. १
,, पांडुरंग विनायक देशमुख, उरण. १
,, विठ्ठल आत्माराम प्रधान सजेदार. ,, १
,, ई० दा० राजाराम नारायण टीपणीस, पनवेल. १
,, आत्माराम रंगनाथ कर्णीक, उरण. १

रा. रा. स० कला० जैराम बाळकृष्ण देशपांडे उरण १
,, श्रीधर सखाराम मोकाशी. ,, १ ,, बापुजी बल्लाळ धुरु. ,, १
,, आ० का० त्रिंबक विनायक दोंदे. ,, १
,, ने. ए. विनायक गणेश गडकरी, कोल्हापूर. १
,, राजाराम केशव गुप्ते, उरण. १
,, गजानन बळवंत कुलकर्णी, पाली. १
,, पांडुरंग रामचंद्र ताह्मणे, नागोठणें. १
,, यशवंत महादेव शृंगारपुरे. ,, १
,, दामोदर सीताराम. ,, १
,, गोविंद शामराव चौबळ, सावटे. १
,, बळवंत हरी कर्णीक. ,, १
,, मोरो गणेश गुप्ते, वसई. १
,, जैराम विनायक कर्णीक, डाहाणू. १
,, द्वारकानाथ नारायण रणदिवे, धुळें. १
,, अ० स० ई० रावजी वामन ठाकर, पनवेल. १
,, हरि गणेश गोडबोले, दादर. १
,, हे० मा० शिवराम द्वारकानाथ कुलकर्णी, जंजिरा. १
,, रामचंद्र कृष्ण सबनीस. कल्याण. १
,, इं० शा० अ० मा० अभ्यंकर, पनवेल. १
,, विष्णु सीताराम वर्तक, शिवर्धन. १
,, रामकृष्णपंत भगवत, डाहाणू. १
,, लक्ष्मण नारायण साथले, वसई. १
,, व्यंकाआपा कणकाआपा, बडोदें. १
रा. सा. आनंदराव राघोबा. ,, १
रा. रा. मोहन लाल भगवानदास. ,, १
,, दामोदर राजाराम. ,, १

# विक्रीस तयार.

विलासवतीचा राजपुत्र " चंद्रसेन " कादंबरी. व्हा० पे० सह किं० ८।२ आणे.

शूरवीर " रामराव घोरपडे " ऐतिहासिक नाटक. किं० ८८ आणे. व्हा० पे० चार्ज निराळा पडेल.

हीं वरील दोन्हीं पुस्तकें एकदम मागविणारास व्हा० पे० चार्ज पडणार नाहीं.

[illegible]जी बहेरजी नाईक लांभुरे

पत्ता—ब्राह्मणपुरा जासूद महाल नं० ३

बडोदे.